अकोला । रविवार
दि. ८ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ९८
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये




जैस्वालच्या पायचीतवरुन वाद

(पान ७ वर..)

## थोडक्यात

### राहुल गांधी हताश – नड्डा यांची टीका



**नवी दिल्ली:** अनेक निवडणुकांमधील पराभवामुळे काँग्रेस नेते दुःखी आणि निराश आहेत आणि म्हणूनच विचित्र कट रचण्याचा आरोप करत आहेत असे उत्तर भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी राहुल गांधी यांना दिले. राहुल गांधींचा लेख खोटे भाषण रचण्याचा ब्लूप्रिंट आहे कारण ते सतत निवडणुका गमावल्याने दुःखी आणि निराश आहेत. ते पावलोपावली असेच करतात असे नमूद करत नड्डा यांनी राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर म्हणून एक लेख शेअर केला आहे. ज्यामध्ये गांधींच्या आरोपांचे खंडन करण्यात आले. भाजपने राहुल गांधींवर निवडणूक प्रक्रियेवरील लोकांचा विश्वास कमी करण्यासाठी लोकशाही संस्थांवर हल्ला केल्याचा आरोप केला.

### लष्कराच्या रेजिमेंटमध्ये ४०२ अग्निवीरांचा समावेश



**नवी दिल्ली:** लष्करातील अग्निवीरांच्या पाचव्या कोर्स्याचा पासिंग आउट परेड पूर्ण झाल्यानंतर, या बॅचमधील सर्व ४०२ अग्निवीरांचा लष्कराच्या डोगरा रेजिमेंटमध्ये समावेश करण्यात आला आहे. अग्निवीरांची संपूर्ण पाचवी बॅच या रेजिमेंटच्या विविध शाखांमध्ये तैनात करण्यात आली आहे. लष्करातील अग्निवीर भरतीच्या नवीन प्रणालीअंतर्गत, या बॅचचा कोर्स देखील डोगरा रेजिमेंटने आयोजित केला होता आणि त्यांचा पासिंग आउट परेड आणि पडताळणी समारंभ ४ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. लष्कराच्या मते, या बॅचमध्ये एकूण ४०२ अग्निवीर उत्तीर्ण झाले आणि त्यांनी भारतीय सैन्याचा भाग म्हणून शपथ घेतली.

### शपथपत्रासाठी स्टॅम्प पेपरची मागणी नियमबाह्य



**मुंबई :** शासकीय कार्यालयातील ई-सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी १०० अथवा ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची करण्यात येणारी मागणी नियमबाह्य असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी स्पष्ट केले. त्यामुळे नागरिक, विद्यार्थ्यांकडून स्टॅम्पपेपरची मागणी करण्यात येऊ नये, अशी सक्त ताकीद बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना पत्राद्वारे दिली आहे. महसूलमंत्री बावनकुळे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना पत्र पाठविले आहे. विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहे.

# छत्तीसगडमध्ये ७ नक्षलवाद्यांचा खात्मा

## ९५ लाखांचे बक्षीस असलेले दोन कुख्यात नक्षलवादी ठार

नवी दिल्ली : दि. ७ वृत्तसंस्था

**छत्तीसगडमधील बीजापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या जोरदार नक्षलविरोधी मोहिमेमध्ये गेल्या तीन दिवसांत किमान सात नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. या कारवाईमध्ये कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचे दोन महत्त्वाचे नेतेही ठार झाले असून, ही घटना राज्यासाठी आणि देशासाठी नक्षलवादविरोधी मोहिमेतील मोठा टप्पा मानली जात आहे.**

ही मोठी कारवाई बीजापूर जिल्ह्यातील घनदाट इंद्रावती नॅशनल पार्क क्षेत्रात सुरू आहे. या भागात सुरक्षा दलांनी ७ मृतदेह हस्तगत केले असून त्यामध्ये माओवाद्यांच्या सेंट्रल कमिटीचा सदस्य नरसिंह चाळम ऊर्फ सुधाकर आणि तेलंगणा राज्य समितीचा विशेष विभाग सदस्य भास्कर ऊर्फ मईलारापू अडेल्लू यांचा समावेश आहे. सुधाकरवर ₹४० लाखांचे इनाम होते तर भास्करवर छत्तीसगड आणि तेलंगणा सरकारकडून मिळून ₹४५ लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. बस्तर विभागाचे पोलीस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार, इंद्रावती नॅशनल पार्क परिसरात सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान आतापर्यंत ७ नक्षलवाद्यांचे मृतदेह हस्तगत करण्यात आले आहेत. यात सुधाकर आणि भास्कर यांचाही समावेश आहे. शनिवारी दोन मृतदेह सापडले असून त्याआधी शुक्रवारी रात्री झालेल्या चकमकीनंतर तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह हस्तगत करण्यात आले होते. उर्वरित दोन महिलांसह अन्य नक्षलवाद्यांची ओळख अद्याप पटवली गेलेली नाही. ही मोहीम ४ जून रोजी सुरू करण्यात आली असून, त्याआधी विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे राष्ट्रीय तपास यंत्रणेने कंदाहरिथ दंडकारण्य विशेष प्रादेशिक समितीशी संबंधित वरिष्ठ नेते सुधाकर, बांदी प्रकाश, पप्पा राव यांची उपस्थिती असल्याचे समजले होते. छत्तीसगड पोलिसांच्या विशेष टास्क फोर्स, जिल्हा राखीव गट आणि कोब्रा कमांडो युनिटच्या संयुक्त पथकांनी या मोहिमेत भाग घेतला आहे.



### माओवाद्यांवर मोठा आघात

ही कारवाई गेल्या तीन आठवड्यांत माओवाद्यांच्या नेतृत्वावर झालेली तिसरी मोठी कारवाई आहे. २१ मे रोजी नारायणपूर जिल्ह्यातील अबूजमाड जंगल परिसरात सीपीआय (माओवादी) चे महासचिव नामबाला केशव राव ऊर्फ बसवराज आणि २६ अन्य माओवादी ठार करण्यात आले होते. अधिकाऱ्यांच्या मते, बीजापूर जिल्ह्यात सुरू असलेली ही मोहीम माओवाद्यांच्या दक्षतीपासून जंगल भाग पूर्णपणे मुक्त करण्यासाठी आखण्यात आलेली असून, त्यांच्या नेतृत्वाचा कणा मोडण्यासाठी हे ठोस पाऊल उचलण्यात आले आहे.

# भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी हालचालींना वेग

## धर्मेंद्र प्रधान, चौहान, खट्टर यांची नावे चर्चेत





नवी दिल्ली : दि. ७ वृत्तसंस्था

भारतीय जनता पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. पक्षाने अद्याप कोणत्याही नावाची घोषणा केलेली नसली, तरी जूनच्या मध्यापर्यंत निवड प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती आहे. उत्तर प्रदेशात ७० नव्या जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीनंतर आता राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी हालचालींना वेग आला आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यामुळे ही प्रक्रिया काहीशी मंदावली होती.पक्ष सूत्रांनुसार, राष्ट्रीय अध्यक्ष निवडीपूर्वी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये (पान २ वर)

### प्रक्रियेसाठी केंद्रीय निवडणूक समिती

सध्याचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ लवकरच संपत आहे. त्यांना २०२४ च्या निवडणुकीसाठी मुदतवाढ मिळाली होती. आता पक्ष नव्या चेहऱ्याचा विचार करत आहे. निवड प्रक्रियेसाठी केंद्रीय निवडणूक समिती स्थापन होण्याची शक्यता आहे. काँग्रेस, आपसह विरोधी पक्ष बीजेपीच्या या निवडीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

# पंतप्रधान मोदींना जी-७ शिखर परिषदेचे आमंत्रण; कॅनेडियन खलिस्तानी भडकले!



### खलिस्तानी समर्थकांचा रोष

दुसरीकडे, कॅनडामधील खलिस्तानी समर्थक गटांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जी-७ शिखर परिषदेसाठी आमंत्रित केल्याच्या निर्णयाविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला आहे. यावेळी त्यांनी 'किल मोदी' असे नारे देत जीवे मारण्याची धमकी दिली. खलिस्तानी समर्थकांचा हा रोष हरदीप सिंह निज्जर या दहशतवाद्याच्या जून २०२३ मधील हत्येनंतर वाढला आहे. कॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी निज्जरच्या हत्येत भारतीय एजंटांचा सहभाग असल्याचा आरोप केला होता, मात्र हे आरोप भारताने फेटाळून लावले होते.

अल्बर्टा : दि. ७ वृत्तसंस्था

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी १५ ते १७ जून २०२५ दरम्यान अल्बर्टा येथे होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेसाठी मोदींना निमंत्रित केले आहे. शुक्रवारी दोन्ही नेत्यांमध्ये फोनवर चर्चा झाली. मोदींनी कार्नी यांना निवडणुकीतील विजयाबद्दल शुभेच्छाही दिल्या. यासंदर्भात मोदींनी एक्सवरून पोस्ट करत माहिती दिली आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील तणावपूर्ण संबंधांमुळे या निमंत्रणाला विलंब झाल्याचे मानले जात होते.पंतप्रधान मोदींनी लिहिले की, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्याशी फोनवर बोलून आनंद झाला. या महिन्याच्या अखेरीस कानानस्किसमध्ये होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेसाठी आमंत्रित केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. भारत आणि कॅनडा परस्पर आदर आणि सामायिक (पान २ वर)

# लोहगड किल्ल्याचा भाग कोसळला; जीवितहानी नाही

पवनानगर : दि. ७ वृत्तसंस्था

मावळ तालुक्यातील लोहगड किल्ल्याचा भाजे गावाच्या बाजूकडील काही भाग शनिवारी (दि. ७) सायंकाळच्या सुमारास कोसळला. सुदैवाने ह्या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. परंतु किल्ल्याचा भाग कोसळल्याने शिवप्रेमींमध्ये दुःखाचे वातावरण आहे.लोहगडाच्या पायथ्याशी पूर्वे कडील बाजूला लोहगड गाव असून किल्ल्याला लागूनच गावातील वस्ती आहे. ह्या वस्तीची लोकसंख्या ६५० पेक्षा अधिक आहे. तर उत्तर बाजूला भाजे गाव आहे. तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत असून या पावसाच्या माऱ्याने गडाच्या उत्तर बाजुचा काही भाग शनिवारी साडेपाचच्या सुमारास कोसळला. दरड कोसळल्यासारखा आवाज झाल्याने भयभीत झालेल्या नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन व महसूल विभागाला कळविले. दरड छोटी असल्याने कुठलीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही.

# गुरुग्राम बॉम्ब हल्लाप्रकरणी गोल्डी ब्रारसह ५ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल

नवी दिल्ली : दि. ७ वृत्तसंस्था



गेल्या वर्षी हरियाणातील गुरुग्राममधील दोन क्लबवर झालेल्या बॉम्ब हल्लाप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने कॅनडास्थित खलिस्तानी दहशतवादी गोल्डी ब्रारसह पाच आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. २०२४ मध्ये गुरुग्राममधील दोन क्लबवर ग्रेनेडने हल्ला करण्यात आला होता.

एनआयएच्या तपासात असे उघड झाले आहे की, हा कट दहशतवादी गोल्डी ब्रार आणि त्याच्या साथीदारांनी रचला होता. एनआयएने सांगितले की, या प्रकरणात ब्रार आणि मलिक वगळता सर्वांना अटक करण्यात आली आहे. ब्रार हा गायक सिद्धू मूसेवाला यांच्या हत्येसह भारतात तीन डझनहून अधिक प्रकरणांमध्ये हवा आहे. एनआयएने सतींदरजीत सिंग उर्फ गोल्डी ब्रार, सचिन तालियन, अंकित, भाविश आणि अमेरिकेत राहणारे रणदीप सिंग उर्फ रणदीप मलिक यांच्यावर भारतीय न्याय संहिता (बीएनएस), शस्त्रास्त्र कायदा, स्फोटक पदार्थ कायदा आणि बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायद्याच्या विविध कलमांखाली आरोपपत्र दाखल केले आहे. एनआयएला बॉम्ब हल्ल्यांच्या तपासात असे आढळून आले आहे की आरोपी गुरुग्राममधील सेक्टर-२९ मधील वेअरहाऊस क्लब आणि ह्यूमन क्लबला बॉम्बने लक्ष्य करण्याच्या कटात सहभागी होते. या क्लबवर झालेले बॉम्ब हल्ले बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या मोठ्या कटाचा भाग होते.

# सोनिया गांधी रुग्णालयात दाखल; प्रकृती स्थिर

शिमला : दि. ७ वृत्तसंस्था



काँग्रेस संसदीय दलाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांची प्रकृती शनिवारी अचानक बिघडल्याने त्यांना शिमला येथील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असून, डॉक्टर त्यांच्या वैद्यकीय तपासण्या करत आहेत, अशी माहिती हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुखू यांचे प्रधान सल्लागार (माध्यम) नरेश चौहान यांनी दिली. चौहान यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, सोनिया गांधी यांना काही किरकोळ प्रकृतीच्या तक्रारींमुळे नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात आणण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे, आणि डॉक्टर त्यांच्या तपासण्या करत आहेत. अधिक माहितीसाठी प्रतीक्षा आहे. वृत्तानुसार, सोनिया गांधी यांची मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग तपासणी सुरू आहे. नुकत्याच झालेल्या घडामोडींमध्ये, प्रवर्तन संचालनालयाने (ईडी) नॅशनल हेराल्ड प्रकरणात सोनिया गांधी यांना आरोपी क्रमांक १ आणि त्यांचे पुत्र राहुल गांधी (वय ५४) यांना आरोपी क्रमांक २ ठरवले आहे.

# राष्ट्रीय सुरक्षेबद्दल जागरूक करणे खूप महत्त्वाचे – व्ही. पी. मलिक

नवी दिल्ली : दि. ७ वृत्तसंस्था



आपण राष्ट्रीय सुरक्षेबद्दल जास्त बोलत नाही. प्रत्येक मूल देशाची सेवा करण्यासाठी सैन्यात सामील होणे आवश्यक नाही, परंतु त्यांना राष्ट्रीय सुरक्षेबद्दल जागरूक करणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी एनसीसीसारख्या संस्थांचा विस्तार करणे आवश्यक आहे असे भारताचे १९ वे लष्करप्रमुख व्ही. पी. मलिक यांनी म्हटले आहे. तसेच ऑपरेशन सिंदूर आणखी एक दिवस चालले असते तर चांगले झाले असते असेही त्यांनी म्हटले आहे. एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत मलिक यांनी विविध प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली आहेत. त्यांनी सैन्यातील मनुष्यबळावरील खर्च कमी करणे, संरक्षण बजेटचा संतुलित पद्धतीने वापर करणे आणि उर्वरित रकम नवीन तंत्रज्ञान आणि प्रगत शस्त्रास्त्रांच्या खरेदीसाठी वापरण्याबद्दल देखील भाष्य केले. ऑपरेशन सिंदूर आणखी एक दिवस चालू राहिले असते तर बरे झाले असते असे मलिक यांनी म्हटले होते. यासंदर्भात त्यांना विचारले असता ते म्हणाले की, हो, नक्कीच. हे माझे वैयक्तिक विचार आहेत. मी एक सैनिक आहे. आम्हाला नेहमीच शिकवले जाते की (पान २ वर)

# मतमोजणीत घोटाळ्याचा आरोप हास्यास्पद

नवी दिल्ली : दि. ७ वृत्तसंस्था

### आयोगाने राहुल गांधींना फटकारले



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपच्या बाजूने मतदान प्रक्रिया रचल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला होता. मात्र, निवडणूक आयोगाने शनिवारी ७ जून रोजी त्यांच्या या आरोपांना ''अवास्तव व निराधार'' ठरवले असून, राहुल यांच्या मुद्यांचे खंडन करणारे निवेदन प्रसिद्धिस दिले आहे. राहुल गांधी यांनी या वृत्तपत्रात एक लेख लिहून महाराष्ट्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला फायदा व्हावा यासाठी निवडणूक प्रक्रिया बिघडवण्यात आल्याचा आरोप केला. त्यांनी मतदार यादीत ७० लाख बनावट नावांची भर घालण्यात आल्याचाही आरोप केला. यावर निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, मतदारांचा निर्णय आपल्या विरोधात गेला म्हणून आयोगाच्या निष्पक्षतेवर संशय घेणे आणि बदनामी करणे हे पूर्णतः गैर व हास्यास्पद आहे. आयोगाने पुढे स्पष्ट केले आहे की, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली होती. सर्व राजकीय पक्षांचे (पान २ वर)

# नौदलाची वाढणार सागरी ताकद!

## देशातील पहिली 'अर्नाळा सबमरीन' सज्ज

विशाखापट्टणम : दि. ७ वृत्तसंस्था

भारतीय नौदल १८ जून रोजी विशाखापट्टणम येथील नेव्हल डॉकयार्ड येथे देशातील पहिले अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट (एएसडब्ल्यू-एसडब्ल्यूसी) अर्नाळा कमिशनिंग करणार आहे. कमिशनिंग समारंभाचे प्रमुख पाहुणे सीडीएस जनरल अनिल चौहान असणार आहेत.आयएनएस अर्नाळा ८ मे रोजी भारतीय नौदलाकडे सोपवण्यात आले. तथापि, या कमिशनिंग समारंभात १६ एएसडब्ल्यू-एसडब्ल्यूसी श्रेणीतील जहाजांपैकी पहिले भारतीय नौदलात औपचारिकरित्या समाविष्ट झाले. मेसर्स गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स (जीआरएसई) कोलकाता आणि मेसर्स एल अँड टी शिपबिल्डर्स, अर्नाळा सोबत सार्वजनिक (पान २ वर)



### महाराष्ट्रातील अर्नाळा किल्ल्यावरून नाव

महाराष्ट्रातील वसई येथील ऐतिहासिक अर्नाळा किल्ल्यावरून त्याचे नाव देण्यात आले आहे. हे जहाज हिंदी महासागरात नौदलाच्या मजबूत उपस्थितीसाठी डिझाइन केले आहे. ते उथळ पाण्यात शत्रूच्या पाणबुड्या शोधेल, त्यांचा मागोवा घेईल आणि त्यांना निष्क्रिय करेल.

### आयएनएस अर्नाळाची खास वैशिष्ट्ये

- **लांबी :** सुमारे ७७ मीटर
- **वजन :** सुमारे ९०० टन
- **वेग :** २५ नॉट्सपर्यंत (सुमारे ४६ किमी/तास)
- **क्रूची संख्या :** ५७ खलाशी (अंदाजे)
- **सोनार सिस्टीम :** प्रगत हल-माउंटेड सोनार
- **शस्त्रे:** टॉर्पेडो, एएसडब्ल्यू रॉकेट लॉंचर, ३० मिमी बंदुका
- **रडार आणि सेन्सर्स :** आधुनिक नेव्हिगेशन रडार, इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली
- **डिझाइन वैशिष्ट्ये:** स्टील हल, कमी ध्वनिक स्वाक्षरी, उच्च गतिशीलता
- **बिल्डर :** गार्डन रीच शिपबिल्डर्स




# पान 1 वरून...

## नौदलाची वाढणार सागरी ताकद!

खासगी भागीदारी (पीपीपी) अंतर्गत डिझाइन आणि बांधणी करण्यात आली आहे, ही संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भर भारतच्या यशाची साक्ष आहे. हे जहाज खास करून उथळ पाण्यातील पाणबुडीविरोधी ऑपरेशन्ससाठी तयार करण्यात आले आहे. हे शत्रूच्या पाणबुड्यांचा मागोवा घेणार, त्यांना निष्क्रिय करणार आणि सागरी हल्ल्यांपासून भारतीय समुद्रकिना-याचे संरक्षण करणार. आयएनएस अर्नाळा हे एकूण १६ अँटी-सबमरीन वॉरफेअर श्रेणीतील युद्धनौकांच्या मालिकेतील पहिले जहाज आहे, जे औपचारिकपणे भारतीय नौदलात सामील होणार आहे. ही युद्धनौका भारतीय सागरी सुरक्षेतील फोर्स मल्टिप्लायर ठरणार असून हिंदी महासागरात नौदलाची उपस्थिती अधिक बळकट करणार आहे. यामुळे भारताची सागरी ताकद फक्त वाढणार नाही, तर स्वदेशी संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊलही ठरणार आहे.

## भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय ...

प्रदेशाध्यक्ष बदलले जाणार आहेत. उत्तर प्रदेशात जातीय समीकरणांना महत्त्व आहे. यापूर्वी ब्राह्मण चेहरा निवडला गेला होता, परंतु आता ओबीसी नेत्याची मागणी वाढल्याने बदलाची शक्यता आहे. मध्य प्रदेशात मुख्यमंत्री ओबीसी, तर प्रदेशाध्यक्ष ब्राह्मण आहेत. आता पक्ष आदिवासी नेत्याला संधी देण्याच्या विचारात आहे. उत्तराखंडातही ब्राह्मण नेत्याची चर्चा आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान (ओबीसी, ओडिशा), शिवराज सिंह चौहान (माजी मुख्यमंत्री, मध्य प्रदेश) आणि मनोहर लाल खट्टर (माजी मुख्यमंत्री, हरियाणा) यांची नावे चर्चेत आहेत. संगठनात्मक अनुभव, प्रादेशिक प्रतिनिधित्व आणि जातीय संतुलन असलेल्या नेत्याला प्राधान्य मिळेल.

## पंतप्रधान मोदींना जी ७ शिखर ...

हितसंबंधांच्या मार्गदर्शनाखाली नव्या जोमाने एकत्र काम करतील. शिखर परिषदेत भेटण्याची आम्हाला उत्सुकता आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. गेल्या काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची सुरू असलेली प्रगती पाहता भारताला ७ शिखर परिषदेसाठी निमंत्रित केलं जातं. यावर्षी मात्र भारत आणि कॅनडाच्या बिघडलेल्या संबंधांमुळे भारताच्या निमंत्रणाबद्दल अनिश्चितता होती. मात्र, या निमंत्रणामुळे भारताचं जागतिक अर्थकारणातील महत्व अधोरेखित झालं आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली, कॅनडा आणि जपान या देशांचा समावेश असलेल्या जी-७ शिखर परिषदांना पंतप्रधान मोदी यांनी २०१९ पासून सलग पाच वर्षे हजेरी लावली आहे.

## राष्ट्रीय सुरक्षेबद्दल जागरूक करणे ...

जेव्हा तुम्ही शत्रूवर मात करता आणि विजय निश्चित असतो, तेव्हा त्याच्यावर इतका हल्ला करा की संदेश योग्यरित्या पोहोचेल. जर त्यांना ऑपरेशन सिंदूर दरम्यान आणखी काही धडे शिकवले गेले असते, तर आज पाकिस्तान हा खोटा प्रचार पसरवू शकला नसता. तसेच, अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांना खोटे श्रेय घेण्याची संधी मिळाली नसती. जनरल व्हीपी मलिक यांच्या नेतृत्वाखाली भारताने आजपर्यंतचे सर्वात कठीण आणि गुंतागुंतीचे कारगिल युद्ध लढले आणि जिंकले. त्यांनी १९६२ मध्ये लडाख सेक्टरमध्ये भारत-चीन सीमा संघर्षात भाग घेतला होता. त्यांनी नागालँडमधील दहशतवादविरोधी कारवाई, श्रीलंकेतील भारतीय शांतता दल आणि मालदीवमधील ऑपरेशन कॅक्टसमध्ये सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांनी कारगिल फ्रॉम सरप्राईज टू व्हिक्टरी आणि इंडियाज मिलिटरी कॉन्फ्लिक्ट्स अँड डिप्लोमसी: ॲन इनसाइड व्ह्यू ऑफ डिसिजन मेकिंग ही दोन पुस्तके देखील लिहिली आहेत

## मतमोजणीत घोटाळ्याचा ...

अधिकृत एजंट मतदान केंद्रांवर उपस्थित होते आणि कुठल्याही वेळी काँग्रेसच्या एजंटांनी कोणतीही तक्रार केलेली नाही. राहुल गांधी यांनी केलेल्या आणखी एका आरोपानुसार, निवडणूक आयुक्त व मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत केंद्र सरकारचा अतिरेक झाला आहे, कारण त्या प्रक्रियेतून भारताचे सरन्यायाधीश यांना वगळण्यात आले आहे. या आरोपावरही आयोगाने उत्तर देताना सांगितले, ही वक्तव्ये निराधार असून, अशा प्रकारचे आरोप यापूर्वीही काँग्रेसने केले होते. त्यावेळी दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी आयोगाने अधिकृत उत्तर देऊन संपूर्ण माहिती सार्वजनिक केली होती, जी अजूनही आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आघाडीकडून चांगली कामगिरी झाली होती. परंतु, लगेचच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आघाडीला केवळ ४६ जागा मिळाल्या, आणि भाजपप्रणीत युतीने स्पष्ट बहुमत मिळवले. या दरम्यान राहुल गांधी यांनी असा दावा केला की, पाच महिन्यांत ७० लाख नविन मतदारांची भर घातली गेली. मात्र आयोगाच्या आकडेवारीनुसार, केवळ ४०.८१ लाख मतदारांची नोंद झाली होती. जी दरवर्षी होणाऱ्या नियमित अद्ययावत प्रक्रियेचा एक भाग आहे.

# माहिती कळवा व 1 लाखाचे बक्षीस मिळवा: जिल्हा सल्लागार समितीची सभा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ७ :** ६ जून रोजी दुपारी ४ वाजता पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय येथे जिल्हा सल्लागार समिती सभा घेण्यात आली सदर सभा डॉ.वंदना पटोकार यांचे अध्यक्षते खाली सर्व समिती सदस्य डॉ.सिमा तायडे, स्त्री रोग तज्ञ डॉ. तेजस्वीनी देसकर बाल रोगतज्ञ, श्रीमती प्रतिभा अवचार सामाजिक कार्यकर्ता, डॉ.राजेश्री भुईभार, वैद्यकिय अधिकारी, डॉ.निशांत रोकडे वैद्यकिय अधिकारी यांचे उपस्थितीत घेण्यात आली.

सदर सभेमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालयास सोनोग्राफी केंद्राधारकाकडून नोंदणी/पुर्ननोंदणी बाबतचे प्राप्त अर्जाबाबत माहिती अँड .शुभांगी ठाकरे, विधी समुपदेशक, पी.सी.पी.एन.डी.टी.कार्यक्रम यांनी सभेत मांडली सदर अर्जावर चर्चा होऊन ठराव घेण्यात आले. अकोला जिल्हयात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यक्षेत्रात एकुण ३६ सोनोग्राफी केंद्र व १८ गर्भपात केंद्र नोंदणीकृत आहेत. गर्भलिंग निदान किंवा अवैध गर्भपात करणे तसेच त्याकरिता मदत करणे हे सर्व गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व गर्भलिंग निदान प्रतीबंध कायदा १९९४ (सुधारित २००३) नुसार गंभीर गुन्हा असुन दोषी आढळल्यास संबंधित डॉक्टर, तांत्रिक कर्मचारी अथवा ईतर व्यक्तीला १ लाख दंड व २ वर्षा पर्यंत कारावासाची शिक्षा होवु शकते. तरी जिल्हयात असे प्रकार घडवु नये या करिता डिकॉय केस (स्टीग ऑपरेशन ) राबविण्यात येतात. सन २०२४-२५ मध्ये पी.सी.पी.एन.डी.टी विभाग जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांच्या मार्फत जिल्हया अंतर्गत ३ व विभागीय आदेशा नुसार जिल्हाबाहेर एकुण २ स्टिंग ऑपरेशन करण्यात आले असुन कारंजालाड जि.वाशिम येथे यशस्वी कार्यवाही करुन न्यायालयीन प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

जिल्हयात अवैध गर्भपात तसेच गर्भधारणपुर्व व प्रसुतीपुर्व गर्भलिंग निदान होत असल्यास संकेतस्थळ http:// amchimulgimaha.in वर किंवा टोल फ्री क्रमांक १८००२३३४४७५/१०४ वर तक्रार केल्यावर संबंधिता विरुध्द गुन्हा दाखल झाल्यास माहिती देणाऱ्यास रु.१ लक्ष रुपये बक्षीस शासना मार्फत देण्यात येईल डॉ.तरंगतुषार वारे जिल्हा शल्य चिकित्सक अकोला

ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. तिचा उद्देश लिंग निवडीस प्रतिबंध घालणे, कन्याभ्रुण हत्या थांबवणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. विशेषतः जिल्ह्यातील नागरिक, आरोग्य कर्मचारी किंवा सामाजिक कार्यकर्ते यांनी यासाठी पुढे येणे गरजेचे आहे.

# शेतीच्या कामांना मिळाली गती; मशागतीच्या कामाची लगबग वाढली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**दानापूर, दि. ७ :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने विश्रांती घेतल्यामुळे दानापूर परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सततच्या पावसामुळे थांबलेल्या मशागतीच्या कामाची लगबग सुरू झाली आहे.

यंदा मे महिन्यातच पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांना पावसाळा लवकर येण्याची चाहूल लागली आहे. तसेच या पावसामुळे शेती मशागत करणे सोयी झाले आहे. पेरणीपूर्व मशागतीची कामे वेळेवर पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याने शेतकरी मिळेल त्या अवजारांचा उपयोग करून किंवा यंत्राच्या, ट्रॅक्टर, बैलजोडीच्या सहाय्याने नांगरणी व वखरणीसाठी शेतामध्ये लागलेले आहेत. दानापूरसह परिसरातील गावांमधील शेतकऱ्यांनीही शेतातील मशागत सुरू केली आहे. दानापूर गावातील शेतकरी लोकांना उन्हाळी ज्वारी, भुईमूग, मुंग,मक्का, कांदा, पीक काढण्यात अवकाळी पाऊस मोठ मोठी अडचण ठरला होता. या अस्मानी संकटामुळे कास्तकार हवालदिल झाला आहे.

पावसाळ्यातील पिके घेण्यासाठी शेतीच्या मशागती जोरात सुरू झाली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस पावसाचा खंड राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे खरीप हंगामासाठी बी-बियाणे आणि खतांची तयारीही सुरू झाली आहे. शेतकरी आता नव्या हंगामासाठी सज्ज होत आहेत.

# विदर्भ माउली श्री संत वासुदेव महाराज पालखीचे अकोला शहरात आगमन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** वारकरी भक्त जणांचे श्रद्धास्थान परमपूज्य श्री संत वासुदेव महाराज पंढरीचे निष्ठावंत वारकरी होते त्यांच्या पंढरीनाथांच्या दर्शनाचा गेल्या सोळा श्रीक्षेत्र श्रद्धा सागर अकोट येथून वर्षापासून सुरू असलेला पंढरपूर पायी पालखी सोहळा अकोला शहरात ९ तारखेला आगमन होत आहे.

राज राजेश्वर नगरी अकोला मध्ये सदर पालखी सोहळा नऊ तारखेला सायंकाळी सहा वाजता खंडेलवाल धर्मशाळा रेल्वे स्टेशन चौक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पालखी सोहळ्याचे पूजन व स्वागत करण्यात येईल. त्यानंतर हा पालखी सोहळा दत्त मंदिर तापडिया नगर मार्गे माजी आमदार वसंतराव कोठारे यांच्या निवासस्थानासमोर सातव चौक येथून कोलटकर मंगल कार्यालय येथे रात्रीचा मुक्काम श्री गोपाळराव दौड व परिवारातर्फे आयोजित करण्यात आला आहे. दिनांक १० ला सकाळी पालखी सोहळा गुप्ते मार्ग वामनराव फुंडकर व परिवार जटर्फेट स्टेट बँक लहान मुंबई मार्गे लोखंडे संतोष सावरकर गजानन महाराज मंदिर मार्गे मोठी उमरी स्थिती विठ्ठल मंदिर येथे दुपारचा विसावा व भोजन राहील. पालखी सोहळा दुपारी लहान उंबरी राऊतवाडी जठारपट चौक मार्गे रतनलाल प्लॉट सिव्हिल लाईन चौक शास्त्रीनगर राम मंदिर मार्गे हाय ना विद्याविहार होस्टेल समोरून दूध डेरी रोडने जवाहर नगर चौक मुकुंद नगर गजानन महाराज मंदिर येथे रात्रीचा मुक्काम राहील. पालखी सोहळा सकाळी ११ ला मुकुंद नगर गजानन पेठ मार्गे प्राध्यापक गोपाल झांबरे हनुमान मंदिर हनुमान नगर मार्गे जयदीप सोनखा सकर व मित्रपरिवार, टेलिफोन कॉलनी चतुर्भुज कॉलनी राम मंदिर मार्गे संताजी नगर रवी नगर मार्गे गोविंदा लेआउट मधून चारता नगरी राजेंद्र मोहकर यांच्याकडून पवित्रकार परिवार त्यांच्याकडे दुपारचा भोजन व विसावा राहील. दुपारी पालखी सोहळा आरसीसी क्लास समोरून गोरक्षण रोड मार्गे सहकार नगर पंकज जायले व परिवार गजानन महाराज मंदिर समोरून संत तुकाराम महाराज चौक कोठारी वाटिका हनुमान मंदिर येथे श्रीधरराव टीकार तुमच्याकडे रात्रीचा मुक्काम व निवास राहील. पालखी सोहळा १२ तारखेला सकाळी दत्त मंदिर मित्र परिवारातर्फे फराळ व तेथून होळकर चौक मार्गे आमदार अमोल मिटकरी यांच्याकडे स्वागत होईल. त्यानंतर सिंधी कॅम्प पाटील दूध डेरी येथे हभप. वासुदेवराव महल्ले यांच्याकडे दुपारचा विसावा व भोजन राहील. त्यानंतर पालखी सोहळा पोलीस अधीक्षक कार्यालय समोरून अशोक वाटिका मार्गे बस स्टॅन्ड समोर निशाण टावर येथे स्वागत होईल. त्यानंतर पालखी सोहळा जुने शहर मार्गे प्रभात किड्स वाशिम बायपास येथे डॉक्टर गजानन नारे यांच्याकडे सायंकाळचा मुक्काम व निवास राहील. दुसऱ्या दिवशी सकाळी पालखी सोहळा वाशिम रोडने पंढरपूर करिता रवाना होईल. या पालखी सोहळ्यामध्ये अकोला शहरातील भक्त जणांनी सहभागी होऊन दर्शन व श्रवणाचा लाभ घ्यावा तसेच उपस्थिती दर्शवावी असे अकोला शहर पालखी सोहळा स्वागत समितीच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकाने जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे केले स्वागत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कुरणखेड, दि. ७ :** राष्ट्रीय राज्य महामार्गावर होणाऱ्या अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी स्थापन झालेल्या वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकाने पर्यावरणाचा संदेश देत नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक यांचे स्वागत केले आहे

बोरगाव मंजू पोलीस स्टेशनच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर अनेक अपघात व्हायचे या अपघातग्रस्त नागरिकांना मदत पोहोचवावी या भावनेतून कुरणखेड येथे वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकाची सुरुवात केली अपघात ग्रस्तांना तातडीने मदत पोहचवावी त्यांना प्रथमोपचार देऊन त्यांनी अनेक जिव वाचविले आहे बोरगाव मंजू पोलीस स्टेशन येथे अपुरे पोलीस बळ पाहता २०१९ मध्ये बोरगाव मंजू येथील तत्कालीन पोलीस हेडकॉन्स्टेबल ,दिपक कानडे, योगेश काटकर,यांच्या मार्गदर्शनात वीर भगतसिंग आपत्काली शोध व बचाव पथकाची स्थापना करण्यात आली होती या पथकाच्या माध्यमातून महामार्गावर होणाऱ्या अपघातग्रस्तांना तातडीने मदत महामार्गावर दुतर्फा प्रभावित झालेली वाहतूक सुरळीत करणे त्याचबरोबर याच कुरणखेड गावातुन जानार्या गावात काटेपूर्णा नदीवर जिल्हाचा गणेश घाट आहे जिल्ह्यातून गणेश मूर्ती, दुर्गा विसर्जन याच घाटावरती होते या घाटावरती कुठलाही अनुचित प्रकार घडवू नये म्हणून या पथकाने सेवा दिली आहे आतापर्यंत अनेकांना जीवनदान दिले असून अनेक मृत देह शोधणे , पुराच्या पाण्यातून विहिरीतून जीवनदान देण्याचं काम त्या पथकाने केला आहे बोरगाव मंजू पोलिसांना सहकार्य या पथकाच्या माध्यमातून होत आहे पोलिसांचे अपुरे पोलीस बळ पाहता या पथकामध्ये पोलिसांना सहकार्याची भूमिका ठेवत या पथकाने माणुसकी जोपासत आपले कार्य सुरू ठेवले आहे नुकतेच अकोला जिल्ह्यामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून अर्चित चांडक हे नव्याने रुजु झाले आहे त्यांचे कुरणखेड येथील वीर भगतसिंग आपत्कालीन बचाव पथकाने पर्यावरणाचा संदेश देत त्यांना वटवृक्षाचे रोपटे भेट देत त्यांचा सन्मान करत त्यांचे अकोला नगरीत स्वागत केले आहे यावेळी वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख योगेश विजयकर, अध्यक्ष विजय माल्टे, शाहबाज शहा, मोहन वाघमारे, सैय्यद माजिद, उमेश माल्टे,ईश्वर हरणे, अजय माल्टे,शुभम कातखेडे, शुभम दामोदर,अक्षय मोरे,मोईन,वसिम ठेकेदार, हे सदस्य उपस्थित होते.

# दुचाकी अपघातात महिलेचा दुर्दैवी मृत्यू; दानापूर परिसरात शोककळा

## लग्नसमारंभ आटोपून परतताना घडली घटना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**दानापूर, दि. ७ :** अकोला येथे लग्न समारंभआटोपून परत येत असताना झालेल्या दुर्दैवी अपघातात पत्नीचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना दि. ५ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता दानापूर येथे घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

दानापूर येथील रहिवासी सुनील सुरजुसे हे पत्नी सविता सुरजुसे यांच्यासह दि. ५ जून रोजी सकाळी अकोल्याला लग्नासाठी गेले होते. संध्याकाळी परत येत असताना माळेगाव रस्त्यावरील दानापूर शिवारात राऊत यांच्या शेताजवळ ही दुर्दैवी घटना घडली. दुचाकीच्या मागे बसलेल्या सविता सुरजुसे यांच्या गळ्यातील स्टोल मागील चाकात अडकला आणि त्या खाली पडल्या. डोक्यावर गंभीर मार लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. घटनेनंतर सुनील सुरजुसे यांनी प्रसंगावधान राखून तेल्हारा डेपोची एसटी बस थांबवून पत्नीला तातडीने बसमध्ये बसवले आणि तेल्हारा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र तपासणीनंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणय जंगडाळे यांनी सविता सुरजुसे यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, त्यांच्या पश्चात पती, दोन मुली आणि लहान मुलगा असा परिवार आहे.

# जप्त केलेली वाहने सोडण्याचे उच्च न्यायालयाचे वन विभागाला आदेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** अकोला येथील वन विभागाच्या अधिकृत अधिकाऱ्याने १८ नोव्हेंबर २०१९ रोजी छापा टाकताना माहितीच्या आधारे १० ट्रक आणि एक पोकलँड जप्त केला होता. वन विभागाने या जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्यासाठी निविदा प्रक्रिया जारी केली होती. वनविभागाच्या या आदेशाविरुद्ध, ट्रक आणि पोकलँड मालकांनी अकोटच्या अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी आणि सत्र न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत विद्य.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी विद्य. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने ती जप्त केलेली वाहने सोडण्याचे आदेश वन विभागाला दिले आहेत. नियमानुसार, जिल्हा प्रशासनाने शेततळे बांधण्यासाठी आणि मुरूम इतर ठिकाणी नेण्यासाठी जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्यासाठी वन विभागाने निविदा प्रक्रिया जारी केली होती. या आदेशाविरुद्ध चालकांनी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी केल्यानंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्व वाहने सोडण्याचे आदेश जारी केले. माहितीनुसार, वन विभागाने जप्त केलेली वाहने सोडण्याचे आदेश काही प्रकरणांमध्ये दिले जातात, या संदर्भात, ही वाहने सोडण्याचा हा विषय बराच चर्चेत आहे. न्यायालयीन सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अकोला येथील वन विभागाच्या अधिकृत अधिकाऱ्याने १८ नोव्हेंबर २०१९ रोजी छापा टाकताना माहितीच्या आधारे १० ट्रक आणि एक पोकलँड जप्त केला होता. वन विभागाने या जप्त केलेल्या वाहनांचा लिलाव करण्यासाठी निविदा प्रक्रिया जारी केली होती. वनविभागाच्या या आदेशाविरुद्ध, ट्रक आणि पोकलँड मालकांनी अकोटच्या अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर न्यायाधीशांनी वाहन मालकांची याचिका फेटाळून लावली. कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध, वाहन मालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ऍड. कमल आनंदानी, दर्शना आनंदानी, भावेन सुचक यांच्यामार्फत याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. वाहन मालकांच्या वतीने बाजू मांडणाऱ्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, लीलाधर राठी यांनी नागपूरच्या सुधीर कन्स्ट्रक्शन कंपनीला शेततळे बांधण्याचे कंत्राट दिले होते. तलाव बांधण्यासाठी ट्रक आणि पोकलँडची आवश्यकता असल्याने कंपनीने निविदा प्रक्रिया जारी केली होती. ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, कंत्राटदाराने काम सुरू केले. शेततळ्याच्या उत्खननादरम्यान, कंत्राटदाराने जिल्हा दंडाधिकाऱ्यांना तेथून निघालेल्या खडीबद्दल शुल्क म्हणून ३५ लाख रुपये दिले होते. वाळू वाहून नेताना वन अधिकाऱ्यांनी ट्रक जप्त केले होते. विद्य.सत्र न्यायालयात याचिका फेटाळल्यानंतर, वन विभागाने अपील दरम्यान उत्तर दाखल केले की, जेव्हा ट्रक जप्त केले गेले तेव्हा त्यात विविध प्रजातींची २८ झाडे होती, परंतु ती तुटलेली असल्याने त्यांचा वापर पाणी साठवण्यासाठी केला जात होता. वाहन मालकांच्या वतीने बाजू मांडणाऱ्या वकिलांनी सांगितले की, जेव्हा वन विभागाने ट्रक जप्त केले तेव्हा त्यात वन विभागाची मालमत्ता नव्हती, फक्त शेततळ्यातील वाळू होती. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीशांनी वन विभागाला ट्रक आणि पोकलँड मशीन सोडण्याचे आदेश दिले. माहितीनुसार, वन विभागाच्या कारवाईदरम्यान जप्त केलेल्या सुमारे ९८ टक्के वाहनांना सूट मिळत नाही, परंतु या प्रकरणात उच्च न्यायालयाने वाहन मालकांना मोठा दिलासा दिला आहे.

# जन सुरक्षा विधेयक म्हणजे लोकशाही अधिकारावर घाला - हंसराज शेंडे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** व्यक्ती व संघटनांना बेकायदा ठरवण्याचे अमर्याद अधिकार राज्य सरकारच्या हातात देणाऱ्या जन सुरक्षा विधेयकाच्या विरोधात समाज क्रांती आघाडी या सामाजिक संघटनेच्या वतीने शासकीय विश्रामगृह अकोला येथे समाज क्रांती आघाडी चे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज शेंडे यांच्या मार्गदर्शनात पार पडली.

राज्य सरकार शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी हा कायदा करत असल्याचे सांगत असले तरी प्रत्यक्षामध्ये सरकारच्या धोरणाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या व आवाज उठवणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनेच्या विरोधात, या विधेयकामुळे सरकारच्या हातात कारवाईचे बेसुमार अधिकार एकवटणार आहेत. सरकारी धोरणांच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनांना राज्य सरकार बेकायदेशीर ठरवून त्यांच्यावर कारवाई करु शकणार आहे. दोन ते सात वर्षांपर्यंत शिक्षा व अशी व्यक्ती, व्यक्तीचे नातेवाईक व अशा संघटनांच्या मालमत्ता जप्त करण्याचे अमर्याद अधिकार या विधेयकाच्या अन्वये राज्य सरकारला प्राप्त होणार आहेत. राज्य सरकारच्या धोरणांची व निर्णयांची कोणत्याही प्रकारची चिकित्सा करणे यामुळे अशक्य होऊन जाणार आहे.

सरकारला विरोध करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनेवर या कायद्यान्वये कारवाई होणारकेवळ राजकीय पक्ष किंवा संघटनाच नव्हे तर पत्रकार, बुद्धिजीवी, कवी, लेखक, यूट्यूब चैनल असे कुणीही सरकारच्या धोरणाची चिकित्सा करू शकणार नाही. सरकारला विरोध करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनेवर सरकार या कायद्यान्वये कारवाई करू शकणार आहे. संविधानाने दिलेल्या लोकशाही अधिकारावर हा घाला आहेच, शिवाय सर्व प्रकारच्या अभिव्यक्तींचा संकोच करणारी ही कृती आहे. समाज क्रांती आघाडी यांच्या पुढाकाराने या विरोधात आज बैठक आयोजित करण्यात आली होती.

# वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक कुरणखेड पथकाचे काटेपूर्णा प्रकल्प येथे प्रशिक्षण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कुरणखेड, दि. ७ :** आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकाचे प्रशिक्षण काटेपूर्णा प्रकल्प महान येथे झाले. त्यात जिल्ह्यातील विविध ठिकाणांवरील पथकांच्या सदस्यांनी भाग घेतला.

जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या आदेशानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनात व तहसीलदार बार्शिटाकळी राजेश वजिरे, मूर्तिजापूर येथील नायब तहसीलदार रवींद्र राऊत यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण झाले. मार्गदर्शक म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद पथक नागपूरचे मार्गदर्शक प्रशिक्षक उपस्थित होते यावेळी गेल्या अनेक वर्षांपासून आपत्ती व्यवस्थापनामध्ये कार्यरत असलेल्या कुरणखेड येथील वीर भगतसिंग आपत्कालीन शोध बचाव पथकातील सदस्यांना राज्य आपत्ती दलातर्फे प्रशिक्षण देण्यात आले यामध्ये फ्लोटिंग डिव्हाइस, बोट प्रशिक्षण, अपघातग्रस्तांना मदत कशी करावी या सर्व बाबींचे

पोलिस निरीक्षक अमोल गोखले, एस. एम. गाडगे, आर, आर. मेहरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संदीप साबळे, संत गाडगेबाबा आपत्कालीन पथक पिंजर दिपक सदाफळे, आपदा मित्र प्रशिक्षक टीमचे आंबे,सुभान बागवान, यांच्या उपस्थितीत पूरस्थिती निवारण शोध व बचाव प्रथमोपचार, फ्लोटिंग डिव्हाइस, बोट प्रशिक्षण आदींची माहिती देण्यात आली. पुढील मान्सून कालावधीच्या अनुषंगाने विविध स्तरावरील घटक प्रशिक्षित असावेत यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले.यावेळी विर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक सदस्य योगेश विजयकर, विजय माल्टे, शाहबाज शहा, मोहन वाघमारे, सैय्यद माजिद, उमेश माल्टे,ईश्वर हरणे, अजय माल्टे, शुभम दामोदर,अक्षय मोरे,मोईन,वसिम ठेकेदार, हे सदस्य उपस्थित होते.

# चंद्रभागा नदीपात्र स्वच्छतेसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार

पंढरपूर, दि. ७ प्रतिनिधी

आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक चालत येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळ या ठिकाणी सुविधा देण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. तसेच या काळात पालखी सोहळ्याव्यतिरिक्त लाखो भाविक पंढरपुरात येतात. अशा सर्व भाविकांच्या राहण्याची व्यवस्था पंढरपूर शहरात करण्यात यावी, यासाठी प्रशासनाने तयारी करावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

पंढरपूर येथील केबीपी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित आषाढी वारी सोहळा २०२५ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते.

## थोडक्यात

### भाविकाच्या हातातील पर्स हिसकावून माकड फरार



**वृंदावन :** ; वृंदावनमधील बांके बिहारी मंदिर परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे भाविक व स्थानिकांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. अलीगढवरून श्री बांके बिहारींच्या दर्शनासाठी आलेले भाविक अभिषेक अग्रवाल यांच्याकडील पर्स एका माकडाने पळवली आहे. माकडाने त्यांच्या हातातली पर्स हिसकावली आणि तिथून धुम ठोकली. धक्कादायक बाब म्हणजे अग्रवाल यांनी या पर्समध्ये जवळपास २० लाख रुपयांचे दागिने ठेवले होते.अभिषेक अग्रवाल हे यांच्या कुटुंबियांसमवेत दर्शनाच्या रांगेत उभे होते. त्याच वेळी एक माकड तिथे आलं. त्या माकडाने अग्रवाल यांच्या हातातील पर्स पाहून त्यांच्या दिशेने धाव घेतली. माकडाने त्यांच्या अंगावर उडी मारून हातातील पर्स हिसकावली. पर्स अग्रवाल यांच्या हातून निसटताच माकडाने तिथून धुम ठोकली. या पर्समध्ये सोन्याचे दागिने होते. चेन, बांगड्या, झुमक्यांसह हिऱ्यांचे दागिने या पर्समध्ये ठेवले होते. सर्व दागिन्यांसह पर्स घेऊन माकड तिथून बेपत्ता झालं आहे. माकड तिथून पळून जात असताना काही लोकांनी त्या माकडाला फ्रुटी (पेय) व इतर खाद्यपदार्थांचं अमिष दाखवून आपल्याकडे बोलावण्याचा प्रयत्न केला मात्र, माकड काही आलं नाही. त्याने तिथून पळ काढला.

### विधिमंडळ सचिवालयातील माजी कर्मचाऱ्याला १० वर्षांचा तुरुंगवास

**मुंबई :** बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याच्या आरोपाप्रकरणी राज्य विधिमंडळ सचिवालयातील माजी रोखपालाला विशेष न्यायालयाने दहा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. विशेष न्यायालयाचे न्यायाधीश एस. ई. बांगर यांनी मनोज गावकर यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरवून दहा वर्षांची शिक्षा सुनावली. न्यायालयाने गावकर यांना ५० हजार रुपयांचा दंडही सुनावला. सरकारी सेवक म्हणून काम करताना गावकर यांनी मार्च १९९१ ते डिसेंबर २००४ दरम्यान सरकारी निधीचा गैरवापर केला आणि त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या स्रोतांपेक्षा जास्त मालमत्ता जमवली, असा त्यांच्यावर आरोप होता. या प्रकरणी २०१३ मध्ये गावकर यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला होता. चौकशीत गावकर यांनी ५२,३५,५६४ रुपयांचा गैरवापर केल्याचे उघड झाले. न्यायालयाने गावकर यांना त्यांच्यावरील आरोपांत दोषी ठरवताना ते एक सार्वजनिक सेवक असून त्यांनी त्यांच्या उत्पन्नापेक्षा अधिकची संपत्ती जमा केल्याचे उघड झाले आहे. सुनावणीच्या वेळी गावकर हे या संपत्तीचा हिशोब देण्यात अपयशी ठरले. त्यामुळे, गावकर यांना भ्रष्टाचार करून बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याच्या आरोपांत दोषी ठरवण्यात येत असल्याचे न्यायालयाने निकालात म्हटले. दरम्यान, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या वाढत आहे, परंतु फारच कमी प्रकरणांत गुन्हे सिद्ध होऊन आरोपींना शिक्षा सुनावली जात आहे, असा दावा करून सरकारी पक्षाने गावकर यांना कठोर शिक्षा सुनावण्याची मागणी केली होती.

### 'अपाचे' हेलिकॉप्टरचे आपत्कालीन लँडिंग



**सहारनपूर :** उत्तर प्रदेशातील सहारनपूर जिल्ह्यात लष्कराच्या लढाऊ हेलिकॉप्टरचे शुक्रवारी आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. सदर 'अपाचे' हेलिकॉप्टर सारसावा हवाई दल तळावरून नियमित सराव करण्यासाठी निघाले होते. याचदरम्यान तांत्रिक बिघाडामुळे आपत्कालीन लँडिंग करावे लागले. हेलिकॉप्टरमधील दोन्ही पायलट पूर्णपणे सुरक्षित आहेत. तसेच लँड केलेले हेलिकॉप्टर 'अपाचे' असल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेची चौकशी लष्करी पातळीवर सुरू आहे.आपत्कालीन लँडिंगनंतर लष्कर आणि पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचले होते. लष्कराची तांत्रिक टीम देखील हेलिकॉप्टरची चौकशी करत आहे. अपघातात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नाही आणि लँडिंग सुरक्षितपणे झाल्यामुळे येथे मोठी दुर्घटना टळली. स्थानिक लोकांनीही घटनास्थळी पोहोचून पथकाला मदत केली. या घटनेचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला आहे.

# चीनसह ब्रिक्स देशांकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध

## पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव

**नवी दिल्ली, दि.७** वृत्तसंस्था

शुक्रवारी (६ जून) ब्राझीलायामध्ये ब्रिक्स परिषदत पार पडली. या परिषदेत ब्रिक्सच्या समुदायाने जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम हल्लाचा निषेध केला. तसेच दहशतवादाविरुद्ध एकत्र कारवाईचा संकल्पदेखील केला. याच पाकिस्तानला एक मोठा झटका बसला. चीनसह अनेक मुस्लिम देशांनी देखील पहलगाम हल्ल्याची निंदा केली.ब्रिक्स संसदीय पॅनलमध्ये, भारत, ब्राझील, चीन, दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश आहे. तसेच इराण, संयुक्त अरब अमिराती, इजिप्त, इथिओपिया आणि इंडोनेशियाचे प्रतिनिधीदेखील या परिषदेसाठी उपस्थित होते. या बैठकीचे नेतृत्त्व भारताच्या लोकसभेचे खासदार ओम बिर्ला यांनी केले. दरम्यान, या ब्रिक्स परिषदेत ओम बिर्ला यांनी दहशतवाद जागतिक संकट बनत चालला असल्याचे सांगतिले. त्यांनी म्हटले की, दहशतवादविरोधी कारवाईसाठी जागतिक देशांनी एकत्र येण्याची गरज आहे, तरच दहशतवादाचा सामना करता येईल, असे बिर्ला यांनी म्हटले.यासाठी त्यांनी चार प्रमुख पावले




उचलण्याचे आवाहन ब्रिक्स देशांना केले. यात दहशतवादी संघटनांना निधी देणे थांबवणे, गुप्तचर माहितीची देवाण-घेवाण वाढवणे, तंत्रज्ञानाचा गैरवापर रोखणे आणि तपास व न्यायालयीन कार्यवाहीत एकमेकांना सहकार्य करणे या मुद्द्यांचा उल्लेख बिर्ला यांनी केला. सर्व देशांनीदेखील त्यांच्या या मुद्द्यांवर सहमती दर्शवली. भारत आणि सुरुवातीपासूनच चीनने पाकिस्तानला पाठिंबा दर्शवला होता. चीनने पाकिस्तानला शस्त्रेदेखील पुरवली होती; पण ब्रिक्स परिषदेदरम्यान चीनने पहलगाम हल्ल्याची निंदा केली आहे. यामुळे हा पाकिस्तानसाठी मोठा धक्का मानला जात आहे.भारताच्या जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. यामध्ये २८ निरापराध लोकांचा बळी गेला. या हल्ल्यानंतर भारताने संताप व्यक्त केला. भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त केली, तसेच या हल्ल्यात पाकिस्तानचा सहभाग असल्याचेही म्हटले जात होते.यामुळे भारताने पाकिस्तानविरोधातही कडक कारवाई केली. दरम्यान भारताच्या कारवाईने पाकिस्तान तिथर बिथर झाला होता.

## वक्फ संपत्तीच्या नोंदीसाठी सरकारचे 'उम्मीद' पोर्टल सुरू

**नवी दिल्ली , दि.७** वृत्तसंस्था

वक्फ संपत्तीचे चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यासह त्याची नोंद ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून 'उम्मीद' नावाचे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. नियमानुसार सहा महिन्यांच्या आत वक्फ संपत्तीची नोंदणी या पोर्टलवर करावी लागेल.



वक्फ संपत्तीच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणण्याच्या अनुषंगाने हे पोर्टल सुरू करण्यात आल्याचे अल्पसंख्याक खात्याचे मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितले. सर्व वक्फ संपत्तींच्या विश्वस्तांना वक्फ संपत्तीबाबत 'उम्मीद' पोर्टलवर सहा महिन्यांत नोंदणी करावी लागेल. यात जिओटॅगिंग आणि डिजिटायझेशनचा समावेश आहे.

निर्धारित वेळेत ज्या वक्फ संपत्तीची नोंदणी केली जाणार नाही, त्यांना बेकायदा जाहीर केले जाईल आणि ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित लवादाकडे पाठवली जातील. पोर्टलच्या माध्यमातून जनजागृतीसाठी आवश्यक ती मदत आणि सेवा प्रदान केली जाणार आहे.

मुस्लिम समाजातील गरीब, निराधार लोक आणि विधवा महिलांच्या भल्यासाठी केंद्र सरकारने वक्फ कायद्यात सुधारणा केली आहे, असा दावा रिजीजू यांनी पोर्टलच्या लोकार्पणावेळी केला. ''देशभरात नऊ लाख वक्फ संपत्ती आहेत. या संपत्तीची नोंदणी संबंधितांना करावी लागेल,'' असे प्रतिपादन रिजीजू यांनी केले.

## महाराष्ट्रासारखी मॅच फिक्सिंग आता बिहारमध्ये

### राहुल गांधींनी केला भाजपवर हल्लाबोल

**नवी दिल्ली, दि.७** वृत्तसंस्था

लोकसभा विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे. एका वृत्तपत्रातील लेखात मॅच फिक्सिंगसारखा घोटाळा केल्याचा आरोप राहुल गांधींनी भाजपवर केला आहे. राहुल गांधी यांनी लेखामध्ये पाच टप्प्यांमध्ये हा सर्व आराखडा मांडत भाजपवर हल्लाबोल केला आहे. इतकेच काय तर राहुल गांधी यांनी आकडेवारीसह निवडणुकीचे संपूर्ण गणित सांगितले आहे.

राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात मतदानानंतर अचानक ७.८३ टक्के मतदान टक्केवारी वाढणे ही इतिहासातील अभूतपूर्व घटना असल्याचे म्हटले आहे. पहिला टप्पा निवडणूक आयोगाच्या नियुक्तीसाठी पॅनेलमध्ये घोटाळा करणं, दुसरा टप्पा बनावट मतदारांचा मतदारयादीत समावेश करणं, तिसरा टप्पा मतदानाची टक्केवारी वाढवणं, चौथा टप्पा बनावट मतदान अशा ठिकाणी करून घेणं जिथं भाजपला जिंकवायचंय आणि पाचवा टप्पा पुरावे लपवणं या टप्प्यांमधून त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या



निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. याशिवाय डुप्लिकेट मतदार असल्याचा गंभीर आरोप राहुल यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी म्हटलं की, भाजप महाराष्ट्रात इतकी हतबल का होती, हे पाहणं कठीण नाही; पण हा घोटाळा मॅच फिक्सिंगसारखा आहे. जो पक्ष धोका देतो तो खेळ जिंकूही शकतो पण संस्थांना फटका बसतो. त्यासोबतच जनतेचा विश्वास नाहीसा करतो. भारतीयांनी पुरावे पाहिले पाहिजेत. त्यांनीच आता यावर निर्णय घ्यावा आणि उत्तर मागावं. कारण महाराष्ट्राची मॅच फिक्सिंग आता पुढच्यावेळी बिहारमध्ये होईल जिथं भाजपचा पराभव होत असेल. निवडणूक आयोगाने विरोधकांच्या सर्व मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचेही राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

भाजप नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राहुल गांधी यांच्या लेखावर टीका करत स्वत:चं अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा ,असं बावनकुळे यांनी म्हटले.

## इलॉन मस्क यांना रशियाची सूचक ऑफर

### डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी वादानंतर मोठी घडामोड

**नवी दिल्ली, दि.७** वृत्तसंस्था

टेस्ला व स्पेसएक्सचे संस्थापक आणि माजी प्रमुख इलॉन मस्क आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील वाद चांगलाच उफाळून आला आहे. एकमेकांवर टीकाटिप्पणी, मस्क यांनी निवडणुकीत केलेली मदत आणि महाभियोगाचे वक्तव्य तर मस्क यांना दिलेली कंत्राटे रद्द करण्याबाबतचे ट्रम्प यांचे वक्तव्य यातून या दोन जागतिक स्तरावरील महत्वाच्या व्यक्तिमत्वांतील वाद अक्षरश: चव्हाट्यावर आला.

या पार्श्वभूमीवर रशियाकडून आता इलॉन मस्क यांच्यासाठी रेड कार्पेट अर्थात रशियात येण्यासाठी पायघड्या घालण्याबाबतचे संकेत मिळू लागले आहेत. रशियाच्या एका वरिष्ठ खासदाराने इलॉन मस्क यांना रशियामध्ये राजकीय आश्रय देण्याची तयारी दर्शवली आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातही खळबळ उडाली आहे.मस्क यांनी ट्रम्प यांच्या 'अर्थसंकल्पीय विधेयकावर कठोर टीका केली होती. त्यांनी सांगितले की, हे विधेयक अमेरिकेवरील राष्ट्रीय कर्जाचा डोंगर




वाढवेल. त्यानंतर दोघांमध्ये सोशल मीडियावर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या.

मस्क यांनी ट्रम्प यांच्यावर बेफिकीर खर्चाचा आरोप केला, तर ट्रम्प यांनी मस्कला ''वेडा'' असे संबोधले आणि त्यांच्याकडून सरकारी करार व सबसिडी काढून घेण्याची धमकी दिली. रशियन संसदेत आंतरराष्ट्रीय घडामोडींसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचे उपाध्यक्ष दिमित्री नोविकोव्ह यांनी या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, ''जर एलन मस्क यांना आश्रय हवा असेल, तर रशिया नक्कीच तो देऊ शकतो.''मात्र त्यांनी असेही नमूद केले की, ''मस्क एक वेगळा खेळ खेळत आहे. त्याला प्रत्यक्षात आश्रयाची गरज भासेल असे वाटत नाही.''रशियन राष्ट्राध्यक्षांचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी या विषयावर बोलण्यास नकार दिला. ''ही अमेरिकेची देशांतर्गत बाब आहे. रशिया यामध्ये कोणतीही ढवळाढवळ करणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

तथापि, ही घटना काहीशी एडवर्ड स्नोडन यांना २०१३ मध्ये रशियाकडून दिलेल्या आश्रयाची आठवण करून देते. तसेच ब्रिटिश ब्लॉग लेखक ग्राहम फिलिप्स यांनाही रशियाने आश्रय दिला होता. दरम्यान, ट्रम्प-मस्क या वादाचे पडसाद अमेरिकन शेअर बाजारातही उमटले.

## बांगलादेशमध्ये सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा; मोहम्मद युनूस यांचे राष्ट्राला उद्देशून भाषण

**ढाका, दि.७** वृत्तसंस्था

बांगलादेशातील आगामी सार्वत्रिक निवडणुकांची तारीख अखेर निश्चित झाली आहे. बांगलादेशाच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार आणि नोबेल शांतता पुरस्कार विजेते डॉ. मोहम्मद युनूस यांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात २०२६ मध्ये एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यात (१ ते १५ एप्रिल दरम्यान) सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार असल्याची अधिकृत घोषणा केली. ईद-उल-अजहाच्या पूर्वसंध्येला केलेल्या या घोषणेमुळे गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या राजकीय तणावाला आणि निवडणुकीच्या



तारखांबाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. डॉ. युनूस यांनी स्पष्ट केले की, निवडणूक आयोग लवकरच एक सविस्तर अहवाल सादर करेल. अंतरिम सरकारने 'सुधारणा, न्याय आणि निवडणूक' या तीन प्रमुख उद्दिष्टांसह कारभार स्वीकारला असून, देशातील सर्वच राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून निवडणूक प्रक्रियेला सर्वमान्य आणि पारदर्शक बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## चीन दुर्लक्षित करता न येणारा घटक-शशी थरूर

**वॉशिंग्टन, दि.७** वृत्तसंस्था

भारताच्या पाकिस्तानसोबतच्या अलीकडील संघर्षात चीन हा पूर्णपणे दुर्लक्षित करता न येणारा घटक आहे, असे काँग्रेस नेते शशी थरूर म्हणाले. भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये अलीकडेच काही प्रमाणात सुधारणा होत असताना ही परिस्थिती उद्भवली, असेही त्यांनी सांगितले.

अमेरिकेच्या दौऱ्यावर गेलेल्या बहुपक्षीय भारतीय संसदीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व करत असलेले थरूर भारतीय दूतावासात आयोजित 'थिंक टँक' प्रतिनिधींसोबतच्या संवादात बोलत होते.चीनचे पाकिस्तानमधील मोठे हितसंबंध आहेत, असे शशी थरूर यावेळी म्हणाले. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (सीपेक) हा 'बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह'अंतर्गत सर्वात मोठा प्रकल्प आहे. शिवाय, पाकिस्तानच्या संरक्षण साहित्यातील ८१



टक्के साहित्य चीनकडून पुरवले जाते. भारत-पाकिस्तान संघर्षात चीन हा पूर्णपणे दुर्लक्षित करता न येणारा घटक आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या संघर्षानंतर भारत-चीन संबंध तणावपूर्ण राहिले असले तरी, गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये दोन्ही देशांमध्ये संबंध सुधारण्यास सुरुवात झाली होती. पण या संघर्षानंतर चीनने पाकिस्तानला दिलेले प्रत्यक्ष समर्थन, अगदी सुरक्षा परिषदेतही, वेगळ्या प्रकारचे होते, असे त्यांनी स्पष्ट केले. आम्हाला आमच्या शेजारील आव्हानांची पूर्ण जाणीव आहे.

## जैश-ए-मोहम्मद दहशतवादी गटाचा खात्मा करा

### अमेरिकन खासदाराने बिलावल भुट्टोंच्या नेतृत्वातील पाकिस्तानी शिष्टमंडळाला फटकारले

**नवी दिल्ली, दि.७** वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांवर कारवाई केली. त्यानंतर भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादाविरोधातील भूमिका सर्वपक्षीय शिष्टमंडळाच्या माध्यमातून जगासमोर मांडली. यासाठी सर्वपक्षीय खासदारांच्या शिष्टमंडळांनी वेगवेगळ्या देशांना भेटी दिल्या. दरम्यान, भारताच्या या निर्णयाची कॉपी करत पाकिस्तानेही वेगवेगळ्या देशांना त्यांच्या खासदारांच्या शिष्टमंडळांना पाठवल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, या अनुषंगाने पाकिस्तानच्या खासदारांना अमेरिकेच्या एका खासदारांनी दहशतवादावरून चांगलंच फटकारलं आहे. पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बिलावल भुट्टो यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानी शिष्टमंडळ



नुकतंच अमेरिकेत गेलं होतं. तेव्हा या पाकिस्तानी शिष्टमंडळाला अमेरिकेतील एका खासदारांनी चांगलेच खडेबोल सुनावल्याचं सांगितलं जात आहे.

अमेरिकन काँग्रेसचे सदस्य ब्रॅड शेरमन यांनी पाकिस्तानला चांगलंच फटकारलं आहे. पाकिस्तानने दहशतवादी संघटनांचा नायनाट केला पाहिजे, त्यासाठी आवश्यक ती सर्व पावलं उचलली पाहिजेत, तसेच पाकिस्तान स्थित जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेविरोधात निर्णायक कारवाई केली पाहिजे. कारण ही संघटना पत्रकार डॅनियल पर्ल यांच्या हत्येसाठी जबाबदार आहे, असं ब्रॅड शेरमन यांनी म्हटलं आहे. याबाबत ब्रॅड शेरमन यांनी एक्सवर (ट्विटर) एक पोस्टदेखील शेअर केली आहे. तसेच पाकिस्तान स्थित जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी गटाला संपवण्यासाठी आणि प्रदेशातील दहशतवादाशी लढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचंही ब्रॅड शेरमन यांनी म्हटलं आहे. दरम्यान, २००२ मध्ये वॉल स्ट्रीट जर्नलचे रिपोर्टर डॅनियल पर्ल यांचं अपहरण आणि हत्या प्रकरणात दहशतवादी उमर सईद शेखला दोषी ठरवण्यात आलं होतं. दरम्यान, ब्रॅड शेरमन यांनी पाकिस्तानमधील धार्मिक अल्पसंख्याकांच्या स्थितीबाबतही चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटलं की, ''ख्रिश्चन, हिंदू आणि अहमदिया मुस्लिम यांना हिंसाचार, छळ, भेदभाव किंवा असमानतेच्या भीतीशिवाय त्यांच्या श्रद्धेचे पालन करण्याची आणि लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची परवानगी दिली पाहिजे'', असंही ब्रॅड शेरमन यांनी म्हटलं आहे.

## पाच रुपयांचे पार्लेजी बिस्किट ८० रुपयांना, लेकीसाठी घेतले; गाझातील बापाची पोस्ट व्हायरल

**नवी दिल्ली, दि.७** वृत्तसंस्था

भारतात ज्या बिस्किटाची किंमत फक्त ५ रुपये आहे तेच बिस्किट पश्चिम आशियातील गाझामध्ये ८० रुपयांना विकलं जात आहे. सोशल मीडियावर एका मुलीच्या बापानं याबाबत केलेली पोस्ट व्हायरल झालीय. मुलीसोबतचे फोटोही यात पोस्ट करण्यात आले आहेत. त्यात म्हटलंय की, बराच वेळ वाट बघितल्यानंतर शेवटी मुलीला आवडतं बिस्किट मिळालं.

मोहम्मद जावेद नावाच्या तरुणाने पोस्टमध्ये म्हटलं की, बराच काळ वाट पाहिल्यानंतर मला मुलगी रविफसाठी तिचं आवडतं बिस्किट मिळालं. पण याची किंमत दीड युरोवरून २४ युरोपेक्षा जास्त झालीय. तरीही मुलीला तिचं आवडतं बिस्किट घेऊन देण्यासाठी नकार देऊ शकलो नाही. तरुणाने ही पोस्ट एक जूनला केली असून ती





व्हायरल झाली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून गाझामध्ये हमास आणि इस्रायल यांच्या संघर्षामुळे भीषण अन्नटंचाई निर्माण झालीय. या अन्नटंचाईचं भीषण वास्तव पुन्हा एकदा समोर आलं आहे. जावेदची ही पोस्ट आतापर्यंत १० लाखांहून अधिक लोकांनी पाहिलीय. जावेदने ज्या बिस्किटाचा उल्लेख केलाय ते पार्लेजी बिस्किट आहे. भारतात याची किंमत ५ रुपयांपासून ८० रुपयांपर्यंत आहे.

काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्राच्या एका रिपोर्टनुसार गेल्या २० महिन्यांपासून गाझा युद्धाच्या झळा सहन करत आहे. गाझातील लोकांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. गोदामं रिकामी झाली आहेत, सार्वजनिक जेवणाची व्यवस्था बंद झालीय. लोक जेवण सोडत आहेत. २५ किलो आट्यासाठी ३६० अमेरिकन डॉलर मोजावे लागत आहेत. मुलांना एकाच वेळेचं जेवण दिलं जात असल्याचंही समोर आलं आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# सैनिकी शिक्षण देणार, पण कोणाच्या जीवावर?



शिक्षण वार्ता

जयदीप सोनखासकर
मो. 9890508017

महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागात नित्य नवे प्रयोग नेहमी होत असतात. अमुक शिक्षण देणार तमुक शिक्षण देणार,महाराष्ट्र शिक्षण समृद्ध करणार अशा वलग्ना येथील नेते, मंत्री सदैव करीत असतात. अशा सवंग लोकप्रियता मिळवणाऱ्या घोषणा केल्यामुळे कदाचित जनतेमध्ये त्यांच्याविषयी आपुलकी निर्माण होत असेल परंतु घोषणा करण्यापूर्वी तीची अंमलबजावणी कशी होईल याकडे मात्र या नेत्यांचे साफ दुर्लक्ष होत असते. शिक्षण क्षेत्रात सध्या सैनिकी शिक्षणाची चर्चा ऐकायला येत असून ते देणार कोण? आणि कसे? याबाबतची ठोस भूमिका मात्र अद्याप स्पष्ट नाही. त्यामुळे शिक्षण विश्वहा प्रश्न विचारते आहे की, सैनिकी शिक्षण देणार पण कोणाच्या जीवावर?

भारत पाकिस्तानच्या अलीकडे झालेल्या युद्ध धुमश्चक्रीनंतर देशात देशसेवेला उधान आले आहे. तिरंगा रॅली व इतर उपक्रम राबवून आम्हीच कसे सैनिकांसाठी प्रोत्साहन देत आहोत हे दाखवण्याची जनू स्पर्धा लागली आहे. एक वेळचं हे देशप्रेम समजून घेता येईल परंतु महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाचे इयत्ता पहिलीपासून सैनिक शिक्षण लागू करण्याच्या सवंग घोषणेमुळे त्यात अधिक भर पडली आहे. वास्तविक पाहता पहिलीपासून च्या विद्यार्थ्यांचे सैनिकी शिक्षण घेण्याचे वय नसते. शिक्षण हक्क कायद्यानुसार सुद्धा त्यांना आनंददायी शिक्षण कसे देता येईल हे प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात नमूद केले आहे. इयत्ता एक ते आठ पर्यंत विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी आजपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. मात्र अशात या विद्यार्थ्यांना सैनिक शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र शासन कोणती उपाययोजना करीत आहे.

हे सैनिक शिक्षण देण्यासाठी शासन माजी सैनिकांची नियुक्ती करणार आहे. आता प्रश्न आहे की सैनिकांना जेव्हा ते प्रशिक्षण घेतात तेव्हा बॉर्डरवर केवळ शूट चा आणि शत्रूवर तुटून पडण्याचा आदेश दिलेला असतो. असे प्रशिक्षण घेतलेले सैनिक ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना कसे शिक्षण देणार? विद्यार्थ्यांचे बालमानसशास्त्र आणि सैनिकांचे



सेवेतील मानसशास्त्र याचा सरकारने कुठला ताळमेळ लावला हे समजत नाही. सैनिकांचे कठोर शिस्त आणि विद्यार्थ्यांचे बालमानसशास्त्र याचा कुठलाच मेळ बसत नाही. त्यामुळे असे सैनिकी शिक्षण देणे हे चुकीचेच ठरते.

सैनिकी शिक्षण देण्याला आमचा विरोध नाही मात्र या संदर्भात होणाऱ्या माजी सैनिक शिक्षक भरतीला आमचा विरोध आहे. आधीच महाराष्ट्रात २०११ पासून शिक्षक पद भरतीला बंदी आहे. हजारो शिक्षकांची पदे रिक्त असताना पवित्र पोर्टलच्या मार्फत भरती प्रक्रिया शासनाने आता कुठे सुरू केली आहे. ही पदभरती होत असताना दुसरीकडे १५ मार्च २०२४ शासन निर्णय लागू करून विद्यार्थी पटसंख्या व शिक्षकांची पदे रिक्त- अतिरिक्त करताना अनुदानित शाळा बंद करण्याचा घाट शासनाने घातला आहे. अशात क्रीडा व शारीरिक शिक्षण या विषयासाठी शारीरिक शिक्षण शिक्षक यांची भरती होणे अपेक्षित आहे. मात्र कला, क्रीडा, संगीत ही विशेष शिक्षकांची पदे करून खारीज करून माजी सैनिकांची भरती करणे हे कितपत न्याय संगत आहे. एकीकडे शिक्षकांना मानधनाचा पगार देत असताना पेन्शन घेणाऱ्या माजी सैनिकांना शाळांवर भरती करून कुठला सामाजिक न्याय साधल्या जाणार आहे.

याआधी देखील शालेय शिक्षण अभ्यासक्रमात कृषी विषय शिक्षण आवश्यक करण्याचे धोरण सरकारने आखले होते. त्यावेळीही कृषी शिक्षणाला आमचा विरोध नव्हता परंतु या विषयाची अंमलबजावणी करताना नेमकी शाळांनी काय भूमिका घ्यावी व शासनाचे धोरण राहील हे गुलदसत्यात ठेवल्यामुळे या विषयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. आता सैनिकी शिक्षण अत्यावश्यक करून विशेष काय साध्य होईल हे अधांतरी आहे. जर देशसेवेचाच विषय असेल तर आमच्याकडे सध्या स्काऊट-गाईड, एनसीसी पथक व क्रीडा शिक्षण देऊन सैन्य व पोलीस भरती केली जाऊ शकते. खेळाडूंना सुद्धा योग्य संधी दिल्यास ते सुद्धा सैन्यात भरती होऊ शकतात. त्यामुळे शासनाने सैनिकी शिक्षण देण्याचे धोरण कोणाच्या जीवावर घेतले आहे? या प्रश्नाबाबत संभ्रम आहे. तूर्तास एवढेच..!

# काट्यांसवे फुलांचे वाटे तुला दिले मी !



गजलायन

गजानन वाघमारे
मो. 9423612872

**म्हणतोस नेहमी तू थोडे तुला दिले मी**
**ना मोजदाद ज्याची इतके तुला दिले मी**
**हा जन्म माणसाचा, कर सोहळा सुखाचा**
**काट्यांसवे फुलांचे वाटे तुला दिले मी**

निसर्ग भरभरून देतो परंतु आपल्या अघोरी लालसा संपता संपत नाहीत. देव, निर्मिक,निसर्ग अशा हजारो नावांनी ज्याचा जप करतो त्याने लाखो हातांनी आपणास वारेमाप दिले. त्या देण्याची मोजदादही होऊ नये, मात्र माझ्या वाट्याला थोडेच आले हे प्रत्येकाचे रडगाणे. पावलाखाली फुलांचे लाख रस्ते आले तरी, रुतलेल्या एका काट्याची सल आयुष्यभर जपणारे महाभाग पावलोपावली भेटतील. इच्छा,अपेक्षांचा हा कोलाहल अवघे जगणे कर्णकर्कश करून टाकतो. सतीश दराडे यांचा एक सुंदर शेर आठवला.

**मागेच सर्व इच्छा गेल्या लयास माझ्या**
**इतकेच फक्त कारण भाग्योदयास माझ्या**

इच्छांचे लयास जाणे हाच माणसाचा भाग्योदय. उन्हानंतर सावली, दुःखानंतर सुख आणि अंधाराच्या क्षितिजावर उजेडाची चाहुल हेच जीवनचक्र. येथे काट्यांचे टोचणे आहे तर फुलांची मखमलही आहेच ना ! आपल्या अवास्तव इच्छांना मात्र फुलांच्या स्पर्शांचेच मोह खुणावतात. मानवी प्रवृत्तीचा असा रोखठोक धांडोळा घेणारी गज़ल घेऊन प्रिया कौलवार यांनी गज़ल प्रांतात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**दिसणार माणसे ही खोटी पदापदावर**
**बसले दबा धरूनी त्यांच्यामधे जनावर**
**फाडून सभ्यतेला मुखडे समोर आणू**
**आतील श्वापदांना देऊ अता सुळावर**

माणसांच्या अंतर्मनात दबा धरून बसलेल्या जनावरांचे कळप नामशेष करण्याचा संकल्प करून वाटचाल करणारी प्रिया कौलवार यांची गज़ल अगदी सरळ, सोपा, प्रवाही बाज घेऊन वाचकांच्या भेटीला येते. माणूस आणि माणसाची विरोधाभासी जीवनपद्धती प्रिया कौलवार यांच्या अनेक गजलांचा



मध्यवर्ती आशय झाली आहे. सुखाच्या अंगणात दुःखेही हक्काने रांगोळी घालायला येतीलच. सुख पाहता जवा पाडे, दुःख पर्वताएवढे असे जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात. प्रिया कौलवार यांच्या गज़लेने माणसाच्या दुःखकेंद्री स्वभावाचा समाचार घेतला आहे.

**कितीदा लाड दुःखाचे,**
**नको तितके करत बसलो**
**किती समृद्ध हे जीवन,**
**तरी आपण कण्हत बसलो**
**जसे आले तसे त्यांनी पळवले मोसमी वारे**
**नव्याने वर्षभर नंतर झळा घेउन जगत बसलो**

गोरगरिबांच्या हिश्शाचे मोसमी वारे कधी प्रस्थापित तर कधी सत्ताधीश पळवितात. लोकशाहीची ही मन विषन्न करणारी अगतिकता प्रिया कौलवार यांनी किती चपखलपणे टिपली आहे. पुरुषी वर्चस्ववादाच्या सीमारेषेत महिलांचे कार्यकर्तृत्व झाकोळल्या गेले. स्त्री सन्मानासाठी कितीही कायदे केले तरी, कायदा न जुमानणारा पुरुषप्रधान अहंकार सदोदित आडवा आला. उपभोगाची वस्तू म्हणून स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टिकोनावर आसूड ओढताना प्रियाची गज़ल एक वेगळा विचार मांडताना दिसते.

**जगाचे माहिती नाही**
**तुझ्या जर पाप डोळ्यांना**
**नको आणूस बाजारी**
**तुझ्या निष्पाप डोळ्यांना**

चोहोबाजूंनी टपलेल्या पापी नजरांची जाणीव नसेल तर या बाजारात तुझ्या निष्पाप डोळ्यांना घेऊन येण्याचा गुन्हा करू नकोस असा समंजस सल्ला देतानाच, प्रियाची गज़ल महिला प्रबोधनाची भूमिकाही अत्यंत जाणिवेने पार पाडते. स्त्री जाणिवेच्या तिच्या गज़ला नितांत सुंदर आहेतच, याशिवाय समाजाला लागलेली भ्रष्टाचाराची किड, बेरोजगारी, शेती मातीचे वैफल्य, जातीयता, धर्मांधता अशा विविध समस्यांना तिची गज़ल हात घालते. लोकांचे लोंढे गावाकडून शहरात येऊ लागले, मात्र त्यांच्यातील माणूस आणि माणूसपण हरवले. शहरीकरणामुळे संवेदनशुन्य झालेल्या प्रवृत्तीचा समाचार प्रियाची गज़ल घेते.

**लहरत आला सुसाट वारा पण**
**गुदमरला जात असावा**
**गावाकडून माझ्या नक्की तो**
**आला शहरात असावा**
**शोध स्वतःचा घेण्यासाठी गेला**
**तो खोलात असावा**
**एकांताशी बोलत बसतो,**
**म्हणजे तो मौनात असावा**

सभोवतीच्या गर्दीत एकाकी पडलेल्या माणसाला स्वतःची दुःखे स्वतःलाच सांगण्यावाचून पर्याय राहिला नाही. कदाचित त्यामुळेच शब्द गोठलेली माणसे मौनात जाऊ लागली. प्रिया कौलवार यांनी असे अनेक सिग्नेचर शेर गज़ल प्रांताला दिले आहेत. प्रिया कौलवार ह्या पंढपूरच्या. मागील चार-पाच वर्षापासून त्या गज़ल लिहितात. मराठी गज़लचे तंत्र त्यांनी उर्मिला बांदिवडेकर यांच्याकडून आत्मसात केले.

शेखर गिरी आणि चंद्रकांत कदम यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले. उदगीर आणि वर्धा येथील अ.भा. मराठी साहित्य संमेलन आणि अंमळनेर व अंबाजोगाई येथील अ.भा. एल्गार गज़ल संमेलनात त्यांनी आपल्या गज़ल सादर केल्या आहेत. त्यांच्या एका सुंदर गज़लेचा आपण आस्वाद घेऊ.

**भुलवायचा जगाला बाहेरचा उजाळा**
**होता जिच्या मनाचा उद्ध्वस्त पोटमाळा**
**लाखोंमधून येते हातात एक दमडी**
**अनुदान योजनेचा उडतो असा धुराळा**
**जन्मासवे मिळाली ही हीन जात मजला**
**घ्या माणसात तुम्ही, मी ना कुणी निराळा**
**देणार हात नाही तुजला कुणीच येथे**
**का वेदने निघाली शोधायला जिव्हाळा**
**अश्रू पुसून घे तू अपुल्याच मनगटाने**
**आलाच सांजवेळी दाटून जर उमाळा**
**नाही महत्त्व जेथे वय,जात दाखल्याला**
**मी काढणार ऐसी दुनियेत एक शाळा**
**हिनवू कसे फळ्याला रंगावरून त्याच्या**
**उज्ज्वल भविष्य करतो जर तोच रंग काळा**

# सारासार विचार



कथा

प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८



''बेटा, लोकं करतात म्हनून आपुनबी तसंच कऱ्याचं का? आपली संस्कृती अलग. त्यायची संस्कृती अलग. माल्या दृष्टीन तो थिल्लरपना हाये. जे पावित्र्य जपल्या गेलं पायजे ते जपल्या जात नाई. लग्न म्हन्जे काई गंमत नाई तर तो एक संस्कार हाये. पवित्र विधी हाये. लग्नाआंधी ते करनं, जास्त जवळीक साधनं मले शहानपनाचं लक्षन दिसत नाई. आपुन खेळ्यात रायतो. आपुन शहरातल्या लोकायच्या चांगल्या गोष्टीचं अनुकरन केलं पायजे. सर्वच गोष्टीचं नाई.'' गोपाळराव पूजाला, त्यांच्या मुलीला, समजावत होते.

''बाबा, कोण म्हणते ते वाईट आहे म्हणून? आणि खेड्यातल्या मुलामुलींनी काय हौस मौज करायचीच नाही का? शहरातल्या मुलींना बंधनं नाहीत. बंधनं फक्त खेड्यातल्या मुलींनाच. हा भेदभाव आहे असे वाटत नाही का?'' पूजा आपली बाजू मांडत म्हणाली.

''अहो, तुमचं असंच हाये सदानकदा. आपली संस्कृती,आपले संस्कार. आपली पायरी. आपली मर्यादा. आज काळ लय बदलेल हाये. आपल्या व्यक्ती अलग होतं. आज आपुन इंटरनेच्या युगात रायतो. तुम्ही पोरायले स्वातंत्र्य द्याले पायजे. त्यायच्या इच्छा त्यायले पूर्न करू द्याले पायजे. लगन काय घळी घळी होते? करतात थोळी हौस मौज तर करू द्या ना? आपुन जे केलं नाई ते पोरायनंबी करू नाई असं थोळीच हाये? काळासंग आपुन चाललं पायजे. काळासंग आपुनबी बदल्याले पायजे. ते लग्नाच्या आंधी केलं तर काय बिघळ्ळं? तुमचा तुमच्या पोरीवर ईश्वासच नाई. '' नंदाबाईंनी मुलीची बाजू घेतली.

''अवं मावले, पोरीवर माला ईश्वास नाई असं कशी म्हन्तं तू? आपल्या खेळ्यातला मी एकमेव शेतकरी हावो म्हटलं ज्यानं आपल्या पोरीले शिक्षनासाठी तालुक्याले पाठोलं. तिले भाळ्याची खोली करून देली. पाचशे किलोमीटर दूर पुन्यात इंजिनिअरच्या कॉलेजले चार वर्ष ठुलं. अन् तू म्हन्तं ईश्वास नाई! आपल्या गावात चौथीलोकच शाळा हाये. बाकीच्या लोकायनं त्यायच्या पोरीले चौथीलोकच शिकोलं. पोरीले शहरात कसं पाठवाव म्हणून त्यायनं पोरीले पुढे शिकोलंच नाई. हुशार असूनबी त्या शिक्षनापासून वंचित रायल्या. नाई तर त्याबी पूजासारखं शिकून कोनी इंजिनिअर झालं असतं तर कोनी डॉक्टर, मास्तर, तलाठी, पोलीस, काही ना काही तरी झाल्या असत्या.'' गोपाळराव पत्नीला समजावत म्हणाले.

''एवळ्या चांगल्या ईचाराचे हात तुम्ही तर पोरीले नाई कामुन म्हन्ता? करू द्या ना तिले तिच्या मतानं. पोरीची इच्छा ते आपली इच्छा समज्याले पायजे तुम्ही. द्या तिले परमिशन.''

''अवं, कोनत्या गोष्टीले हो म्हन्याचं अन् कोनत्या गोष्टीले नाई म्हन्याचं हे मले समजते. पोरायच्या सगळ्याच गोष्टी बरोबरच असतात असं नाई. त्यायले जगाचा अनुभव कमी असते. थोरामोठ्यायचं काम असते की लायने चुकत असतील तर त्यायले चार गोष्टी समजावून सांगाव. तू तर माय हायेस. सगळ्यांत आधी तर तुयाच या गोष्टीले नाई म्हन्याले पायजे. अन् तूच चुकीच्या गोष्टीचं समर्थन करून रायली? आता मायनंच हो म्हटल्यावर पोरीची पोरगी कशाले मांगं हटते?'' गोपाळराव पत्नीकडे नाराजीनं पाहत म्हणाले.

'' समर्थन करू नाई तर काय करू? मले माल्या पोरीच्या चेहऱ्यावर आनंद पाहाव वाटते. तिले या गोष्टीत आनंद भेटत अशील तर आपुन आळकाठी कशाले आन्याची?''

''अवं पन लोकं काय म्हन्तील? काई समाजाचा बी ईचार कराव लागते की नाई? अन् मलेबी लग्नाच्या आंधी जास्तीचं ठाकनं, जास्तीचं हिडगावनं, होनाऱ्या नवऱ्या पोराच्या जास्त संपर्कात रायनं पसंत नाई. लग्नानंतर काय कऱ्याचं ते करा म्हनाव.'' गोपाळराव स्पष्टच बोलले.

'' हे पा, सबन गोष्टी आपल्याच मतानं झाल्या पायजे हा हट्ट तुम्ही सोळून द्या. थोळंफार पोरीच्या कलाकलानं घ्या. एकुलती एक पोरगी हाये आपली. तिच्या इच्छा आपुन पूर्न नाई करनार त कोन करीन? थोळाफार खर्च शिल्लक झाला तर काय फरक पळते? अन् लोकायचं म्हन्सान तर लोकं पायीबी चालू देत नाई अन् घोळ्यावरबी बसू देत नाई. लोकायचा जास्त ईचार करू नका. लोकायनं काई केलं तर आपुन म्हन्तो का काई त्यायले? नाई ना? तुम्ही हो म्हना. आजलोक हजारो लोकायनं केलं कोनी काई म्हटलं का? पाहा पोरीचं तोंड एवढुसं झालं तुम्ही नाई म्हन्ता म्हनून. कसे बाप हा ओ तुम्ही?'' नंदाबाईंनी नवऱ्याकडे मोठ्या आशेनं पाहत म्हटलं.

''मालं म्हन्नं एवळंच हाये की लग्नाच्या आंधी पोरगा पोरगी जर जास्त संपर्कात असतील तर वाद व्हायची शक्यता असते. चांगलं झालं चांगलं. नाईतर वांगलं व्हायले टाइम नाई लागत. आपुन पेपरमंधी वाचतो की बऱ्याच व्हयेल सोयरिका आंधीच तुटल्या. सगळ्यांच बाबतीत तसं होत नाई म्हना. पन शक्यता तर असतेच ना? बरं, ठीक हाये. तुम्ही मायलेकीची इच्छाच हाये तर मले तुमचं आईकाच लागीन. हून जाऊ द्या तुमच्या मतानं.'' गोपाळरावांनी मुलीची व पत्नीची इच्छा म्हणून त्यांना परवानगी दिली.

पूजा पुण्यासारख्या शहरात नोकरी करणारी. एका नामांकित कंपनीत इंजिनिअर. शहरात प्रि वेडिंग शूटचं लयच फॅड. लग्नाच्या आधी मुलामुलीने एकत्र यायचं, फोटो काढायचे, व्हिडिओ काढायचे व ते व्हिडिओ लग्नात मोठ्या स्क्रीनवर दाखवायचे. पूजालाही वाटलं की आपणही आधुनिक आहोत. प्रि वेडिंग फोटोशूट केलं तर काय बिघडणार आहे? उलट त्या आठवणी जन्मभर जपता येतील व पुन्हा पुन्हा अनुभवता येतील. पण गोपाळराव मुलीचे वडील. मुलीच्या वडिलांना ताकही फुंकून प्यावं लागते. लग्नाच्या आधी काही समस्या उद्भवू नये म्हणून खबरदारी घ्यावी लागते. एका स्वाभाविक भीतीपोटी गोपाळराव प्रि वेडिंग फोटोशूटसाठी नाही म्हणत होते. पण मुलगी व बायकोच्या हट्टापुढे त्यांना माघार घ्यावी लागली.

फोटोशूट करण्यासाठी पूजा, तिची मैत्रीण, विशाल, तिचा होणारा मुलगा, त्याचा मित्र व फोटोग्राफर व त्याचा सहकारी असे सहा जण शहराबाहेर गेले. चांगलं फोटोशूट झालं. लग्नाला दोन महिने अवधी होता. पण पूजा आणि विशाल एकाच शहरात नोकरीला असल्यामुळे एकमेकांना भेटत. साखरपुडा झालेला असल्यामुळे घरच्यांना काही आक्षेप नव्हता. दोघांचं भेटणं, मोबाईलवर बोलणं सुरू होतं. पण म्हणतात ना अति परिचयात अवज्ञा. झालं. काही गोष्टींवरून, विचारांच्या मतभेदातून त्यांचे वाद झाले. वादाचं पर्यवसान असं झालं की पूजाच्या आईला पूजाचा फोन आला, ''आई, मला विशालसोबत लग्न करायचं नाही. भविष्यात आमचं काही पटणार नाही असं माझं मत झालेलं आहे. आमचं भांडण झालं. तू बाबांना विशालच्या बाबांना फोन करून हे लग्न मोडायला सांग.'' एवढं बोलून पूजानं फोन कट केला.

सुनंदाबाईंना तर पूजाचं म्हणणं काय आहे हे आधी समजलंच नाही. अन् जेव्हा समजलं की तेव्हा त्या मटकन खालीच बसल्या. त्यांची लग्नाची तयारी सुरू होती. आजुबाजुच्या, शेजारच्या बायकांना बोलावून त्या दररोज थोडी थोडी तयार करत होत्या. एकुलती एक मुलगी. त्यामुळे काय करू आणि काय नाही असं त्यांना झालं होतं. आनंदाच्या, सुखाच्या शिखरावरच होत्या ना त्या. पण मुलीचं बोलणं ऐकून त्यांचे हातपाय लटलट कापायले लागले. सगळं सुरळीत चालू असताना हा अचानक बसलेला धक्का त्यांच्या विचारांच्या पलीकडचा होता. त्यांनी पूजाला फोन लावला. त्या थरथरत्या आवाजात म्हणाल्या, ''पूजा, असं एकदम संबंध तोडत नसतात. आपण किती हौसेनं साखरपुडा केला. ऐपत नसताना जवळपास एक ते दीड लाख रुपये खर्च केले. अन् आता तू असं म्हन्तं! मी त्वाल्या बाबाले विशालरावांच्या बाबांशी बोल्याले लावतो. थोडीफार बोलचाल होतच असते. तेवढ्यानं काय डायरेक्ट संबंध तोळ्याचे नसतात. तू काई कायजी करू नको. आम्ही पायतो सगळं.'' नंदाबाईंनी एवढं बोलून फोन ठेवला पण त्यांना समजेना की नवऱ्याला ही गोष्ट कशी सांगावी. गोपाळराव हळवे होते. मुलीच्या लग्नासाठी त्यांनी खूप स्वप्नं पाहिली होती. मंगल कार्यालय ठरवून झालं होतं. आचारी, डेकोरेशन सर्व ठरवून झालं होतं. आता ही लग्न तुटल्याची बातमी त्यांना कशी सांगावी हे समजत नव्हतं. सांगणं तर भागच होतं.

सायंकाळी गोपाळराव घरी आल्यावर नंदाबाईंनी जेव्हा त्यांच्या कानावर ती गोष्ट टाकली तेव्हा ते पुतळ्यासारखे स्तब्ध झाले. काही मिनिटे ते बोललेच नाहीत. ओठांवर ओठ दाबून, मान हलवत ते विचार करायला लागले. आणि अचानक त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. नंदाबाईंना काही सुचेना की नवऱ्याला कसं सांभाळावं. त्या गोपाळरावांच्या बाजूला जाऊन उभ्या राहिल्या व त्यांनी एक हात गोपाळरावांच्या खांद्यावर टाकला व त्या थोपटू लागल्या. दोघेही निःशब्द. शांतपणे वाहणारा अश्रूंचा पूर थोड्या वेळाने थांबला.

गोपाळराव घोगऱ्या आवाजात म्हणाले, ''मले ज्याची भीती होती तेच झालं. माले ईचार जुने असले तरी जगाच्या अनुभवानं येल हायेत. आजच्या काळात नवे नवे खूळ पैशावाल्यायच्या डोक्स्यात येतात. त्यायच्या ठिकानी ते बरोबर असतात. कोनं कसं वाग्याचं, काय कऱ्याचं हा ज्याचा त्याचा प्रश्न हाये. त्यायले आपुन नाव ठू शकत नाई. हरेकाला आपल्या ईचारापरमानं वागन्याचा अधिकार हाये. पन त्यायचं पाहून बाकीच्यायनं त्यायची नक्कल करनं काई मले बरोबर वाटत नाई. नौकरीच्यानं जरी जोळ दोन पैसे आले तरी आपुन केलं पायजे हे आपुनच ठरोलं पायजे. आजकालच्या पोरं पोरीच्या हातात भरपूर पगार येते. त्याच्याच्यानं त्यायले वाटते की आपुनबी बाकीच्यायसारखं वागा. लग्न झाल्यावर मानूस नाई म्हटलं तरी तोलून मापून बोलते. तोलून मापून वागते. त्यांच्यावर चांगले बंधनं येतात. घरातल्या ज्येष्ठ लोकायसमोर वागताना काही मर्यादा येतात. लग्नाच्या आधी तसं बंधन नसते. या मोबाईलच्यानं जास्त बोलनं होते. कधी कधी शिल्लकच्या बोलन्यानं गोष्टी वाया जातात. जे नाई बोल्याचं तेबी बोलल्या जाते. शब्दानं शब्द वाढते. त्याच्याच्यानं वाद होतात. शब्द जसे मान्सं जोळ्याचं काम करतात तसं तोळ्याचंबी काम करतात. तू काई चिंता करू नको. आपुन आधी सगळं समजून घिऊ की नेमकं काय झालं. वाऱ्यावरची वरात चांगली नसते. मी आंधी पूजाशी बोलतो. मंग विशालरावशी बोलतो. अन् तरीबी काई उपाय निंगला नाई तर मंग विशालरावच्या बाबाशी बोलतो. पटकन फोन केला अन् संबंध तुटला असं थोळी होत असते. सारासार ईचार कराव लागते. सबन गोष्टी पाहाव लागतात. पूजाचं म्हन्नं खरोखरच बरोबर अशील तर त्याचाबी ईचार कराव लागील. तुम्ही काई मनाले लावून घिऊ नका. सगळं चांगलं होईल. चर्चेतून तोडगा निंगीलच काई ना काई..... ''

गोपाळराव बोलत होते व नंदाबाई कंठात प्राण आणून त्यांचे म्हणणे ऐकत होत्या.

लोकार्थ

# कन्व्हर्जिंट इंडियातर्फे नवी मुंबईतील उलवे पीएम श्री स्कूलच्या सुरक्षा सुविधेत वाढ

कन्व्हर्जिंट या सिस्टम इंटिग्रेशन क्षेत्रातील सेवांवर काम करणाऱ्या जागतिक स्तरावरील आघाडीच्या कंपनी तर्फे समाजाला सक्षम करण्याच्या त्यांच्या वचनबध्दतेला अनुसरुन त्यांच्या सिग्नेचर असलेल्या स्टेप (सिक्युअर, ट्रान्सफॉर्म, एम्पावर, पार्टनर) अप स्कूल प्रोग्राम चे आयोजन नवी मुंबई येथील उलवे येथे असलेल्या पीएम श्री स्कूल मध्ये करण्यात आले होते. शैक्षणिक वातावरण आणि सुरक्षेत वाढ करण्यासाठी कमी संसाधने असलेल्या शैक्षणिक संस्थांना मदत करण्यासाठी डिझाईन करण्यात आलेल्या या प्रकल्पा अंतर्गत कन्व्हर्जिंट सिस्टम च्या ४० हून अधिक सहका-यांनी त्याचा वेळ आणि कुशलता स्वयंसेवक म्हणून काम करुन शाळेला महत्त्वपूर्ण सुविधा आणि तंत्रज्ञान उपलब्ध करुन दिले.

या प्रकल्पाचा एक भाग म्हणून शाळेच्या सध्या उपलब्ध असलेल्या व्हिडिओ सुरक्षा उपकरणांमध्ये वाढ करुन पाच नवीन कॅमेरे बसवण्यात आले यामुळे शाळेच्या परिसरातील सुरक्षा अधिक सक्षम बनली. त्याच बरोबर चमूने शिक्षणाशी संबंधित गरजेच्या असलेल्या काही महत्त्वपूर्ण गोष्टी जसे कोल्ड स्टोअरेज साठी रेफ्रिजरेटर, पुस्तकांसाठीची दोन शेल्फ्स, दोन नोटीस बोर्ड्स आणि एक वायफाय राऊटर दिला ज्यामुळे शाळेतील वर्गांचे परिचालन अधिक चांगले होऊ शकेल.कन्व्हर्जिंट इंडियाच्या डेटा सेंटर्स चे सर्व्हिस डिलिव्हरी मॅनेजर संदीप कुमार यांनी या प्रकल्पाचे नेतृत्व केले ते म्हणाले " आमच्या स्टेप अप स्कूल उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही केवळ तंत्रज्ञानच देत नाही तर दीर्घकालीन आणि सकारात्मक बदल घडवत असतो. पीएम श्री स्कूल मध्ये सर्वसमावेशक आणि सर्वंकश शिक्षणासाठी प्रयत्न करत आहोत आणि यामुळे त्यांना अधिक सुरक्षित तसेच भविष्यात मुलांना आणि शिक्षकांना शैक्षणिक वातावरण अधिक चांगले करण्यास मदत करत आहोत."




## (दि.८ ते १४ जून २०२५)

दि.८.चंद्र- स्वाती नक्षत्रात.

सूर्य मृग नक्षत्रात, अर्थात कृषीप्रधान भारतात बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे.सूर्य सूमारे १३ते१४ दिवस एका नक्षत्रात असतो, ज्यावेळी सूर्य मृग नक्षत्रात येतो तेंव्हा आपल्या भागात पावसाळा सुरू होऊन या नक्षत्रातील पेरणी अधिक चांगली ठरते.

याच दिवशी बुध ग्रहाचा पश्चिमेस उदय होत आहे.

दि.९.चंद्र- विशाखा नक्षत्रात

दि.१०.चंद्र-अनुराधा नक्षत्रात.

दि.११.चंद्र- ज्येष्ठा नक्षत्रात.

दि.१२.चंद्र - मूळ नक्षत्रात.

दि.१३.चंद्र-पूर्वाषाढात.व सर्वात मोठा असलेल्या गुरु ग्रहाचा पश्चिमेस अस्त.

यालाच काही लोक चांदणी बुडी म्हणतात.

दि.१४.इंटर नॅशनल स्पेस स्टेशन दर्शन पहाटे ४-५७ते ५-०३.दिशा..दक्षिण ते पूर्व.

*ग्रह दर्शन*

सर्वात लहान बुध ग्रहाचा उदय झाल्याने पश्चिमेस बुध, गुरु व जरा वर मंगळ दिसेल.पहाटे पूर्वेस तेजस्वी शूक्र आणि शनी ग्रह सज्ज असतील.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 65

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ■ | | | | ■ | | | | ■ | ■ | ■ | |
| | | ■ | | ■ | | | ■ | | ■ | | ■ | | |
| ■ | | | | ■ | | ■ | | गा | खा | न | पॅ | ले | स |
| | ■ | ■ | | | | | | ■ | | | ■ | | ■ |
| | | ■ | | | ■ | | | | ■ | | | | ■ |
| | | ■ | | | | | | ■ | | ■ | ■ | ■ | अ |
| | ■ | | ■ | | | ■ | ■ | सा | | | | ■ | नु |
| ■ | | | | ■ | | | | म | | ■ | | | क |
| न | | ■ | | | | ■ | | दा | ■ | | ■ | | र |
| क | | ■ | ■ | | ■ | | ■ | म | | | | ■ | णी |
| ल | ■ | | | | | | ■ | दं | ■ | | ■ | | य |
| न | | ■ | | ■ | | ■ | | ड | | ■ | | | ■ |
| वी | ■ | क | पा | ळ | क | रं | टा | ■ | | ■ | ■ | | |
| स | | ■ | | ■ | ■ | | ■ | | | | | ■ | |

### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
- कड
- कर
- कस
- काठी
- कौल
- खास
- खीर
- जटा
- टका
- दल
- धाव
- नख
- नफा
- नर
- नाद
- नाल
- निशा
- पक्ष
- पाय
- भर
- मिठी
- रमा
- रम्य
- रंक
- लव
- लस
- वर
- सत्ता
- सदा
- सय

**तीन अक्षरी**
- एनर्जी
- गोरस
- जडता
- तालीम
- धरण
- नादार
- नाराज
- पालखी
- पेस्तर
- पंगत
- मादक
- मालक
- रहाट
- राखड
- रासभ
- ललना
- वशिला
- शिमगा
- स्तवन
- हाजीर

**चार अक्षरी**
- आठवण
- कटमिती
- कडीपाट
- कलेवर
- चरबट
- तपकीर
- तावदान
- महिरप
- रामगढ
- सानथोर
- सुनयना

**पाच अक्षरी**
- अकरमाशा
- अनुकरणीय
- उतारपेठ
- बहालमर्जी
- सदाचरण

**सहा अक्षरी**
- कपाळ

करंटा
- नकलनवीस
- पंकज उधास
- सामदामदंड

**अन्य अक्षरी •**
आगाखान
पॅलेस

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | भा | ष | चं | द्र | बो | स | ■ | म | हा | रा | जा | ■ | अ |
| वि | ग | ■ | द | व | ■ | त्या | ग | ■ | हा | जी | र | ■ | प |
| चा | ■ | ■ | न | ■ | सं | ग्र | ह | ■ | का | ■ | ज | ■ | मा |
| र | ह | स्य | ■ | ■ | द | ह | न | ■ | र | ■ | ■ | ज | न |
| ■ | नु | ■ | वि | व्ह | ल | ■ | ■ | पै | ■ | आ | ज | न्म | ■ |
| आ | मं | त्र | ण | ■ | ■ | शु | भ | का | म | ना | ■ | भू | क |
| ■ | ता | ■ | क | र | पु | ष्क | र | ■ | ना | का | ■ | मी | ■ |
| ■ | ची | ■ | र | ■ | र | ■ | ती | ज | ■ | नी | ला | ■ | प |
| ■ | शे | ला | ■ | पा | व | ली | ■ | टा | ■ | ■ | ग | ज | रा |
| ■ | पू | ज | क | ■ | णी | ■ | वा | यु | पु | त्र | ■ | वा | चा |
| बो | ट | ■ | र | ब्बी | ■ | वा | यू | ■ | ■ | ■ | वा | हि | का |
| ळ | ■ | दी | क्षा | ■ | प | ■ | भा | गु | बा | ई | ■ | र | व |
| व | ■ | प | ल | ट | ण | ■ | र | ण | ■ | श | क | ■ | ळा |
| ण | ■ | क | न | क | ■ | ध | मा | का | ■ | ■ | प | क्षी | ■ |
| ■ | उ | ■ | ■ | म | ■ | ■ | प | री | ट | घा | ट | ■ | त |
| प | द | क | ■ | क | व | ति | क | ■ | र | ट | ■ | भे | ळ |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 445

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | 4 | 5 | | 6 | | ■ | ■ | 7 | 8 | | 9 | |
| | ■ | 10 | | | | ■ | | ■ | ■ | 11 | | | ■ | | ■ |
| 12 | | | ■ | | ■ | 13 | | | | ■ | | ■ | 14 | | 15 |
| | ■ | ■ | 16 | ■ | 17 | ■ | | ■ | ■ | 18 | | 19 | ■ | 20 | |
| 21 | | 22 | | ■ | 23 | 24 | | ■ | ■ | | ■ | 25 | 26 | ■ | |
| ■ | ■ | | ■ | 27 | | | ■ | 28 | 29 | | | ■ | 30 | | ■ |
| ■ | 31 | ■ | 32 | | | ■ | 33 | ■ | 34 | | ■ | 35 | ■ | ■ | 36 |
| 37 | | ■ | 38 | | ■ | 39 | | 40 | | ■ | 41 | | 42 | 43 | |
| 44 | | | ■ | | ■ | 45 | | | | ■ | ■ | 46 | | | ■ |
| 47 | | ■ | ■ | 48 | 49 | | ■ | 50 | | 51 | | | ■ | 52 | |
| | ■ | 53 | 54 | | | ■ | 55 | | ■ | | ■ | 56 | | ■ | ■ |
| ■ | 57 | | | ■ | ■ | 58 | | ■ | 59 | ■ | 60 | | ■ | 61 | 62 |
| 63 | ■ | | ■ | 64 | | ■ | 65 | 66 | | 67 | | ■ | 68 | | |
| 69 | | | ■ | | ■ | 70 | ■ | 71 | | | ■ | 72 | ■ | ■ | |
| | ■ | 73 | | | | | 74 | ■ | ■ | 75 | 76 | | | ■ | |
| | ■ | | ■ | | ■ | 77 | | | ■ | 78 | | ■ | ■ | ■ | ■ |

**—: आडवे संकेत :—**

1) X X X शहाणी, जेथे सगळेच अडाणी असतात तेथे थोडासा शहाणा सुद्धा मोठ्या योग्यतेचा समजला जातो (म्हण)
7) घेतलेली वस्तु किंवा रक्कम परत करणे
10) गुप्त मसलत
11) श्रीशंकराचे आवडते नृत्य, थयथयाट
12) एकमेकांस न शोभणारे, विषम
13) नवऱ्याची आजी
14) सुगंध
18) चकाकी, एकाएकी उठणारी तीव्र वेदना
20) लक्ष संख्या, एक अत्यंत ज्वालाग्राही पदार्थ
21) पौराणिक काळात अत्री ऋषींपासून अनसूयेच्या पोटी झालेला ब्रम्हा, विष्णू व शंकराचा अवतार
23) बैलाच्या नाकातील दोरी
25) वडील, जनक
27) दम कोंडला जाईपर्यंत
28) चांगले व सुव्यवस्थेचे राज्य
30) वाईट सवय
32) भागणारी संख्या
34) इंग्रजीत नशीब
37) प्रबळ इच्छा, हाव
38) नियंत्रण, ताब्यात घेणे
39) श्रीदत्तात्रयांची माता
41) रेल्वे फलाटावर गाडीची प्रतीक्षा करीत बसण्याची खोली
44) माकडांचा खेळ दाखविणारा
45) पाठवणी
46) नामाचा क्रियापदाशी असलेला संबंध
47) देणगी, आशीर्वाद
48) दांत पुढे असलेला
50) श्रीकृष्णाचे एक नाव
52) बगळा
53) बारीक झणझण
55) मनास वाटणारी स्वस्थता, आराम
56) करता येण्यासारखे, संभवनीय
57) समुद्रावरील भली मोठी नौका
58) टिंगल, उपहास
60) सामर्थ्य, बळ
61) इतिहासकालीन दमयंतीचा प्रियकर,
64) ओढा, झोंक
65) दिलेल्या वचनाला जागणारा, नेहमी खरे बोलणारा
68) कबुत्तर
69) सोटा
71) आयात–निर्यातीवरचा कर
73) बेडकाचा आवाज
75) शिपायांवरचा एक अंमलदार
77) मुलगा
78) आवाज, शब्द

**—: उभे संकेत :—**

1) इतरांची मतें खंडीत करीत आपली मते मांडणे, खल, चर्चा
2) रक्षा, भस्म
3) बूड, खालचा भाग
4) इकडे तिकडे फिरणारा गोलक, आंदोलक
5) दया, अवस्था
6) एखाद्या निमित्ताने सर्व गावास जेऊ घालणे
7) चर्मवाद्य
8) स्वर, आवाज
9) किरकोळ सामान गाडीवर लादून गावोगाव विक्री करीत फिरणारा
15) खोल, खोलगट
16) व्यवस्था, अनुकूलता
17) आवेदन करणारा
18) थापड, चापट
19) वानर, अनुभविक म्हातारा मनुष्य
22) त्रासलेला, कंटाळलेला
24) तुल्य, समान
26) गायनातील स्वरांचा काळ किंवा मेळ
27) स्वत:वरची जोखीम न ओळखणारा, आपले काम जवाबदारीने न करणारा
29) उत्कृष्ट चंदन
31) लोकसभेचा सदस्य
32) वारा भरण्याची कातडयाची पिशवी
33) शंका, अनिश्चितता
35) विरोध करण्याची ताकद
36) आंब्याची घुई
37) सोमवारी येणारी अमावस्या
39) मृदू, हलके ( प्राकृत)
40) लग्नात वरातीचे अगोदर सासूने सुनेचे तोंड आरशात बघण्याचा विधी
42) लवण, खारट
43) खोड, दुर्गुण
49) कागदाचे चार बंद
51) नम्र, लय पावलेला
53) जलपात्रांची माळ लावलेले रहाट
54) कारवाराकडे रीत, प्रकार
55) मधुर, रसयुक्त
59) पृष्ठभागावरचा लहानसा तुकडा
60) नवग्रहांपैकी एक
61) मनुष्य, पुरुष
62) डौल दिसण्यासारखे सामान, गाडया, नोकर इ.
63) दरारा, जरब
64) मृत देह
66) त्यागलेले
67) पाव भाग, एक चतुर्थांश
70) भिल्ल
72) लबाडी, कारस्थान, ढोंग
74) जंगल
76) तुझे ●

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | नो | ह | र | जो | शी | ■ | प्रा | तः | स्म | र | ण | ■ | भा | ट | क |
| त | ■ | नु | ■ | श | ■ | आ | ज्ञा | ■ | र | ■ | ■ | पा | व | ■ | र्क |
| ल | ■ | मा | ग | ■ | म | ■ | ■ | गु | ण | क्र | र | क | ■ | स | ■ |
| बी | ■ | न | ■ | अ | नु | च | र | ■ | श | र्य | त | ■ | स | र | स |
| ■ | इं | ■ | ध | नु | ष्य | ■ | फू | ■ | क्ती | ■ | न | व | सा | ग | र |
| ■ | जि | ■ | न | क्र | ■ | पं | च | म | ■ | आ | जो | ळ | ■ | म | क्र |
| ■ | नि | ■ | क्रे | म | ल | ■ | क्क | ■ | ग | व | त | ■ | प्र | ■ | र |
| क्र | य | दा | ■ | णि | ■ | ■ | र | ती | ■ | र्जु | ■ | म | ति | ■ | ■ |
| शी | र | ■ | के | का | व | ली | ■ | र्थ | ■ | न | शा | ■ | बि | ग | ■ |
| फ | ■ | अं | श | ■ | र | न | ■ | क्षे | म | ■ | क | स | ब | ■ | भा |
| ळ | ■ | ग | व | ळी | ■ | ■ | ने | त्र | दा | न | ■ | म | ■ | घ | न |
| ■ | ■ | र | ■ | ■ | स | ला | म | ■ | र | ■ | पा | य | घ | ड्या | ■ |
| ह | स्ता | क्ष | र | ■ | त्ता | ■ | णू | ■ | ■ | पा | ■ | सु | ■ | ळ | ■ |
| स्त | ■ | क | ह | र | ■ | आ | क | र्ण | ■ | प | रि | च | य | ■ | प |
| क | ■ | ■ | दा | वा | ■ | का | ■ | ■ | ■ | दृ | ■ | क | म | जो | र |
| ला | ■ | वै | री | ■ | स्व | र | ■ | ■ | पौ | ष्टि | क | ■ | क | म | ळ |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** मेष:- तुम्ही करत असलेले काम तुम्हाला तुमच्या कामात पुढे घेऊन जाईल. तुम्हाला काही महागड्या गोष्टी मिळू शकतात.

**वृषभ:** आज तुम्ही भावनिकदृष्ट्या अस्वस्थ आहात. कुटुंबात भांडणे वाढू शकतात. कुटुंबात वाद होऊ शकतात. याबाबत चांगले पाऊल उचलले पाहिजे.

**मिथून :** आज तुमच्या आयुष्यात काहीतरी घडू शकते. जर तुम्ही कठोर परिश्रमाच्या आधारे नोकरी शोधत असाल तर तुम्हाला जास्त वाट पाहण्याची गरज नाही.

**कर्क :** आज तुम्ही तुमच्या खर्चामुळे त्रस्त असाल. तुमची चुकीची माहिती तुमचे नाते बिघडू शकते. कामावर शिस्त लावण्याची खूप गरज आहे. तुम्हाला काही चांगली बातमी मिळेल.

**सिंह :** आज तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. चालू असलेल्या समस्या संपतील. तुम्हाला सामाजिक कार्यात किंवा राजकीय कार्यातही यश मिळू शकते.

**कन्या :** आज तुमचे दीर्घकाळ प्रलंबित काम पूर्ण होईल. यामुळे तुम्हाला भविष्यात यश मिळू शकते. आज तुम्ही एखाद्या जुन्या मित्राला भेटू शकता.

**तुळ :** आजचा काळ मिश्रित परिणाम देतो. प्रगती आणि आदर मिळविण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुम्ही नीतिमान आणि आदर्शवादी व्हाल.

**वृश्चिक :** कुटुंबातील सदस्यांमध्ये परस्पर मतभेद असू शकतात. अशा परिस्थितीत अशांतता तुमच्यासाठी चिंतेचा विषय बनू शकते.

**धनु :** तुमच्या कामात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुम्हाला सर्व बाजूंनी यश मिळेल.

**मकर :** तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्याला तुमचे मन सांगू शकता. यावेळी तुम्ही तुमच्या शहाणपणाने यश मिळवू शकाल. विनाकारण गोष्टींमध्ये जास्त छेडछाड करू नका.

**कुंभ :** तुम्ही तुमच्या कामात पुढे जात राहाल. तुम्हाला यापासून कोणीही रोखू शकत नाही. तुमच्या कष्टाचे फळ मिळेल, आज तुम्हाला तुमच्या कष्टाचे पूर्ण फळ मिळेल.

**मीन :** नोकरी करणाऱ्या लोकांना आज कामाचा जास्त भार जाणवू शकतो. तुमच्या कामात पुढे जात राहा. स्वतःला मोकळे ठेवा.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### रेल्वेने तिकीट तपासणीतून कमावले ११.१९ कोटी रूपये

**अकोला:** रेल्वे स्थानकांवर व गाड्यांमध्ये अनधिकृत प्रवेश व अनियमित प्रवास रोखण्यासाठी भुसावळ विभागात सातत्याने तिकीट तपासणी मोहिमा राबवण्यात येत आहेत. प्रवाशांना दर्जेदार सेवा व आरामदायक प्रवास अनुभव मिळावा, यासाठी मेल/एक्स्प्रेस, हॉलिडे स्पेशल व पॅसेंजर गाड्यांमध्ये व्यापक तिकीट तपासणी करण्यात येत आहे.विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इती पांडे यांच्या नेतृत्वाखाली, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अजय कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक (तिकीट तपासणी) पी. के. सिंह यांच्या देखरेखीखाली ही तपासणी मोहीम राबविण्यात आली. मे २०२५ मध्ये तिकीट तपासणी क्षेत्रात भुसावळ विभागाने उल्लेखनीय यश संपादन केले. विभागातील विविध गाड्यांमध्ये सघन व सातत्यपूर्ण तपासणी मोहीम राबवून बिनतिकीट प्रवास, अनियमित तिकीट व प्रवास नियमांचे उल्लंघन यावर कठोर कारवाई करण्यात आली. या उपक्रमामुळे महसुलात मोठी वाढ झाली असून प्रवाशांमध्ये शिस्तबद्ध प्रवास संस्कृतीला चालना मिळाली आहे. मे २०२५ महिन्यात एकूण १,१८,००० अनधिकृत प्रवास प्रकरणांवर कारवाई करत भुसावळ विभागाने तिकीट तपासणीद्वारे विक्रमी ₹११.१९ कोटींचे महसूल मिळवले. या मध्ये अनियमित प्रवासाच्या ४८,३६७ प्रकरणांतून ₹३.१३ कोटी, बिनतिकीट प्रवासाच्या ७०,३२९ प्रकरणांतून ₹८.०५ कोटी व अनबूक सामानाच्या १०१ प्रकरणांतून ₹२३,००० इतक्या दंडरक्कमेचा समावेश आहे.

### अकोल्यात दुचाकी चोरट्याचा पर्दाफाश



**अकोला :** शहरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या दुचाकी चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी अकोला पोलिसांनी केलेली तात्काळ आणि नेमकी कारवाई यशस्वी ठरली आहे. जुने शहर पोलिसांनी ४ लाख रुपये किंमतीच्या ९ चोरीच्या दुचाकींसह एक सराईत चोर गजाआड केला असून या कारवाईमुळे नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार दुचाकी चोरीप्रकरणी डीबी पथकाला तपासाची जबाबदारी देण्यात आली होती. तपासादरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून शेख उमर फारुख अब्दुल सलाम (रा. जम जम नगर, अकोला) याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने अकोल्यातील विविध भागांतून ९ दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. या दुचाकींपैकी ४ जुने शहर पोलिस स्टेशन हद्दीतून, १ अकोट फाईल हद्दीतून आणि उर्वरित ४ इतर भागांतून चोरी केल्या गेल्याचे उघड झाले. पोलिसांनी सर्व ९ दुचाकी जप्त केल्या असून त्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख रुपये आहे. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे, व शहर उपविभागीय अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली जुने शहर पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात पो.उपनि. रविंद्र करणकार, पोहेकॉ. श्रीकांत पवार, पंकज उपाध्याय, पो.कॉ. सागर शिरसाठ, पवन डांबलकर, व महिला पो.हे.कॉ. निशा वाकडे यांच्या पथकाने केली. शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांची ही वेगवान आणि प्रभावी कारवाई कौतुकास्पद ठरत असून नागरिकांनी पोलिसांशी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक तपास सुरू आहे.

### 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत २० गोवंशांची सुटका

**अकोला :** जिल्ह्यातील गोवंश तस्करी व कत्तलीस प्रतिबंध करण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या ''ऑपरेशन प्रहार'' मोहिमेअंतर्गत दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत एकूण २० गोवंशांची सुटका करण्यात आली असून एकूण ७ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ६ जून २०२५ रोजी स्थानीक गुन्हे शाखेचे पोनि शंकर शेळके यांच्या नेतृत्वात अकोट फाईल भागात छापा टाकण्यात आला. आरोपी रसुल खान गुलाब खान रा. सादिक नगर, अकोट फाईल अकोला याने आपल्याच गोठ्यात १६ गोवंश अमानुष पद्धतीने कत्तलीसाठी बांधून ठेवले होते. तसेच गोवंश वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी स्कॉर्पिओ (किंमत ४ लाख रु.) देखील जप्त करण्यात आली. सदर कारवाईत एकूण ६ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसरी कारवाई नवनियुक्त ठाणेदार प्रवीण धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शीटाकळी पोलिसांनी केली. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दहीहंडावेस येथे ४ गोवंश निर्दयतेने कत्तलीसाठी बांधून ठेवले असल्याचे आढळले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत १ लाख ५ हजार रुपयांचे गोवंश जप्त केले. या दोन्ही कारवायांमध्ये जप्त केलेल्या एकूण २० गोवंशांना गौरक्षण सेवा केंद्र, म्हैसपूर येथे हलविण्यात आले आहे. आरोपींविरोधात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९९५ व प्राण्यांवर क्रूरतेचा प्रतिबंध अधिनियम १९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या यशस्वी कारवाईमध्ये स्थानीक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी तसेच बार्शीटाकळी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांचे महत्त्वाचे योगदान असून कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे: स्थागुशा पथकातील सहभागी अधिकारी/कर्मचारी: विजय चव्हाण, गोपाल जाधव, माजीद पठाण, खुशाल नेमाडे, रवि खंडारे, महेंद्र मलिये, वसीमोद्दीन शेख, लिलाधर खंडारे आदी. बार्शीटाकळी पो. स्टे. टीम: राजेश जीधारकर, पंकज पवार, रवींद्र देशमुख, नागसेन वानखडे, ईश्वर पातोंड, मनिष घुगे आदींचा समावेश होता. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ''ऑपरेशन प्रहार'' अंतर्गत अवैध धंद्यांविरोधातील ही आणखी एक प्रभावी कारवाई ठरली आहे.

# वाशिमच्या अभियंत्याला सिमेंट गुणवत्ता नियंत्रण उपकरणासाठी पेटंट!



दीपाली पोफळे



बजरंग अंभोरे



विशाल चहारे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशिम, दि. ७ :** सिमेंट उत्पादन उद्योगात क्रांतिकारक बदल घडवू शकणाऱ्या तांत्रिक प्रगतीत वाशिम येथील बांधकाम अभियंता बजरंग नामदेवराव अंभोरे, दीपाली पोफळे, विशाल चहारे आणि त्यांच्या टीमला केंद्र सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून आयओटी-आधारित सिमेंट गुणवत्ता विश्लेषण उपकरणासाठी पेटंट प्राप्त झाले आहे. हे प्रमाणपत्र त्यांना ३० मे रोजी मिळाले.

बजरंग अभोरे यांनी स्थापत्य अभियांत्रिकी (एम.टेक. स्ट्रक्चर) मध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असून, ते बांधकाम क्षेत्रातील वाशिम येथील एका असोसिएट्सशी निगडीत आहेत. त्यांच्या चमूचे पेटंट केलेले उपकरण सिमेंट उत्पादन क्षेत्रातील एक नवी ठरणार आहे.

इंटरनेट ऑफ थिंग्जच्या (आयओटी) शक्तीवर कार्य करणाऱ्या या उपकरणामुळे रिअल-टाइम देखरेखसाठी सुसंगत उत्पादन गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी प्रमुख सिमेंट पॅरामीटर्सचे सतत विश्लेषण, प्रेडिक्टिव ऍनालिटिक्ससाठी संभाव्य समस्यांचा लवकर शोध घेण्यासह, उत्पादकांना साहित्याचा अपव्यय आणि ऑपरेशनल डाउनटाइम कमी करण्यास मदत होते. तसेच वर्धित निर्णय-निर्मितीः अधिक कार्यक्षम आणि शाश्वत उत्पादन पद्धतींना समर्थन देणारी कृतीशील, डेटा-चालित अंतर्दृष्टी सुविधा या उपकरणात आहे.



पेटंट कार्यालय, भारत सरकार | The Patent Office, Government Of India
डिजाइन के पंजीकरण का प्रमाण पत्र | Certificate of Registration of Design
Design No. 452947-001
Date 26/03/2025
Certified that the design of which a copy is annexed hereto has been registered as of the number and date given above in class 10-05 in respect of the application of such design to IOT BASED CEMENT QUALITY ANALYSIS DEVICE in the name of 1.Bajarang Namdeorao Ambhore 2. Dipali Ashok Pophale 3.Khan Ravish Hamed 4.Dr Ashwini Ramrao Patil 5.Dr. Vijaya N. Aher 6.Dr. Rahul Pol 7.Chahare Vishal Vijay.
In pursuance of and subject to the provisions of the Designs Act, 2000 and the Designs Rules, 2001.

> हे उपकरण केवळ ऑपरेशनल कार्यक्षमता वाढवत नाही तर अधिक स्मार्ट आणि अधिक शाश्वत उत्पादन प्रणालींसाठी जागतिक प्रयत्नांशी देखील सुसंगत आहे. सिमेंट उद्योगाला गुणवत्ता, सातत्य आणि शाश्वततेच्या वाढत्या मागण्यांचा सामना करावा लागत असताना, उद्योग-व्यापी परिवर्तनाला पाठिंबा देण्यासाठी हे उपकरण योग्य वेळी आले आहे.
> **- बजरंग अंभोरे,** बांधकाम अभियंता, वाशिम

#### आणखी दोन पेटंटसाठी प्रयत्न

बजरंग अंभोरे यांच्या चमूने तयार केलेल्या उपकरणामुळे जागतिक बांधकाम उद्योगासाठी अधिक स्मार्ट, अधिक विश्वासार्ह आणि भविष्यात पर्यावरण पुरक योगदान देणे शक्य होणार असल्याचे मत अभियंता बजरंग अंभोरे यांनी व्यक्त केले असून, या व्यतिरिक्त अजून त्यांनी केलेल्या शोधकार्यासाठी आणखी दोन पेटंट मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### खत प्रकरणातील आरोपीने दिल्या पोलिसांच्या हातावर तुरी

**मानोरा :** राजस्थानहून कमी दरात आणलेले रासायनिक खत, स्थानिक पातळीवर नामांकित कंपन्यांच्या बॅगमध्ये भरून बनावट खताची विक्री करणाऱ्या दिनेश गजानन चव्हाण याच्यावर कृषी विभागाच्या तक्रारीनंतर ३ जून रोजी मानोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, कारवाईदरम्यान पोलिसांच्या समक्ष आरोपी फरार झाला असून, शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीवरून तालुका कृषी अधिकारी रोशन भागवत आणि मंडळ अधिकारी उमेश राठोड यांनी कारपा येथे छापा टाकला असता, कृभको कंपनीच्या लेबलसह २७० बनावट खत बॅग्ज, ३३० बिनचिन्ह खत बॅगा, खत शिवण्याच्या यंत्रासह मोठ्या प्रमाणावर साहित्य आढळले. ही संपूर्ण कारवाई रात्री २ वाजेपर्यंत सुरू होती. शेतक-यांची फसवणूक करणारा दिनेश चव्हाण हा या धंद्यात एकटाच नसून मोठे रॅकेट सक्रिय असण्याची दाट शंका व्यक्त होत आहे.

> कारपा येथील बनावट खत प्रकरणी कारवाईदरम्यान पोलिस कर्मचारी घटनास्थळी निश्चितपणे हजर होते. मात्र, जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत अटक कसे करता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करण्यात आले आहे. त्यात आरोपीला संधी देण्याचा प्रश्नच नाही. तपास योग्य दिशेने सुरु आहे. पोलिस विभाग या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाईल.
> **- प्रवीण शिंदे,** ठाणेदार, मानोरा

### 'जहाँ नही चैना, वहा नही रहना' म्हणत मदन भरगडांनी बांधले हातात घड्याळ!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

#### उपमुख्यमंत्री ना.अजित पवारांच्या उपस्थितीत होणार अधिकृत पक्षप्रवेश

**अकोला, दि. ७ :** काँग्रेस पक्षात गेल्या ३० वर्षे कार्यरत असलेले आणि अकोला महानगरपालिकाचे माजी महापौर मदन भरगड यांनी काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व आणि राज्याचे सरचिटणीस पदांसह इतर पदांचा त्याग करून आपला राजीनामा काँग्रेसचे राज्यअध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचेकडे पाठविला असल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजित पवार येत्या १२ जून रोजी अकोल्यात आढावा घेणे आणि पक्ष संघटन वाढवीण्यासाठी आणि जनसंवाद साधण्यासाठी पोलीस लॉन येत असल्यामुळे त्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश करणार असल्याचे अकोला जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रूजमा यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले. राज्याच्या सत्तेत आल्यानंतर राज्यात पक्ष संघटन वाढविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. त्यातच विद्य. सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात आदेश दिल्यानुसार सर्वच राजकीय पक्ष निवडणूक ची तयारी करत असताना अकोला जिल्ह्यात कमजोर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला उभारी देण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार हे १६ वर्षे नंतर प्रथमच अकोल्यात येत असून अकोला मनपा चे माजी महापौर मदन भरगडसह इतरांना पक्षप्रवेश देण्यासाठी १२ जून रोजी पोलीस लॉन येथे येत आहेत. त्यानिमित्ताने आज पूर्वी काँग्रेस पक्षात असलेले आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रुजमा यांनी पत्रकार परिषद बोलावून माजी महापौर मदन भरगड हे पक्ष प्रवेश करीत असल्याचे सांगत जहाँ नही चैना, वहा नही रहना म्हणत मदन भरगडांनी हातात घड्याळ बांधली असून

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवारांसह राज्याचे विविध खात्याचे मंत्र्यांच्या उपस्थितीत अधिकृत पक्षप्रवेश होणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## किनगाव राजामध्ये नागरिकांकडून स्वखर्चाने नालेसफाई

### ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांनी घेतला पुढाकार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**किनगांव राजा, दि. ७ :** किनगांव राजा गांवामध्ये नागरिकांकडून स्वखर्चाने सफाई करत असल्याचे पाहायला मिळत आहे, ग्रामपंचायत प्रशासनाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे नागरिकांनी हा निर्णय घेवुन पुढाकार घेतला आहे. गावामध्ये मागील काही महिन्यांपासून असलेल्या नाल्यांमध्ये घाणीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे, दुर्गंधीमुळे लहान मुलांमध्ये आजाराचे प्रमाण पाहायला मिळत आहे.त्यामुळे नागरिकांनी स्वतः सार्वजनिक नाली सफाई करताना ठिकठिकाणी दिसत आहे.मागील काही दिवसांपासून अचानक पाऊस येत असल्यामुळे पावसाचे पाणी साचल्यामुळे दुर्गंधी व मच्छरांचा उपद्रव पाहायला मिळतो त्यामुळे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाकडे जागृत नागरिकांनी वेळोवेळी नाली सफाई मागणी केली.परंतु याकडे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळते,त्यामुळे नागरिकांनी स्वखर्चातून स्वतःच्या घरासमोरची नाली मजुराच्या साह्याने साफसफाई करताना दिसत आहे.तर काही नागरिकांनी स्वतः हातामध्ये फावडे घेऊन नालेसफाई केली आहे.



ग्रामपंचायत प्रशासनाला वारंवार सांगूनही नालेसफाई होत नसल्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या विरोधामध्ये नागरिकांमध्ये रोष पाहायला मिळतो.गांवाची स्वच्छता राखण्याची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाचे असताना अस्वच्छता मोठ्या प्रमाणामध्ये असल्यामुळे जागृत नागरिक स्वच्छतेसाठी पुढे आल्याचे पाहायला मिळत आहे. गांवातील एका जागृत नागरिकांनी गावातील व्हाट्सअप ग्रुपला नाले सफाई करत असल्याचा फोटो शेअर केला त्यामुळे स्थानिक प्रशासन करते तरी काय? असा सवाल नागरिक विचारत आहे. स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासन वेळोवेळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्यामुळे त्यांच्यावर विसंबून राहणार नसून स्वतःच स्वच्छतेसाठी पुढाकार घेणार असल्याचे काही नागरिकांनी यावेळी बोलताना सांगितले आहे.स्वच्छतेची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाची असताना याकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे पाहायला मिळते.

> ग्रामपंचायत प्रशासनाला वेळोवेळी नालेसफाई करण्यासाठी अनेक वेळेस विनंती करण्यात आली होती. परंतु ग्रामपंचायत प्रशासनाकडे नाले साफसफाई करण्यासाठी वेळ नसल्यामुळे नाली मधील घालीचे पाणी येथे घरापर्यंत पोहोचत असल्यामुळे स्वखर्चाने नालेसफाई करून घेतली आहे.
> **- रमेश माधव काकड**
> ग्रामस्थ किनगांव राजा

### समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल्सचा अपघात

**किनगांव राजा :** समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल व ट्रक च्या अपघातामध्ये तीन जण जखमी झाले आहेत.नागपूर वरून प्रवाशांना घेऊन पूजा ट्रॅव्हल्स पुण्याकडे जात असताना मुंबई कॉरिडोर चॅनेल क्रमांक ३१२ वर अपघात झाला आहे. ट्रॅव्हल्सचा चालक याला अंदाज न आल्यामुळे अपघात झाला आहे.सविस्तर वृत्त असे की, पूजा ट्रॅव्हल्स क्रमांक एम.एच ४० बी एफ ६६९९ प्रवासी घेऊन जात असताना, ट्रेलर ट्रक क्रमांक पिबी ०६ व्ही ५१८० हा लोखंडी सळई घेऊन जात असताना पूजा ट्रॅव्हल्स चा चालक विनोद पखाले वय ४० वर्ष रा.वर्धा याला ओव्हरटेक करत असताना अंदाज न आल्यामुळे पूजा ट्रॅव्हल्सल क्लिनर साईडला समोरून ट्रॅव्हल्स धडकली मध्ये ३३ प्रवासी ट्रॅव्हल्स प्रवास करत होते. कल्पना रमेश नासरे वय ३० वर्ष रा. नागपूर यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली.

### आता एका 'मेसेज'वर सुटणार दिग्रसकरांची समस्या

#### तक्रारीसाठी व्हाटस ॲप क्रमांक उपलब्ध

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दिग्रस : दि. ७ :** दिग्रस शहरातील नागरिकांना आपल्या समस्या आणि तक्रारी आता घरबसल्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचवता येणार आहेत. दिग्रस नगरपरिषदेने तक्रार निवारणासाठी आज, शुक्रवारी (दि. ६) एक विशेष व्हॉट्सॲप क्रमांक (९६०७४१८८४२३) लाँच केला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार असून, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे.

उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल आणि नगरपरिषद मुख्याधिकारी अतुल पंत यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. हा व्हॉट्सॲप क्रमांक ७ जूनपासून नागरिकांच्या सेवेसाठी कार्यान्वित होईल. पूर्वी, शहरातील विविध प्रभागांतील नागरिकांना आपल्या तक्रारी घेऊन नगरपरिषदेत हेलपाटे मारावे लागत होते, ज्यात वेळ वाया जात असे आणि तक्रार निवारणाची शाश्वतीही नसायची. आता, मात्र या आधुनिक सुविधेमुळे नागरिक पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, विद्युत, बाजार विभाग किंवा इतर कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या फोटो किंवा मेसेजद्वारे या क्रमांकावर पाठवू शकतील. प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवल्या जातील. विशेष म्हणजे, या तक्रारींचे निवारण झाले की नाही आणि तक्रारकर्त्यांचे समाधान झाले का, याची चाचपणी खुद्द मुख्याधिकारी अतुल पंत करणार आहेत. त्यांच्या या थेट नियंत्रणामुळेअधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कामाचा वचक राहणार आहे. नगरपरिषदेच्या या विधायक उपक्रमामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. या शुभारंभ कार्यक्रमाला नगरपरिषदेचे विविध विभागप्रमुख, कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकविण्यासाठी सज्ज व्हा- बाजोरिया

### शिवसेना जिल्हा मेळावा: नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला : दि. ७ :** शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत मोठ्या प्रमाणात नेत्या कार्यकर्त्यांचे इन कमिंग सुरू आहे. त्यामुळे शिवसैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांवर भगवा फडकविण्यासाठी सज्ज व्हा. असे आवाहन शिवसेना उपनेते तथा जिल्ह्याचे संपर्क प्रमुख मा.आ. गोपीकिशन बाजोरीया यांनी केले.



स्थानिक जि.प. कर्मचारी भवन येथे शनिवारी आयोजित शिवसेना जिल्हा मेळावा तथा नवनियुक्त पदधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. मा.आ. बाजोरीया पुढे म्हणाले की, बाळासाहेबांचे गहाण ठेवलेले विचार शिंदे साहेबांनी बाहेर काढले. मुख्यमंत्री असताना योजनांचा धडाका लावला. महिला वर्गासाठी लाडकी बहिण योजना आणली. आजच्या कार्यक्रमाला महिला वर्गाची असलेली प्रचंड उपस्थिती ही शिंदे साहेबांचीच किमया आहे. म्हणूनच शिवसेने इतकी इनकमिंग आज इतर कोणत्याही पक्षात नाही. शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवून त्यांची सेवा करायची आहे. एकापेक्षा जास्त जिल्हाप्रमुख असल्याने जनतेची कामे झटपट होतील. माजी आ. नारायण गव्हाणकर आणि माजी जि.प. सभापती पांडे गुरूजी यांच्याकडे जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी देण्यात आल्याने जिल्ह्यात शिवसेनेला आणखी उभारी मिळेल. त्यामुळे शिवसैनिकांची आता तत्काळ कामाला लागावे. गोपीकिशन बाजोरीया यांनी जिल्ह्यात सर्वाधिक सदस्य नोंदणी करणाऱ्या युवती सेना प्रमुख खुशी भटकर हिचा सत्कार केला. यावेळी युवा नेते माजी आ. विप्लव बाजोरीया, नवनियुक्त जिल्हा प्रमुख नारायणराव गव्हाणकर, नवनियुक्त जिल्हा प्रमुख चंद्रशेखर पांडे गुरूजी, जिल्हा प्रमुख उषाताई विरक, निवासी उपजिल्हा प्रमुख संतोष अनासने, युवासेना विदर्भ संपर्क प्रमुख राहूल कराळे, युवासेना जिल्हा प्रमुख निखिल ठाकूर, युवासेना जिल्हा प्रमुख नितीन मानकर, युवती सेना प्रमुख खुशी भटकर, उपजिल्हा प्रमुख मनिष कराळे, उपजिल्हा प्रमुख उमेशआप्पा भुसारी, अकोट विधानसभा उपप्रमुख संजय अढाउ, मुर्तिजापूर उपजिल्हा प्रमुख अप्पु तिडके, उपजिल्हा प्रमुख डॉ. गणेश बोबडे, सौ. रेखाताई राउत, आदींसह बहूसंख्य पदधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

#### अनेकांची मक्तेदारी संपवू- गव्हाणकर

ज्यांच्या संपूर्ण परिवाराची हयात एकाच पक्षात गेली त्यांनीही पक्ष बदलले. पक्ष बदलाला मी एकटाच अपवाद नाही. त्यामुळे कोण काय बोलतो याकडे मी फारसे लक्ष देत नाही. असे सांगून नवनियुक्त जिल्हा प्रमुख मा.आ. नारायण गव्हाणकर यांनी आपल्याला अनेकांची राजकारणातील मक्तेदारी मोडायची आहे. जनसामान्यांना सत्येची दारे खुली करून द्यायची आहेत. आणि त्यासाठीच हा सोहळा असल्याचेही गव्हाणकर म्हणाले. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी विकासकामांचा धडाका लावला. महाराष्ट्राला प्रगती पथावर आणले. त्यांच्या या कार्याला भारावून आपण विधानसभा निवडणुकीच्या ६ महिन्यापूर्वीपासूनच त्यांच्या संपर्कात होतो. अशी माहिती त्यांनी दिली.

#### जिल्हा मेळावा ही पूर्वतयारी- पांडे गुरूजी

स्थानिक स्वराज्य संस्थांवर शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी जिल्हाभरात पक्ष संघटन बांधणी,बुथ प्रमुख, सर्कल प्रमुख, शाखा प्रमुखांसह पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्याचीच पूर्वतयारी म्हणून शिवसेनेचा जिल्हा मेळावा आयोजित केल्याचे नवनियुक्त जिल्हा प्रमुख तथा माजी जि.प. सभापती चंद्रशेखर पांडे गुरुजी यांनी सांगितले.

### अकोला जिल्ह्याला १३ हजार ३६९ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त

**अकोला :** प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत अकोला जिल्ह्याला शुक्रवार (ता.सहा) नवीन १३ हजार ३६९ घरकुलांचे उदिष्ट प्राप्त झाले असुन सदर घरकुल मंजुरीची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांनी दिली.

जिल्ह्यातील एकही कुटुंब हक्काच्या निवाऱ्यापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्व कच्चे घर व बेघर पात्र लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्फत किंवा आपण स्वतः ही घरकुलाकरिता सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. या योजनेतंर्गत शासनाकडून शुक्रवारी (ता.६) १३ हजार ३६९ घरकुलांचे उदिष्ट प्राप्त झाले असुन मंजुरीची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांनी सांगितले.

#### तालुकानिहाय उद्दिष्ट

जिल्ह्यातील अकोला तालुक्यात १७५२, अकोट २३४७, बाळापूर २३३३, बार्शिटाकळी १५७२, मुर्तीजापूर ७३१, पातूर ३२५२, तेल्हारा १३८२ असे एकूण १३ हजार ३६९ घरकुलांचे उदिष्ट देण्यात आले आहे.

# भारतात रंगणार बास्केटबॉल लीग स्पर्धा

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

भारतात आतापर्यंत सर्वच खेळांच्या व्यावसायिक लीग स्पर्धा सुरू झाल्या आहेत. आयपीएल सुरू झाल्यानंतर, प्रो कबड्डी, इंडियन सुपर लीग, खोखो लीग आणि टेबल टेनिस लीग अशा अनेक स्पर्धा सुरू झाल्या. आता खेळाडूंना आणखी एक प्लॅटफॉर्म मिळणार आहे. एसीजी स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाने मिळून व्यावसायिक बास्केटबॉल लीग सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. या लीग स्पर्धा पुरुष आणि महिलांसाठी देखील असणार आहे.

या लीग स्पर्धेला जागतिक स्तरावर घेऊन जाण्याचा प्रयत्न असणार आहे. त्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी, ऑस्ट्रेलियाच्या राष्ट्रीय बास्केटबॉल लीग (एनबीएल) चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आयुक्त (कमिशनर) जेरेमी लोएलिगर यांची एसीजी स्पोर्ट्सचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नवीन भूमिकेत, लोएलिगर लीगच्या ब्लूप्रिंटच्या विकासाचे नेतृत्व करतील.''बास्केटबॉल केवळ एक खेळ नसून नेतृत्व आणि संधी निर्माण करण्याचे एक साधन आहे,'' असे एसीजीचे व्यवस्थापकीय संचालक करण सिंग म्हणाले. तसेच ते पुढे म्हणाले , ''तळागाळातील उपक्रमांपासून सुरू होणारा आमचा दशकभराचा प्रवास, तरुण खेळाडूंना पुढील भविष्यासाठी संधी निर्माण करून देणार आहे.''या उपक्रमात एसीजीची नेतृत्वाची भूमिका लीग ऑपरेशन्सच्या पलीकडे जाते. त्यांच्या दीर्घकालीन धोरणाचा एक भाग म्हणून, एसीजी वर्षभरात भारतातील पहिले पूर्णपणे निवासी उच्च-कार्यक्षमता केंद्र सुरू करेल.




अकादमीमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा असतील, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील सर्वोत्तम प्रतिभावंत प्रशिक्षकांना निमंत्रित केले जाईल. तसेच खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांसाठी व्यापक स्वरूपात प्रशिक्षण दिले जाईल. पोषण, मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संतुलन हे अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग असतील. भविष्यातील प्रतिभावान खेळाडूंचा विकास सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न केले जातील. याआधी भारतात बास्केटबॉल लीग स्पर्धा खेळवली गेलेली नाही. हा जगातील दुसरा सर्वात प्रसिद्ध खेळ आहे. पण, भारतात या खेळाला हवं तितकं प्रोत्साहन मिळत नाही. या लीग स्पर्धेमुळे, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मिळणार आहे. तसेच हा खेळ येत्या १० ते १५ वर्षांत क्रिकेटला मागे सोडून पुढे जाईल, असं आयोजकांनी म्हटलं आहे.

# इंग्लडने वेस्ट इंडीजचा २१ धावांनी केला पराभव



नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

इंग्लड विरुद्ध वेस्ट इंडीज यांच्यामध्ये सध्या टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेसाठी वेस्ट इंडीजचा संघ इंग्लड दौऱ्यावर आहे. भारताचा संघ २० जूनपासुन कसोटी मालिकेला सुरुवात करणार आहे, त्याआधी इंग्लडचा संघ वेस्ट इंडीजविरुद्ध मालिका खेळत आहे. इंग्लड विरुद्ध वेस्ट इंडीज यांच्यामध्ये ३ सामन्याची कसोटी मालिका पार पडली या मालिकेत इंग्लडच्या संघाने कसोटी मालिका एकतर्फी जिंकली आणि दणदणीत विजय मिळवुन दिला. यापूर्वी इंग्लंडने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत वेस्ट इंडिजचा व्हाईटवॉश केला होता. आता इंग्लड आणि वेस्ट इंडीज या मालिकेचा पहिला सामना काल म्हणजेच ६ जून रोजी पार पडला. इंग्लड विरुद्ध वेस्ट इंडीज यांच्यामध्ये झालेल्या टी-२० मालिकेच्या पहिल्या सामन्यात खेळाडूंची कामगिरी कशी राहिली यासंदर्भात सविस्तर वाचा. कालच्या सामन्यामध्ये इंग्लडचा अनुभवी खेळाडू जोस बटरल याने संघासाठी कमालीची कामगिरी केली आहे. आता इंग्लंड संघाने टी-२० मालिकेची सुरुवात दमदार पद्धतीने केली आहे. या सामन्यात जोस बटलरने एक अद्भुत खेळी केली. त्याचे शतक हुकले, पण त्याने संघाला चांगल्या स्थितीत आणले होते आणि इंग्लडच्या संघाने २१ धावांनी विजय मिळवुन मालिकेमध्ये १-० अशी आघाडी घेतली आहे.इंग्लड संघाचे कर्णधारपद हे हॅरि ब्रुककडे सोपवण्यात आले आहे.

त्याने कालच्या सामन्यामध्ये नाणेफ`क जिंकुन पहिले फलंदाजी करण्याची निर्णय घेतला होता. इंग्लडच्या संघाने पहिला विकेट लवकर गमावला. बेन डकेट हा दुसऱ्या षटकामध्ये बाद झाला आणि संघाने पहिला विकेट गमावला. पहिले फलंदाजी करत इंग्लडच्या संघाने ६ विकेट्स गमावुन १८८ धावा केल्या होत्या. त्याच्या प्रतित्युरात वेस्ट इंडीजच्या संघाने २० ओव्हरमध्ये १६७ धावा केल्या आणि ९ विकेट्स गमावले. इंग्लडच्या संघासाठी जोस बटलर याने धुव्वाधार खेळी खेळली. त्याने ५९ चेंडुमध्ये ९६ धावा केल्या आणि अल्लजारी जोसेफ याने त्याला बाद केले, त्याचे ४ धावांना विकेट गमावली. या खेळीमध्ये जोस बटलर याने ४ षटकार आणि ६ चौकार मारले. त्याच्या खेळीने इंग्लडला मजबुत स्थितीमध्ये उभे केले.

# जैस्वालच्या पायचीतवरुन वाद

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

भारत अ संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावरील दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात खेळत आहे. नाणेफेक जिंकून इंग्लंडने भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. यानंतर पहिल्या दिवसअखेर भारताने ७ बाद ३१९ धावा केल्या. केएल राहुलच्या शानदार शतकाने भारताचा डाव सावरला आणि मोठी धावसंख्या उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दुसरीकडे, यशस्वी जैस्वाल पुन्हा अपयशी ठरला आणि बाद झाल्यानंतर मैदानावर पंचांशी वाद घालताना दिसला.यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल ही सलामीची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात आली. दोघांनीही सुरुवातीच्या षटकांमध्ये सावधगिरीने खेळ केला ज्यामध्ये जैस्वालने २६ चेंडूंचा सामना केला आणि क्रिस वोक्सच्या चेंडूवर एलबीडब्ल्यू होण्यापूर्वी २ चौकारांसह १७ धावा केल्या. जेव्हा पंचांनी जैस्वालला एलबीडब्ल्यू घोषित केले, तेव्हा तो या निर्णयाबद्दल खूप संतप्त दिसत होता. ज्यामध्ये तो काही वेळ त्याच्या जागी उभा राहिला आणि पंचांकडे पाहत राहिला आणि काही वेळ असेच उभे राहिल्यानंतर, तो रागाने पॅव्हेलियनकडे निघून गेला.यशस्वी जैस्वालने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून, त्याने सातत्याने उत्तम कामगिरी दाखवली आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरही जैस्वालने आपल्या कामगिरीने सर्वांना प्रभावित केले होते.

आता त्याच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच, यशस्वी इंग्लंडमध्ये कसोटी सामना खेळणार आहे, जिथे स्विंग गोलंदाजीचा सामना करणे कोणत्याही फलंदाजासाठी सोपे काम नाही. अशा परिस्थितीत, जैस्वाल या आव्हानाला कसे तोंड देतो, याकडे सर्वांचे लक्ष असेल.






# रोहित-विराटशिवायही विजय मिळवू-शुभमन गिल

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

एका नवीन युगाची सुरुवात झाली आहे. आता टीम इंडियाचा नवीन आणि तरुण कसोटी कर्णधार शुभमन गिलच्या हातात कमान आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा करताना निवड समितीने शुभमन गिलला कर्णधार करण्याचा निर्णय घेतला होता. टीम इंडिया या दौऱ्यावर जाण्यापूर्वी शुभमन गिल पहिल्यांदाच कसोटी कर्णधार म्हणून मीडियासमोर आला. शुभमन गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी मुंबईतील बीसीसीआय मुख्यालयात पहिल्यांदाच एकत्र पत्रकार परिषद घेतली आणि अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.विराट रोहितच्या अनुपस्थितीबद्दल गिल म्हणाला प्रत्येक दौऱ्यावर दबाव असतो. जिंकण्याचा दबाव असतो. रोहित-विराट बराच काळ खेळाडू इतके सामने जिंकले आहे. वेगळा दबाव नाही. सर्व खेळाडूंना दबावात कसे जिंकायचे हे माहित आहे. आमच्या संघात फलंदाजी आणि गोलंदाजी संयोजन चालू आहे यावर आम्हाला विश्वास आहे. जेव्हा मला कळले की मी कसोटी कर्णधार होणार आहे, तेव्हा मला खूप चांगले वाटले. हे एक मोठे आव्हान आहे.

आमच्याकडे वेळ आहे, लंडनमध्ये १० दिवसांचा शिबिर आहे. त्यानुसार फलंदाजीचा क्रम ठरवला जाईल. गौतम गंभीर म्हणाले, आणखी एक दौरा आहे, देशासाठी चांगली कामगिरी करण्याची संधी आहे.आमच्याकडे दर्जेदार खेळाडू आहेत. आम्हाला काहीतरी खास करायचे आहे. टीम इंडियाच्या गोलंदाजीबद्दल गिल म्हणाला, आमचे वेगवान गोलंदाज चांगले आहेत.

# मुंबई फाल्कन्सचा ट्रायम्फ नाईट्सवर विजय

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

आयपीएलनंतर आता टी-२० मुंबई लीगचा थरार रंगला असून स्पर्धेची सुरुवात धमाकेदार झाली आहे. या लीगमध्ये भारतीय संघाचे अनेक स्टार खेळाडू खेळताना दिसून येत आहेत. या लीगमध्ये, भारतीय संघाच्या मर्यादित षटकांच्या दोन प्रमुख स्टार्स आमनेसामने आले होते. ज्यामध्ये श्रेयस अय्यरच्या संघाने सोबो मुंबई फाल्कन्सने सूर्यकुमार यादवच्या ट्रायम्फ नाईट्स मुंबई नॉर्थ ईस्टवर बाजी मारली आहे. श्रेयस अय्यरच्या संघाने हा सामना ४ विकेट्सने आपल्या नावे केला आहे.सामन्यापूर्वी सोबो मुंबई फाल्कन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना नाईट्स संघाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. जिगर सुरेंद्र राणा ७ चेंडू खेळू देखील आपले खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याच वेळी, फलंदाज सिद्धांत अधातरावने एक टोक धरून हळूहळू धावसंख्या पुढे नेली. सलामीवीर सिद्धांत अधातरावला शेवटी सूर्यांश शेडगेने चांगली साथ दिली. दोघांमध्ये जवळजवळ अर्धशतकी भागीदारी झाली. सिद्धांत अधातरावने ५३ चेंडूत ५७ धावांची खेळी साकारली. तर सूर्यांशने २१ चेंडूत जलद ४९ धावा केल्या. यादरम्यान त्याने ३ चौकार आणि ३ षटकार मारले. कर्णधार सूर्यकुमार यादव मात्र आपल्या नाईट्ससाठी विशेष काही करू शकला नाही. तो १ धाव घेत बाद झाला. नाईट्स संघाने २० षटकांत ५ गडी गमावून १४५ धावा केल्या होत्या. मुंबई फाल्कन्सकडून सिद्धार्थ राऊतने १, निखिल गिरीने १, कार्तिक मिश्राने १, यशने १ आणि विनायकने १ विकेट मिळवली.

प्रत्युत्तरात १४५ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबई फाल्कन्स संघाने १९.२ षटकांत ६ गडी गमावून सामना आपल्या खिशात टाकला. मुंबई फाल्कन्सकडून अग्रिक रघुवंशीने २५ चेंडूत ४२ धावांची जलद खेळी केली. त्यानंतर इशान मुलचंदानीने ११ आणि श्रेयस अय्यरने १३ धावा केल्या. शेवटी, विनायक भोईरने ३३ आणि आकाश पारकरने ३० धावा करून सामना जिंकला.इंग्लंड दौऱ्यावर होणाऱ्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय कसोटी संघ ब्रिटीश भूमीवर पोहोचला आहे. २० जूनल पहिल्या कसोटी सामन्याला सुरवात होणार आहे. २०२५-२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचे चक्र देखील भारत आणि इंग्लंड यांच्यातील या मालिकेने सुरू होणार आहे. भारतीय संघ शुक्रवारी मुंबईहून ब्रिटनला रवाना झाला आहे. रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर भारतीय कसोटी संघाची धुरा शुभमन गिलकडे देण्यात आली आहे.




## चांदीची विक्रमी पातळीवर आगेकूच सुरूच



नवी दिल्ली: जागतिक व्यापार युद्ध, रशिया युक्रेन तणाव या कारणामुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने आणि चांदीकडे जागतिक गुंतवणूकदारांचा ओढा कायम आहे. अमेरिकन डॉलर आणि अमेरिकन कर्जरोखेही गुंतवणूकदारांना गुंतवणुकीसाठी सध्याच्या परिस्थितीत योग्य वाटत नाहीत. या कारणामुळे सोने आणि चांदीची मागणी वाढून दर वाढत आहेत. औद्योगिक क्षेत्राकडूनही चांदीची मागणी वाढल्यामुळे गुरुवारी चांदीचा दर विक्रमी पातळीवर गेला होता.

त्यात आज पुन्हा भर पडली. दिल्ली सराफात चांदीचा दर तीन हजार रुपयांनी वाढून १ लाख ७ हजार १०० रुपये प्रति किलो या पातळीवर गेला.कालही चांदीच्या दरात दोन हजार रुपयांची वाढ झाली होती. एक जानेवारीपासून चांदीच्या दरात तब्बल १७,४०० रुपयाची म्हणजे १९.४ टक्क्यांची वाढ झाली आहे. व्यापाऱ्यांनी सांगितले की, भारतातही चांदीला गुंतवणूक म्हणून आता मागणी वाढू लागली आहे.त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्राकडूनही चांदीची मागणी कायम आहे. यामुळे चांदी विक्रमी पातळीवर आगेकूच करीत आहे. जागतिक बाजारात चांदीचा दर एकाच दिवसात १.६३ टक्क्यांनी वाढून ३६.२३ डॉलर प्रति औंस या पातळीवर गेला. कोटक सिक्युरिटीज या संस्थेने जारी केलेल्या माहितीत म्हटले आहे की, मागणी जास्त आणि पुरवठा कमी या कारणामुळे चांदीचा दर १३ वर्षांच्या उच्चाकावर गेला आहे. दरम्यान सोन्याचा दर उच्च पातळीवर असल्यामुळे शुक्रवारी सोन्याचा दर ९९, ६९० रुपये प्रति दहा ग्रॅम या पातळीवर स्थिर राहिला

# 'जीडीपी' वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

रिझर्व्ह बँकेने विद्यमान २०२५-२६ आर्थिक वर्षासाठी देशांतर्गत सकल उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम राखला आहे. जागतिक अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था ताकद, स्थिरता आणि संधीचे आशावादी चित्र सादर करत असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले.

रिझर्व्ह बँकेने एप्रिल ते जून २०२५ तिमाहीसाठी आर्थिक वाढ ६.५ टक्के, जुलै ते सप्टेंबर तिमाहीसाठी ६.७ टक्के, तर ऑक्टोबर ते डिसेंबर आणि जानेवारी ते मार्च २०२६ तिमाहीसाठी वाढ अनुक्रमे ६.६ टक्के आणि ६.३ टक्के राहण्याचे अनुमान वर्तविले आहे. रिझर्व्ह बँकेने रेपो दरात थेट अर्ध्या टक्क्यांची कपात करण्याच्या निर्णय घेतल्याने आर्थिक वाढीला चालना मिळण्याची आशा आहे.भांडवल प्रवाह आणि विनिमय दरांमधील वाढलेल्या अस्थिरतेमध्ये, उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या मध्यवर्ती बँकांसाठी अर्थव्यवस्थेत स्थिरता राखण्याचे काम कठीण बनले असल्याचे मल्होत्रा म्हणाले. प्रतिकूल जागतिक वातावरणातही, भारतीय अर्थव्यवस्था ताकदीने पुढे जात असून स्थिरता आणि संधीचे आशादायी चित्र दर्शविते आहे. अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक भारतीय अर्थव्यवस्थेला या कठीण काळात जलद गतीने वाढण्यास प्रेरित करत आहे. आव्हानात्मक जागतिक वातावरण आणि वाढती अनिश्चितता पाहता, महागाई दरात टिकाऊ नरमाईसह देशांतर्गत वाढीवर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे बनले आहे.

त्यानुसार, अर्धा टक्का रेपो दरातील कपातीकडे अर्थव्यवस्थेला उच्च वाढीच्या मार्गावर नेण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून पाहिले पाहिजे, असे मल्होत्रा म्हणाले. नैऋत्य मोसमी पाऊस सामान्य सरासरीपेक्षा अधिक बरसण्याच्या शक्यतेमुळे कृषी क्षेत्र आणि ग्रामीण मागणीला आणखी चालना मिळण्याची अपेक्षा आहे, असेही त्यांनी सांगितले. रिझर्व्ह बँकेचा मजबूत ताळेबंद, आर्थिक आणि राजकीय स्थिरता या तिन्ही आघाड्यांवर अर्थव्यवस्था गतिमान आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्था गुंतवणूकदारांना ३डी म्हणजे लोकसंख्या, डिजिटलायझेशन आणि देशांतर्गत मागणी या माध्यमातून प्रचंड संधी प्रदान करत आहेत




# भारतातील २७ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर;वर्ल्ड बँकेचा अहवाल

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी

जागतिक बँकेच्या नव्या अहवालानुसार, भारताने मागील ११ वर्षांत (२०११ ते २०२२) २७ कोटी नागरिकांना अत्यंत गरिबीमधून बाहेर काढलं आहे. हे भारताचे मोठे यश मानले जात आहे.

भारताने गरिबीविरुद्ध मोठं यश मिळवलं आहे. या काळात गरीबी दर २७.१ टक्क्यांवरून घटून फक्त ५.३ टक्के इतका झाला आहे. ग्रामीण आणि शहरी भागात समान प्रमाणात गरिबी कमी झाली असून यात महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांचा विशेष वाटा आहे.मोदी सरकारच्या सरकारच्या विविध योजना प्रधानमंत्री आवास, उज्वला, जनधन आणि आयुष्मान भारत यांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.जागतिक बँकेनुसार जे लोक दररोज ३ डॉलर (सुमारे २५० रूपयांपेक्षा) पेक्षा कमी खर्च करू शकतात, त्यांना अत्यंत गरीब मानले जाते. याच मोजमापानुसार २०११ मध्ये देशात २७ टक्के लोक अत्यंत गरीब होते. २०२२ मध्ये हे प्रमाण केवळ ५.३ टक्के राहिले आहे.उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या पाच राज्यांमध्ये जास्त गरीब लोक होते. या राज्यांनी गरिबी कमी करण्यामध्ये मोठं योगदान दिलं. या पाच राज्यांत २०११-१२ मध्ये देशातील ६५ टक्के अत्यंत गरीब लोक राहत होते. या राज्यांनी गरिबी हटवण्याच्या एकूण प्रगतीत दोन तृतीयांश योगदान दिले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात, केंद्र सरकारने विविध योजनांद्वारे गरिबी दूर करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले.अशा अनेक योजनांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान सुधारले. याशिवाय डिजिटल समावेश आणि आधार पारदर्शकता वाढली.

# महागाई ३.७ टक्क्यांपर्यंत नरमणार!

नवी दिल्ली, दि. ७ प्रतिनिधी



चालू आर्थिक वर्षासाठी किरकोळ महागाई दराचा अंदाज रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी ४ टक्क्यांवरून ३.७ टक्क्यांपर्यंत कमी केला. जागतिक पातळीवर वस्तू आणि सेवांच्या किमती नरमल्याने महागाई सौम्य राहण्याची अपेक्षा आहे. सरलेल्या एप्रिलमध्ये महागाई दर ३.१६ टक्के असा पाच वर्षांच्या तळ गाठणारा नोंदवला गेला आहे.

एकीकडे महागाई कमी होण्याबाबात अनुकूल अंदाज वर्तवले असले तरी, हवामानाशी संबंधित अनिश्चितता आणि जागतिक वस्तूंच्या किमतींवर त्यांच्या परिणामासह वाढत्या दरांशी संबंधित घडामोडींवर रिझर्व्ह बँक लक्ष ठेवून आहे. आगामी जून आणि सप्टेंबर तिमाहीमध्ये महागाई दर अनुक्रमे २.९ टक्के आणि ३.४ टक्के राहील, तर डिसेंबर तिमाहीसाठी महागाई दर ३.९ टक्के आणि मार्च तिमाहीसाठी ४.४ टक्क्यांवर पोहोचण्याची शक्यता आहे. आगामी २०२५-२६ आर्थिक वर्षात तो किंचित वाढून सरासरी ४.५ टक्के राहण्याचा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे.सामान्य मान्सून गृहीत धरल्यास, २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ग्राहक किंमत निर्देशांकावर (सीपीआय) आधारित महागाई ३.७ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची चिन्हे आहेत.

जून आणि सप्टेंबर तिमाहीमध्ये महागाई दर अनुक्रमे २.९ टक्के आणि ३.४ टक्के राहील. तर डिसेंबर तिमाहीसाठी महागाई ३.९ टक्के आणि मार्च तिमाहीसाठी ४.४ टक्क्यांवर पोहोचण्याची शक्यता आहे.एप्रिलमध्ये किरकोळ महागाई ३.१६ टक्क्यांच्या जवळपास ६ वर्षांच्या नीचांकी पातळीवर आला आहे. रब्बी पीक हंगामात गव्हाचे विक्रमी उत्पादन आणि प्रमुख डाळींचे वाढलेल्या उत्पादनामुळे प्रमुख अन्नपदार्थांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित होईल.

पुढे जाऊन, सामान्यपेक्षा अधिक मान्सूनची शक्यता आणि खरीप पिकांच्या संभाव्यतेसाठी चांगले संकेत आहेत. हे गृहीत धरल्यास महागाई रिझर्व्ह बँकेच्या लक्ष्यानुरूप राहील. महागाईस कारणीभूत ठरणार आणि आयात बिलात सर्वाधिक वाटा असणाऱ्या खनिज तेलासह प्रमुख वस्तूंच्या किमतींमध्ये घट होण्याचे संकेत मिळत आहेत. एप्रिल २०२५ पर्यंत सलग तीन महिने किरकोळ महागाई दर ४ टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा कमी राहिला आहे.

पैसे बिमारी ठीक होने के बाद
उम्र की अधिकता और बीपी शुगर से आई कमजोरी, टायमिंग में कमी, शुक्राणु की कमी, निःसंतान, आदी सभी रोगों का विशेष आयुर्वेदिक पद्धती से इलाज. मनचाहा पॉवर सफलता से प्राप्त करने हेतु संपर्क करें

धन्वंतरी आयुर्वेदिक
भारती कॉम्प्लेक्स नं.२ उद्योग भवन समोर, दारव्हा रोड, यवतमाळ
8767418343

# विदर्भाचा विकास आणि 'समृद्धी' साथ-साथ

## अकराही जिल्हे समृद्धी महामार्गाच्या कक्षेत | रेल्वे आणि विमानासह वाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे उद्घाटन मागील गुरुवारी पार पडले. गडचिरोली, चंद्रपूरसह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना या महामार्गाचा लाभ होणार आहे. महामार्गामुळे नागपूर ते मुंबई ७०१ किलोमीटरचे अंतर आठ तासांत कापणे शक्य झाले असतानाच उद्योग आणि कृषिसंबंधी मालवाहतुकीला नवी दिशा लाभणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



नागपूर ते शिर्डी अशा पहिल्या टप्प्याचे (५०० किलोमीटर) उद्घाटन डिसेंबर २०२२ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूरमध्ये झाले. तर, अंतिम टप्प्याचा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत इगतपुरी येथे पार पडला. नागपूरहून सुरू होणारा हा महामार्ग विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, वाशीम,अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यातून जातो. यवतमाळला जोडण्यासाठी धामणगांव येथे एन्ट्री पॉईन्ट देण्यात आला आहे गोंदिया आणि भंडारा ही दोन्ही जिल्हे नव्या समृद्धी महामार्गावर येणार आहेत नागपुरातील आऊटर रिंगपासून नवा चारपदरी समृद्धी महामार्ग भंडारा जिल्ह्याला स्पर्शून गोंदिया शेजारी बालाघाट रोडला जोडण्यात येणार आहे तर, चंद्रपूर आणि गडचिरोलीया जिल्ह्यांना समृद्धीशी जोडण्यासाठी नागपूर ते चंद्रपूर आणि नागपूर ते गडचिरोली असे नवे महामार्ग तयार करण्याचे काम सुरू आहे.

### एन्ट्री पॉईन्ट

**नागपुरातील शिवमडका येथे एन्ट्री पॉईन्ट असून, वर्धा जिल्ह्यातील नागरिकांना येळाकेळी (जि. वर्धा) येथून रस्ता आहे. अमरावती जिल्ह्यातीन वाहनधारकांना समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी धामणगांव रेल्वे (जि. अमरावती) येथे एन्ट्री पॉईन्ट आहे. वाशीम जिल्ह्यासाठी कारंजा लाड (जि. वाशिम) येथून जोड मार्ग देण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यातून बोरगाव मंजू येथून तर विदर्भाच्या शेवटच्या टोकावर असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातून मेहकर येथून समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी एन्ट्री पॉईन्ट उपलब्ध आहे.**

सिंदी ड्रायपोर्ट वर्धा जिल्ह्यात सिंदी रेल्वे येथे ड्रायपोर्ट तयार करण्यात आला असून, त्याला समृद्धी महामार्गाशी जोडण्यात आले आहे. देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले शहर नागपूर येथे मालवाहतुकीसाटी रेल्वे आणि विमानासह आता समृद्धी महामार्ग हा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. विदर्भातील शेतमाल किंवा अन्य वस्तू मुंबईतील पोर्टवर पाठवण्यासाठी वेगवान मार्ग समृद्धीच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे. कृषी समृद्धीही १० जिल्ह्यांमध्ये मिळून २० पेक्षा अधिक कृषी समृद्धी केंद्र प्रस्तावित आहेत. या गतिमार्गास जिथे इतर राज्य किंवा राष्ट्रीय महामार्ग छेदतील, तिथे ही केंद्रे विकसित केली जाणार आहेत. अशा दोन नगरांमधले सरासरी अंतर ३० किमी असेल. या केंद्रात शेतीवर आधारित अन्न व फळप्रक्रिया उद्योगाला प्राधान्य असेल. शिवाय अन्य उत्पादन आणि व्यापार केंद्रही असेल. सोबतच सर्व मूलभूत सोयीसुविधांसकट रहिवासी क्षेत्रही असेल. आधुनिक नगररचनेच्या नियमांनुसार जमीन वापराचे प्रमाण ठरविले जाणार असून, जमिनीचा अर्धा भाग हा निवासी क्षेत्रासाठी राखीव असेल. १५ टक्के भाग औद्योगिक क्षेत्रासाठी, तर २० टक्के भागअंतर्गत रस्त्यांसाठी राखीव असेल. सोबतच १० टक्के भाग हरितक्षेत्र म्हणून राखीव ठेवला जाईल आणि ५ टक्के भाग हा सार्वजनिक आणि त्यासारख्या अन्य वापरासाठी ठेवलेला असेल.

## CAPTION मी बंधनमुक्त कधी......



**नागपूर : दोन दिवसांआधी जागतिक पर्यावरण आटोपण्यात आला अनेकांचे छायाचित्रांसह बॅनर झळकले, क्यारीतून पाणी टाकत वृक्षारोपण आटोपून घेतले. रॅली सुद्धा काढल्या. नंदनवन सीमेंट रोड मार्गावरील या वृक्षाकडे कुणाचे लक्ष गेले नाही. सदरचा वृक्ष त्याच्या भोवती असलेल्या लोखंडी कठड्यात घट्ट असा बंदिस्त झाला आहे. मोकळा होऊ शकेल तो ?.**

# पर्यावरण रक्षणासाठी जनजागृतीचा प्रभावी उपक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७:** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराजबाग प्राणीसंग्रहालय येथे विशेष जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मनपा आणि सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट एनजीओ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले.

वृक्षारोपण कार्यक्रम, पथनाट्य सादरीकरण, पर्यावरण जनजागृती मोहीम राबविण्यात आली. पथनाट्यात ओला-सुका कच०याचे विलगीकरण, प्लास्टिकचा मर्यादित वापर आणि वायू प्रदूषण रोखण्याचे उपाय यावर प्रभावी संदेश दिला गेला. पर्यावरण वाचवायचे असेल तर सुरुवात आपल्या दारातून हवी, असे आवाहन करण्यात आले. 'झाडे लावा, झाडे जगवा' हे घोषवाक्य उपस्थित प्रेक्षकांच्या मनात ठसवण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजीत मोटघरे होते प्रमुख पाहुणे म्हणून पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग कृषी महाविद्यालयातील डॉ. भावना वानखेडे उपस्थित होत्या. कार्यक्रमास श्री. दरवडे क्युरेटर, विज्ञान विभाग प्रमुख नेहा ठाकूर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता तांदळे शिक्षणाधिकारी /जीवशास्त्रज्ञ, महाराजबाग प्राणीसंग्रहालय, नागपूर यांनी केले. महेश पांडे, पशुधन पर्यवेक्षक यांनी आभार मानले. डॉ. एस.एस. बावस्कर, प्रभारी अधिकारी महाराजबाग प्राणीसंग्रहालय, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन पार पडले.

# विधानभवन विस्तारीकरणात सर्वसमावेशक नियोजनावर भर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७:** विधानभवन विस्तारीकरण करताना पर्यावरणपूरक व सर्वसमावेशक नियोजनावर भर देण्यात येत आहे. यासंदर्भात येत्या २५ जून रोजी मुंबईत बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले.



विधानभवन नागपूर येथील विस्तारांतर्गत इमारतीचे बांधकाम व जमिनीच्या अधिग्रहणासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानुसे, मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्यासह संबंधित कार्यान्वयन यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते. विधिमंडळाची हेरिटेज इमारत कायम ठेवून हेरिटेज वास्तूव्यतिरिक्त उपलब्ध जागेच्या प्रस्तावित बांधकामाची माहिती सादर करण्यात यावी. विधिमंडळ परिसरात प्रस्तावित बांधकाम करताना पुरेशा प्रमाणात झाडे लावून पर्यावरणपूरक करण्यावर भर देण्यात यावा. रस्ते मोठे व प्रशस्त असावेत. मुंबईतील पावसाळी अधिवेशनापूर्वी २५ जून रोजी मुंबईत बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीत सर्व माहिती सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी दिले. राजस्थान विधिमंडळात संग्रहालय उभारण्यात आले आहेत. याच धर्तीवर नागपूर विधिमंडळ परिसरात संग्रहालय उभारण्यात येऊ शकते का याची पडताळणी करण्याची सूचना केली सोबतच एफएसआय, पुरातत्व विभागाच्या परवानग्या यांचीही माहिती सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी दिले. बैठकीनंतर विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी विधिमंडळाची दोन्ही सभागृहे, मंत्रिदालनांसह विधिमंडळ परिसराची पाहणी करीत आवश्यक सूचना संबंधितांना दिल्या.

# कौशल्ययुक्त युवापिढी घडविण्यास प्राधान्य : कौशल्य मंत्री

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७:** राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत तंत्रकुशल युवा मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने धोरण जाहीर केले असून, यात कंपन्यांच्या सहभागातून त्यांना गरजेनुरूप कौशल्य असलेली युवापिढी घडविण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले.



### विदर्भात नवे उद्योग

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रयत्नांतून विदर्भात अधिक प्रमाणात नवे उद्योग येत आहेत. मोठी गुंतवणूक उद्योजक विदर्भात करत आहे. यातून साकारणाऱ्या उद्योग क्षेत्राला अपेक्षित असणारे तंत्रकुशल मनुष्यबळ शासनाच्या या नव्या धोरणातून निर्माण होईल, अशी अपेक्षा 'अडव्हाँटेज विदर्भ'चे अध्यक्ष किरण काळे यांनी व्यक्त केली.**

सार्वजनिक-खाजगी भागिदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अद्यावतीकरणाबाबत आयोजित परिसंवादात ते बोलत होते. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापिठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर, अडव्हाँटेज विदर्भचे अध्यक्ष आशिष काळे, सहसंचालक योगेश पाटील, निखिल मुंडले, मीत्राचे समन्वयक विनयकुमार सोटे,विविध कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. राज्यात शासनावे ४१८ औद्योगिक प्रशिक्षण केंद्र असून, खाजगी क्षेत्रातील ६०० औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या संस्थांतील प्रशिक्षण हे औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधीप्रमाणे, गरजेप्रमाणे करावे लागेल ही वस्तुस्थिती आहे. यातील काही त्रुटी शासनाने समजून घेतल्या असून, त्यावर मात करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे खाजगी भागीदारीद्वारे अद्यावतीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. यासाठी कंपन्यांनी विश्वासाने पुढे यावे, असे आवाहन मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले. आपल्या आयटीआय संस्थांचे जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतर करण्याचा उद्देश आपण या धोरणापाठीमागे निश्चित केला आहे. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय, शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी या विभागाच्या सहभागातून सदर धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. मानवी कौशल्याची गुंतवणूक ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्याला पर्याय नसून त्यासाठीच शासनाने हे नवे धोरण आणले आहे. सर्वांनी एकत्र येवून प्रयत्न केल्यास कुशल मनुष्यबळाचा प्रश्न तत्काळ मार्गी लागेल, असे कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या.

# 'फिटमेंट सेंटर'ची संख्या वाढविणार

**नागपूर, दि. ७:** वाहनांना एचएसआरपी अर्थात हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट लावण्यासाठी 'फिटमेंट सेंटर'ची संख्या वाढविणार असल्याची माहिती आहे. प्रादेशिक परिवहन विभागाने एचएसआरपी लावण्यासाठी ३० जून ही मुदत दिली आहे. मात्र, केवळ २४ दिवसांत २४.५ लाख वाहनांना नवी नंबर प्लेट बसवणे शक्य नसल्याचे लक्षात येताच फिटमेंट सेंटरची संख्या वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांना आता शहरात विविध ठिकाणी वाहनांना नंबर प्लेट लावता येणार आहे. प्रादेशिक परिवहन विभागाकडून १जानेवारी पासून एचएसआरपी नंबर प्लेट लावण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली होती. या प्रक्रिया आता पाच महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होत आहे. मात्र, अजूनही वाहनधारकांनी ऑनलाईन नोंदणी करण्याकडे लक्ष दिलेले नाही.

# फेसबुकद्वारे मैत्रीच्या जाळ्यात; नंतर आर्थिक फसवणूक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७:** मुंबईतील कल्पेश कक्कड नावाच्या व्यक्तीने शहरातील महिलेला फेसबूकच्या माध्यमातून मैत्रीच्या जाळ्यात ओढले आणि त्यानंतर तिच्याशी शारीरिक संबंध जोडले. तसेच, तिच्या कुटुंबीयांची आर्थिक फसवणूक केल्याने जरीपटका पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, अधिक तपास सुरू आहे.

पोलिसांनुसार, कक्कडने संबंधित महिलासोबत फेसबुकवर ऑनलाईन संवाद साधून विवाह आणि आर्थिक विकासाचे आमिष दाखवून विश्वास संपादन केला. जानेवारी २०२४ मध्ये तो नागपुरात आला. भेटीदरम्यान दोघांमध्ये शारीरिक संबंध निर्माण झाले. तसेच, महिला आणि तिच्या भावाला बनावट शेअर बाजाराच्या गुंतवणुकीसाठी पैसे देण्यास सांगून त्यांना १२ लाख रुपये शेअर बाजारात गुंतवणुकीसाठी पैसे मागितले. मात्र, एक रुपयाही परत केला नाही. पीडितेने त्याविषयी विचारणा केली असता आरोपीने धमक्या देत खाजगी छायाचित्र व्हायरल करण्याची धमकी दिली. पीडितेने तक्रार केल्यानंतर पोलिसांनी आरोपीला पुण्यातून अटक केली. आरोपीने याच माध्यमातून फसवणूक केल्याच्या संशयावरून तपास सुरू केला आहे. आरोपींनी ज्या महिलांची फसणूक केली, अशा महिलांनी पुढे येऊन चौकशीमध्ये मदत करण्याचे आवाहन पोलिस विभागाने केले आहे.

# उद्योजकांसाठी संशोधन आणि नवोपक्रमाची दारे झाली खुली!

## उद्योग-शिक्षण सहकार्याला बळकटी; 'व्हीआयए' शिष्टमंडळ व्हीएनआयटीच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'ने प्रभावित!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ जून :** उद्योग-शिक्षण सहकार्य बळकट करण्याच्या दृष्टीने, 'व्हीआयए' शिष्टमंडळाने नागपूर व्हीएनआयटीच्या 'सिमेन्स सेंटर ऑफ एक्सलन्स'ला भेट दिली. इंडस्ट्री ४.० चे अत्याधुनिक तंत्रज्ञान पाहून, शिष्टमंडळ प्रभावित झाले असून, संशोधनाची दारे उद्योजकांसाठी खुली झाली आहेत.



विदर्भातील उद्योग आणि शिक्षण क्षेत्र यांच्यातील परस्पर सहकार्य वाढवून औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनने (व्हीआयए) नुकतेच एका विशेष पाहणी दौऱ्याचे आयोजन केले होते. 'व्हीआयए'च्या १५ उद्योजकांच्या शिष्टमंडळाने, प्रशांत मोहोटा (गिमाटेक्स इंडस्ट्रीज प्रा. लि.) यांच्या नेतृत्वाखाली, नागपूर येथील विश्वेश्वरैया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (व्हीएनआयटी) येथे असलेल्या व्ही. आर. जामदार सिमेन्स सेंटर ऑफ एक्सलन्सला भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश इंडस्ट्री ४.० आणि डिजिटलायझेशनशी संबंधित अत्याधुनिक संशोधन आणि नवोपक्रम सुविधांचे अवलोकन करणे हा होता. यावेळी व्हीएनआयटीचे डीन (संशोधन आणि सल्ला) प्रा. यशवंत कटपटल आणि डॉ. मनमोहन गोयल यांनी शिष्टमंडळाला माहिती दिली. त्यांनी सांगितले की, हे केंद्र एक मजबूत तांत्रिक शिक्षण इको-सिस्टम तयार करण्यावर आणि उद्योगांसोबत मजबूत भागीदारी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. शिष्टमंडळाने केंद्रातील सीएनसी लॅब, स्मार्ट फॅक्टरी लॅब, रोबोटिक्स लॅब, प्रोडक्ट डिझाईन आणि व्हॅलिडेशन लॅब, आयओटी लॅब आणि मेकाट्रॉनिक्स लॅबसह एकूण अकरा अत्याधुनिक प्रयोगशाळांना भेट दिली. केंद्रातील तज्ज्ञ मोहसीन खान, आदित्य सरयकर, ऋषभ लोणकर, योगेश वासाडे आणि प्रतीक बुरहान यांनी शिष्टमंडळाला विविध प्रात्यक्षिके दाखवली. यात ऑटोमेशनचे फायदे, औद्योगिक रोबोटिक्समधील हँड्स-ऑन अनुभव, डिजिटल उत्पादन विकास आणि फॅक्टरी लेआउट डिझाइन ऑप्टिमायझेशन यांसारख्या प्रक्रियांचा समावेश होता. या भेटीमुळे स्थानिक उद्योजकांना भविष्यातील तंत्रज्ञानाची आणि संशोधन सुविधांची जवळून माहिती मिळाली, ज्यामुळे भविष्यात अनेक संयुक्त प्रकल्पांचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. या यशस्वी भेटीसाठी केंद्राच्या कार्यक्रम संचालक डॉ. शीतल चिद्दरवार, केंद्र व्यवस्थापक सुरज रायपुरे आणि वरिष्ठ तंत्रज्ञ पराग बोरकर यांचे विशेष आभार मानण्यात आले.

### काय आहे 'इंडस्ट्री ४.०'?

**इंडस्ट्री ४.० म्हणजे उत्पादन आणि औद्योगिक प्रक्रियांचे आधुनिकीकरण. यात ऑटोमेशन, रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), स्मार्ट फॅक्टरी यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन अधिक कार्यक्षम, वेगवान आणि अचूक बनवले जाते. व्हीएनआयटीचे हे केंद्र याच भविष्यातील तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि संशोधनाची सुविधा उद्योगांना पुरवते.**

### प्रात्यक्षिकांचे आयोजन

**'व्हीआयए'च्या शिष्टमंडळाने भेटीदरम्यान फाइव्ह ॲक्सिस सीएनसी मशीनिंग, एमआयजी आणि स्पॉट-वेल्डिंगसाठी रोबोट प्रोग्रामिंग, तसेच टेकनोमॅटिक्स सॉफ्टवेअरद्वारे फॅक्टरी लेआउट सिम्युलेशनची प्रात्यक्षिके अनुभवली. या थेट प्रात्यक्षिकांमुळे उद्योजकांना हे तंत्रज्ञान आपल्या उद्योगात कसे वापरावे, याची प्रत्यक्ष माहिती मिळाली.**

## थोडक्यात

### लेव्हल क्रॉसिंग गेट' दिनानिमित्त जनजागृती

**नागपूर :** आंतरराष्ट्रीय 'लेव्हल क्रॉसिंग गेट' दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने विविध भागांतील क्रॉसिंग गेटवर जनजागृती उपक्रम राबविला. गाव असो वा शहरात किंवा निर्जन ठिकाणी असलेल्या रेल्वे क्रॉसिंग गेटवर रेल्वेलाईन पार करण्यासाठी काही नागरिक आणि वाहनधारक घाई करत असतात. मेन गेट बंद होत असताना देखील अनेक वाहनधारक पलीकडे जाण्यासाठी घाईगडबडीत वाहन आतमध्ये टाकतात. मात्र, अशावेळी वाहन रुळावर बंद पडले किंवा अडकले तर मोठा धोका होऊ शकतो. काही जण गेट बंद झाले असताना तसेच दुरून गाडी येत असल्याचे दिसूनही दुचाकीचालक, सायकलस्वार किंवा पायी जाणारे नागरिक गेटच्या लोखंडी पाईप खालून शिरतात आणि रेल्वे लाईन ओलांडण्याचा प्रयत्न करतात. हीच बाब नजरेत घेत कळमना-कोहळी मार्गावरील रेल्वे क्रॉसिंग गेटवर रेल्वे कर्मचाऱ्यांनी नागरिक, वाहनधारकांशी संवाद साधला. क्रॉसिंग गेटवर थांबून दोन्ही बाजूचे निरीक्षण करा. गाडी येण्याचा आवाज ऐका आणि त्यानंतरच पुढे जा, असा सल्ला दिला.

### हरिभाऊ नाईक यांचा तिसरा स्मृतिदिन आज

**नागपूर :** कामगार नेते, माजी महापौर, माजी मंत्री हरिभाऊ नाईक यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्ताने रविवारी (८ जून) सकाळी साडेदहा वाजता शिक्षक सहकारी बँक सभागृहात कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ज्येष्ठ नेते दत्ता मेघे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे, आमदार अभिजीत वंजारी, कामगार नेते एस क्यू जामा यांची प्रामुख्याने उपस्थिती असेल. इयत्ता १० वी व १२ वीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमात जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन हरिभाऊ नाईक स्मृती समाजसेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

### सीआरपीएफ नागपूरद्वारे वृक्षारोपण

**नागपूर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सीआरपीएफ, नागपूरद्वारे वृक्षारोपण करण्यात आले. उप महानिरीक्षक अनिल कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात एकूण १५०० रोपे लावण्यात आली. कीर्ती जांभोळकर, पूनम गुप्ता यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन रोपे लावली. याप्रसंगी अनिल कुमार यांनी अधिकारी, जवान आणि कर्मचाऱ्यांना पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली. डॉ. एम.के. सिन्हा उप महानिरीक्षक (वैद्यकीय) संयुक्त रुग्णालय नागपूर, अधिकारी, जवान, कुटुंबियांनी कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली.




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, रविवार, दि. ८ जून २०२५




# धरणात सुट्टीचा आनंद ठरला जीवघेणा!

## चिखलगावचे दोन युवक खोल पाण्यात बुडाले; पिंजरच्या आपत्कालीन पथकाची तत्काळ शोधमोहीम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** उन्हाच्या कडाक्यापासून दिलासा मिळावा म्हणून धरणात गेलेल्या चिखलगावच्या दोन तरुणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी उघडकीस आली. मृतांची नावे योगेश आश्रुबा डाहाळे व कार्तिक कृष्णा डाहाळे (१८) अशी असून दोघेही चिखलगाव येथील रहिवासी होते.



शनिवारी दुपारी बार्शीटाकळी तालुक्यातील बोरमळी-चेलगाव धरण परिसरात हे दोघे थंडावा घेण्यासाठी गेले होते; मात्र पोहता न येत असतानाही त्यांनी खोल पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला आणि काही क्षणांतच दोघेही प्रवाही पाण्यात बुडाले. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच तहसीलदार राजेश वझीरे, पुनोती विभाग प्रमुख राजू पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. तत्काळ पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशनच्या संत गाडगेबाबा आपत्कालीन बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. दीपक सदाफळे यांच्या नेतृत्वाखाली मयूर सळेदार, शेखर केवट, अंकुश सदाफळे, विष्णू केवट, किशोर तायडे, शिवम वानखडे व सार्थक वानखडे या सदस्यांनी अवघ्या वीस मिनिटांत शोधमोहीम सुरू केली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर दोन्ही युवकांचे मृतदेह २० फूट खोल पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले. बार्शीटाकळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार धुमाळ, उपनिरीक्षक वारे व अन्य पोलीस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संदीप साबळे यांनीदेखील बचाव कार्यात समन्वय साधला. या अपघातामुळे चिखलगाव व परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांनी प्रशासनाकडे धरण परिसरात सूचना फलक लावण्याची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनानेदेखील नागरिकांना जलस्रोताजवळ सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

### एक निष्काळजी क्षण आयुष्यभराचे दुःख!

आयुष्यात एक निष्काळजी क्षण आयुष्यभराचे दुःख देऊ शकतो. या घटनेतून धडा घेत नागरिकांनी सुरक्षिततेच्या उपाययोजना आत्मसात करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## झुंडशाही व गुंडशाहीला कदापि खपवून घेणार नाही – आ. देशमुख

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** लोकशाहीत सत्ताधारी पक्षाला जाब विचारणे, नागरिकांच्या प्रश्नांवर न्याय मागणे हा अधिकार असताना सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. जनतेच्या प्रश्नांवर नेहमीच आवाज उठवत राहू, झुंडशाही व गुंडशाहीला कदापि खपवून घेणार नाही, जशाला तसे प्रतिउत्तर देऊ, असा इशारा शिवसेनेचे उपनेते आ. नितीन देशमुख यांनी दिला आहे.



जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन होत असताना लोकाभिमूख विकास कामांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे; मात्र सत्ताधारी पक्षाकडून सत्तेच्या बळावर विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतो, दलित वस्ती कामांचा ३६ कोटींचा निधी वळता करणे आणि इतर विकास कामांचा २९ कोटींचा निधी परत जाणे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. नागरिकांच्या विकासाच्या योजना राबविताना कोट्यवधींचा निधी उपयोगात न येणे याला जबाबदार कोण? याचे उत्तर अपेक्षित आहे. केवळ सत्तेच्या बळावर विरोधकांचा आवाज दाबणे, मन मर्जी कारभार करणे कदापि खपवून घेतले जाणार आहे. सर्वसामान्यांचे हक्क व अधिकार मिळविण्यासाठी आम्ही लोकशाही मार्गाने लढत असताना सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणारच आहोत, विरोधकांच्या कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही, असेही आ. देशमुख म्हणाले.

## रेल्वे वेळापत्रक कोलमडले! आझाद हिंद एक्स्प्रेस २१ तास उशिरा



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** हावडा-मुंबई या महत्त्वपूर्ण रेल्वेमार्गावरील प्रवास सध्या प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहे. गाड्यांचे वेळापत्रक पूर्णतः कोलमडल्याने प्रवाशांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असून, ४० अंश सेल्सिअसच्या कडक उन्हात ही प्रतीक्षा अजूनच वेदनादायक ठरत आहे.

हावडा-पुणे आझाद हिंद एक्स्प्रेस (१२१३०) ही गाडी अकोल्यात ६ जून रोजी सायंकाळी ७:३७ ला पोहोचण्याची अपेक्षा होती; मात्र ही गाडी तब्बल २१ तास २७ मिनिटे उशिराने, म्हणजेच ७ जून रोजी दुपारी ५:०४ वाजता अकोल्यात दाखल झाली. या अपवादात्मक विलंबामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तसेच, १८०३० शालिमार एलटीटी एक्स्प्रेस हीही जवळपास ११ तास उशिराने धावत आहे. याशिवाय अन्य महत्त्वाच्या गाड्यांचे वेळापत्रकही कोलमडले आहे. अशा स्थितीत, अनेक प्रवाशांचे कार्यक्रम, फ्लाइट कनेक्शन, विवाह वा वैद्यकीय अपॉइंटमेंट्स यांसारखे नियोजन कोलमडत असून, प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे. प्रवासी वर्गाने प्रवासाला निघण्यापूर्वी रेल्वेच्या अधिकृत ॲप अथवा वेबसाइटवरून वेळापत्रक तपासण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अद्यापपर्यंत रेल्वे प्रशासनाकडून या व्यापक विलंबामागील कारण वा स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

सध्याच्या उष्णतेची लाट आणि उन्हाळी गर्दीच्या काळात रेल्वे व्यवस्थापनाचे अकार्यक्षम नियोजन पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. आगामी काळात प्रवाशांच्या सोयीसाठी प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

- **१२८१० हावडा मुंबई मेल सुमारे ६ तास उशिरा.**
- **१२८७० हावडा सीएसएमटी एक्स्प्रेस सुमारे ४ तास उशिरा.**
- **१२८६० गीतांजली एक्स्प्रेस ४ तासांपेक्षा अधिक उशिरा.**
- **२२८४६ हटिया पुणे सुपरफास्ट एक्स्प्रेस १ तास ३० मिनिटे उशिरा.**
- **१२९०६ शालिमार पोरबंदर एक्स्प्रेस ३ ते ५ तास उशिरा.**
- **१२१५२ समरसता एक्स्प्रेस (शालिमार एलटीटी) ३ ते ५ तासांपर्यंत उशिरा.**

## ईद मुबारक: नमाज पठण आणि गळाभेट.. शुभेच्छा!



अकोला : बकरी ईदनिमित्त जुने शहरातील हरिहर पेठ परिसरातील शाही ईदगाहवर मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करून बकरी ईद साजरी केली. यावेळी मुस्लिम बांधवांनी एकमेकांना ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी दोन छोट्या बालकांनी गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या. (छाया.संजय ताथुरकर)

## नवनियुक्त पोलीस अधीक्षकांचे अकोला शहरात पथसंचलन!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** अकोला जिल्हा पोलीस दलात नुकतेच पदभार स्वीकारलेले पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या नेतृत्वाखाली आज अकोला शहरात भव्य पथसंचलनाचे आयोजन करण्यात आले. शहरातील शांतता व सुव्यवस्थेचा संदेश देण्यासाठी हे पथसंचलन आयोजित करण्यात आले होते. पथसंचलनाची सुरुवात हरिहरपेठ भागातील सप्तश्रृंगी देवी मंदिर परिसरातून करण्यात आली.



त्यानंतर पथसंचलनाचे मार्गक्रमण चांदखा प्लॉट, किल्ला चौक, पोळा चौक, तुराबअली मस्जिद, गंगाधर चौक, जयहिंद चौक, अगरवेस, दगडीपूल चौक, मासुमशहा दर्गा चौक, लक्कडगंज, चंद्रशेखर आझाद चौक, माळीपुरा चौक, अकोट स्टँड, सुभाष चौक, तेलीपुरा, मच्छी मार्केट, ताजनापेठ चौक, सराफा, गांधी चौक, कोतवाली चौक मार्गे गणेश घाट येथे विसर्जनाद्वारे समारोप करण्यात आला. या पथसंचलनात अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी, विविध पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, २९ पोलीस अधिकारी आणि २२१ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत राज्य राखीव पोलीस बलाचे ४० जवान व ३१ होमगार्ड सैनिकही उपस्थित होते.

या पथसंचलनात अकोला पोलिसांचा मोठा वाहन ताफाही सहभागी होता. यात वज्र वाहन, दामिनी पथक, विशेष पेट्रोलिंग युनिट्स, डायल ११२ यांसारखी यंत्रणा सज्ज होती. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण झाला आहे. बकरी ईदचा सण सौहार्दपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस दल पूर्णपणे सज्ज असून, नागरिकांनी शांतता, ऐक्य व सहकार्य राखावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले.




# महानगराचे पाणीपुरवठा वेळापत्रक कोलमडले

## जलकुंभ भरण्यास विलंब; पाण्यासाठी भटकंती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ७ :** मान्सूनपूर्व पावसाचा जोर ओसरला असून, ऊन तापणे सुरू झाले आहे. अशा स्थितीत महापालिका पाणीपुरवठा विभागाचे नियोजन कोलमडले असून, पाच दिवसांआड होणारा पाणीपुरवठा अनियमित झाल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. नळाशिवाय पर्याय नसलेल्या नागरिकांना आपली तहान भागविण्यासाठी कसरत करावी लागत आहे.

आठ लाख लोकसंख्या असलेल्या अकोला शहराला काटेपूर्णा प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो. एप्रिल व मे महिन्यात कडाक्याचे उन्ह तापल्याने काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा बाष्पीभवन होऊन कमी झाला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने शहरातील पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक बदलले. दर पाच दिवसांआड शहरातील विविध भागाला पाणी पुरवठा करण्याचे नियोजन केले. दरम्यान, शहरातील काही भागात जलवाहिनीचे काम सुरू असल्याने पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले. परिणामी, या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. तेव्हापासून शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले आहे. दरम्यान, मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावल्याने पाण्याची मागणी कमी झाली. हवेत गारवा आल्याने थंड हवा देणाऱ्या कुलरचा वापरही कमी झाला; मात्र आता पावसाने ब्रेक दिला असून, पाण्याची मागणी वाढू लागली आहे. अशातच पाणीपुरवठा विभागाचे नियोजन कोलमडले आहे. पाच दिवसांआड होणारा पाणीपुरवठा अनियमित झाला आहे. नागरिकांना नळाची प्रतीक्षा करावी लागत आहे. जलकुंभ भरण्याचे कारण पाणीपुरवठा विभागाकडून दिले जात आहे. परिणामी, नागरिकांना पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिका प्रशासन मालमत्ता कर घेताना एक पैसाही कमी घेत नाही; मात्र आठवड्यातून एकदा पाणीपुरवठा केला जात आहे. हा कुठला न्याय आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करीत असून, ठरवलेल्या वेळापत्रकानुसार नळ सोडले जात नसल्याची ओरड होत आहे. पुरेशा दबावाने पाणीपुरवठा होत नसल्याने काही वस्त्यांना पाणी मिळत नसल्याची परिस्थिती आहे. नागरिकांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. नळाशिवाय पर्याय नसलेल्या नागरिकांची मोठी पंचाईत होत असून, पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. दर पाच दिवसांआड नळ येतात, असे नियोजन करून पाणी साठवून ठेवले जात आहे.

### पाणी ओढण्यासाठी मोटरचा वापर

जलकुंभावरून प्रेशरने पाणीपुरवठा होत नसून काही नागरिकांना पाणी मिळत नसल्याचे चित्र आहे. पाणी ओढण्यासाठी मोटरचा वापर सर्रासपणे सुरू असून, ज्यांच्याजवळ ही व्यवस्था नाही, त्या वस्तीत पाणीच पोहोचत नसल्याची परिस्थिती आहे. पाणी ओढण्यासाठी मोटर वापरणाऱ्यांवर पाणीपुरवठा विभागाकडून कारवाई होत नसल्याने मोटरचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

### म्हणे सर्वेक्षण करणार!

पाणी ओढण्यासाठी मोटरचा वापर करणाऱ्या नळधारकांवर कारवाई करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येईल, असा दावा करण्यात आला होता; मात्र अद्यापही ही कार्यवाही सुरू झाली नाही. हे कमी म्हणून की काय अवैध नळ कनेक्शन शोधून कारवाई करण्यात येईल, असा दावासुद्धा पाणीपुरवठा विभागाने केला होता; पण अजूनही मुहूर्त निघाला नाही.




| | | |
|---|---|---|
| लक्ष्मी नगर मधील संतोष ढाकूलकर घर ते गजानन पवार घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 42,37,466 | 9.00 वाजता |
| सुपलदास नगर मधील गुळदे घर ते देवळे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 61,19,365 | 9.30 वाजता |
| रमाबाई कॉलनी मधील गजानन काजळे घर ते सावंत घर ते दिलीप चव्हाण यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 58,03,446 | 10.00 वाजता |
| कारंजा जि. वाशिम दत्त कॉलनी येथील देशमुख घर ते अॅड. खंडागळे ते बन्सोड न.प. कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे. | 49,46,890 | 10.30 वाजता |
| कारंजा जि. वाशिम महावीर कॉलनी मुर्तीजापूर रोड येथील कथे ते बोरकर यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे. | 48,13,623 | 10.45 वाजता |
| कारंजा जि. वाशिम महावीर कॉलनी येथील ताठे घर ते डॉ. ठाकरे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे. | 32,89,480 | 11.00 वाजता |
| कारंजा जि. वाशिम महावीर कॉलनी येथील मूंदे घर ते अवघन यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे. | 17,63,955 | 11.15 वाजता |
| कारंजा जि. वाशिम महावीर कॉलनी येथील पांडे घर ते राठोड घर दत्त कॉलनीमध्ये कॉंक्रीट रस्ता च नाली बांधकाम करणे. | 40,43,774 | 11.30 वाजता |
| कारंजा जि. वाशिम येथील वनदेवि मंदीर बाय पास येथे सभागृह बांधकाम करणे | 16,00,569 | 12.00 वाजता |
| कारंजा जि. वाशिम येथील गुड्डू मनवर ते सुधाकर नाईक वैभव लक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे.. | 17,22,183 | 12.15 वाजता |
| शिक्षक कॉलनी मधील हनुमान मंदीर ते शिरे सर घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. | 36,81,536 | 12.30 वाजता |
| कारंजा जि. वाशिम मातंगपुरा कारंजा येथे सामाजीक सभागृह बांधकाम करणे. | 16,32,920 | 01.00 वाजता |
| कारंजा जि. वाशिम येथील मंगरुळ वेश ते रामासावजी चौकापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे. | 1,28,10,479 | 01.15 वाजता |
| कारंजा जि. वाशिम येथील मंगरुळ वेश ते शिवाय नमः मठ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 50,32,271 | 01.30 वाजता |
| कारंजा नगर परिषद हद्दीतील शाळांमध्ये शौचालय बांधकाम करणे. | 66,28,331 | 01.45 वाजता |

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा



बुलडाणा, रविवार ८ जून २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिव राज्यभिषेक दिन साजरा

**चिखली :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिखली येथे आज दि. ६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्धाटन ऑनलाईन व्हिडिओद्वारे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला आमदार श्वेताताई महाले पाटील, अंकुशराव पाटील, आयएमसीचे उपाध्यक्ष अजित कोठारी, कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. केदार ठोसर, प्रा. प्रशांत देशमुख, आयएमसी सदस्य मनोज सोनूने, भिकाजी पाटील, प्रशांतजी बोधेकर, मिलिंद हिवाळे, अमोल गवले, प्राचार्य श्री.बेदरकर, सागर पुरोहित यांची उपस्थिती होती.

या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्य तथा सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

### शिवराज्यभिषेक दिन उत्साहात संपन्न

**मोताळा :** सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा जि.बुलढाणा येथे आज दि.६ जून रोजी शिवराज्यभिषेक दिवस सोहळा उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी पंच परीवर्तन व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संस्थेच्यावतीने विविध व्यसायातील माहिती दर्शक स्टॉल, प्रवेश प्रचार स्टॉल मांडण्यात आलेले होते. कार्यक्रमात नंदकिशोर जाणे, ॲड. योगेश पाटील, गणेश झंवर, प्रमोद कौसकर, विश्वास पाटील, संस्थेचे आय.एम.सी. अध्यक्ष प्रसाद जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

### मोटारसायकल चोरीप्रकरणी तीन गुन्ह्यांची उकल

**शेगाव :** शेगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना पोलिसांनी तीन गुन्ह्यांची यशस्वी उकल केली आहे. भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत दाखल वा गुन्ह्याच्या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास राबवला. तपासादरम्यान एका विधी संघर्षित बालकास ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या पाच मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. पुढील तपास शेगाव शहर पोलीस करीत आहेत.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १२५० – २४७५ |
| गहू | १६००–२५०० |
| तुर | ४१०० – ६६७५ |
| हरभरा | ४३०० – ५४५० |
| सोयाबीन | ३५०० – ४४०० |
| भुईमुग | ३००० – ५४७० |
| उडीद | ५००० – ६५०० |
| मक्का | १३७० – १९०५ |
| मूंग | ४००० – ६४०० |
| मलाई चना | ५३००–५३०० |
| बाजरी | १४०० – १६७५ |

# आदर्श ज्ञानपीठ व कॉलेज कागदोपत्री, भ्रष्टाचाराची चतु:सूत्री..!

* शाळा नूतनीकरण मान्यता आदेश पत्रातही घोळ
* गटशिक्षण अधिकाऱ्याचे शिफारस पत्रापुर्वीच मिळाली मान्यता
* तत्कालीन शिक्षण अधिकारी (प्राथमिक) बी.आर.खरात यांचा प्रताप

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**खामगाव दि.७**




कुठल्याही शाळेची स्थापना किंवा दर्जावाढ करिता शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार शाळेच्या संस्थेचेकडे १ एकर पेक्षा कमी क्षेत्रफळ नसावे. तसेच खेळाचे मैदान असणेही आवश्यक आहे. यासोबतच वर्गखोल्या, प्रसाधनगृह अशा अनेक अंटीची पुर्तता करणे बंधनकारक असते. आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेजची सध्यास्थितीतील घाटपूरी नाका स्थित इमारत पाहता आधंळा सुध्दा ह्या अटी पूर्ण होत नाही हे सांगु शकेल. त्यामुळे आदर्श ज्ञानपीठ स्कुल हे केवळ कागदोपत्री अंटीची पुतर्ता करत असून यामध्ये शिक्षण अधिकारी व संबंधितांचे सुध्दा चांगभले झाल्याचे दिसून येत आहे.

माहिती अधिकारात या शाळेचा मान्यता आदेश मिळविला असता यामध्ये आदेश देण्याची तारीख २ जानेवारी २०२३ दर्शविली आहे. तर याच आदेश पत्रात गट शिक्षण अधिकारी पं.स खामगाव यांनी शाळा नुतणीकरणासाठी पाठविलेले प्रस्ताव ५ जुलै२०२३ या तारखेचा उल्लेख आहे. त्यामुळे प्रस्ताव जाण्याआधिच तत्कालीन शिक्षण अधिकारी प्राथ. बी.आर. खरात जि.प. बुलडाणा यांनी शाळेला मान्यता दिलीच कशी हा प्रश्न उपस्थित होत आहे. यासोबतच शाळा मान्यता पत्रात गट शिक्षण आधिकारी खामगाव यांच्या शिफारशीनुसार १एप्रिल २०२३ पासुन ते ३१ मार्च २०२६ पर्यंत तीन वर्षाच्याकालावधीसाठी पहिली ते आठवी पर्यंत खालिल अटीं व शर्तीत राहुन तात्पुर्ती मान्यता देण्यात आल्याचे आदेशात लिहुन आहे. याच शिफारस

शाळेचा दर्जा म्हणून नव्हे तर शाळा जवळ आहे म्हणुन आम्ही आमच्या मुलंना या शाळेत टाकतो. शाळा ही अवैधरित्या चालविली जात असेल तर शाळेच्या संचालकाविरूध्द निश्चितच कारवाई व्हावी व आमच्या मुलांना पर्यायीव्यवस्था म्हणून मान्यताप्राप्त शाळेमध्ये प्रवेश मिळवून द्यावा अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आदर्श ज्ञानपीठमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून येत आहेत.

पत्रामधे तत्कालीन शिक्षण आधिकारी यांनी डोळयावर पट्टी बांधून की काय शाळेचे परिसराचे क्षेत्रफळ ८३१ चौमी, एकुण बांधकाम ३३०० चौमी आणि खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ ३२१ चौमी असल्याचे दाखविले आहे. प्रत्यक्षात मात्र आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेज १००० चौ.फुट म्हणजे १ गुंठयात भरत आहे. जे कोणत्याही शाळा स्थापनेच्या किंवा दर्जा वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या नियमात बसत नाहीत. गटशिक्षण आधिकारी यांच्यामते मैदान हे गट नं ५५/२ मधे आहे म्हणजे जिथे संस्थेचे कविश्वरसिंह राजपूत शेतीच्या लाभासह पीकविमासह इतर योजनेचा लाभ घेत आहेत, तिथे खेळाचे मैदान आहे. तर शिक्षण अधिकारी यांच्या अहवालनुसार




व शाळेचा पत्ता बघितल्यास संचालक व शिक्षण अधिकारी यांची मिलीभगत असल्याचे दिसून येते.

शाळेचे काही महत्वाचे कागंदपत्रामध्ये शाळेचा पत्ता हा गट नं ५५/२ घाटपूरी रोडवर असल्याचे दाखवून खामगाव शहरात असल्याचा देखावा करण्यात आला आहे. कागदोपत्री गटशिक्षण आधिकारी आदर्श ज्ञानपीठ इंग्लिश स्कुल गट नं ५५/२ मध्ये जावून तपासणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे गटशिक्षणअधिकारी यांनी गट नं५५/२ मधे जावून खरच तपासणी केली का? तपासणी करतेवेळी त्यांना त्या शेतात इमारत व मैदान दिसले का? हे सर्व प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत. त्यामुळे या शाळेची मान्यता देणारे व शाळेचे संचालक हे दोघेही शासनाची फसवणुक करीत आहेत.

यावेळी शाळेचे अध्यक्ष, सचिव, प्राचार्य यासोबत तत्कालीन गटशिक्षण अधिकारी पं.स.खामगाव, तत्कालीने शिक्षण अधिकारी प्राथमिक जि.प.बुलडाणा यांच्या विरोधात सुध्दा फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी तक्रारदार नरेश भारसाकळे यांनी दै. अजिंक्य भारतच्या माध्यमातुन केली आहे.

## वकाना ते निरोड आणि भिलखेड ते वकाना या रस्त्यांचे काम तात्काळ सुरु करा; अन्यथा आंदोलन –सुजित बांगर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**संग्रामपूर दि. ७**



तालुक्यातील वकाना गावात चौकातील निंबाच्या झाडावर मचान बांधून बेमुदत धरणे आंदोलन ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हा अध्यक्ष विजय भाई वानखडे यांच्या नेतृत्वात सुरू करण्यात आले आहे.

वकाना ते निरोड व वकाना ते भिलखेड हे दोन्ही रस्ते तालुक्याला जोडणारे असुन गेल्या ५ ते ६ वर्षापासुन रखडलेल्या अवस्थेत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना आणि विद्यार्थ्यांना तालुक्याला शासकीय कामासाठी व शेतातील पिकवलेला माल घरापर्यंत पोहोचण्यासाठी शेतकऱ्यांना विद्यार्थ्यांना व दोन्हीं गावातील नागरिकांना खूप मोठा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्या सर्व शेतकऱ्यांनी रितसर त्या दोन्ही रस्त्याचे दानपत्र सुद्धा दिलेले आहेत परंतु शासन दोन्ही रस्ते थांबवण्याचे काम केले जात आहे. दोन्ही रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे या मागणीसाठी दि.०३ जुन २५ रोजी उपविभागीय अधिकारी जळगाव जामोद व सार्वजनिक बांधकाम विभाग जळगाव जामोद यांना निवेदन देण्यात आले होते परंतु अद्याप निवेदनाची कुठलीही दखल न घेतल्यामुळे विजय वानखडे जिल्हा अध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना वकाना येथील झाडावरती मचान बांधून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.आज या आंदोलनाचा दुसरा दिवस यावेळी आपल्या सहकऱ्यांसह सुजित बांगर यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. मागणी रास्त आहे म्हणत आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे.

या दोन्हीं गावातील रस्त्यांचे काम तात्काळ सुरू न केल्यास आंदोलनकर्त्यांच्या समर्थनात लोकशाही मार्गाने रस्त्यावरचे आंदोलन करणार असल्याचे म्हटले आहे. यावेळी आकाश पहुरकर,शुभम तायडे आम्रपाल भिलंगे तथागत अंभोरे सुनिल गव्हांदे यांचेसह आंदोलनकर्ते व ग्रामस्थ उपस्थीत होते.

## नागरिकांकडून स्वखर्चाने नालेसफाई ; ग्रा.पं.चे दुर्लक्ष

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**किनगाव राजा दि.७**

किनगांव राजा गांवामध्ये नागरिकांकडून स्वखर्चाने सफाई करत असल्याचे पाहायला मिळत आहे, ग्रामपंचायत प्रशासनाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षामुळे नागरिकांनी हा निर्णय घेवुन पुढाकार घेतला आहे.

गावामध्ये मागील काही महिन्यांपासून असलेल्या नाल्यांमध्ये घाणीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे, दुर्गंधीमुळे लहान मुलांमध्ये आजाराचे प्रमाण पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वतः सार्वजनिक नाली सफाई करताना ठिकठिकाणी दिसत आहे.मागील काही दिवसांपासून अचानक पाऊस येत असल्यामुळे पावसाचे पाणी साचल्यामुळे दुर्गंधी व मच्छरांचा उपद्रव पाहायला मिळतो त्यामुळे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाकडे जागृत नागरिकांनी वेळोवेळी नाली सफाई मागणी केली. परंतु याकडे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळते,त्यामुळे नागरिकांनी स्वखर्चातून स्वतःच्या घरासमोरची नाली मजुराच्या साह्याने साफसफाई करताना दिसत आहे.तर काही नागरिकांनी स्वतः हातामध्ये फावडे घेऊन नालेसफाई केली आहे.



ग्रामपंचायत प्रशासनाला वारंवार सांगूनही नालेसफाई होत नसल्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या विरोधामध्ये नागरिकांमध्ये रोष पाहायला मिळतो.गांवातील एका जागृत नागरिकांनी गावातील व्हाट्सअप ग्रुपला नाले सफाई करत असल्याचा फोटो शेअर केला त्याामुळे स्थानिक प्रशासन करते तरी काय? असा सवाल नागरिक विचारत आहे. स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासन वेळोवेळी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्यामुळे त्यांच्यावर विसंबून राहणार नसून स्वतःच स्वच्छतेसाठी पुढाकार घेणार असल्याचे काही नागरिकांनी यावेळी बोलताना सांगितले आहे.

## पेट्रोलचा वाढता भाव;पंपांवर मात्र सुविधांचा अभाव

### पेट्रोल पंपांवर हवादाब मापी यंत्रणेचा अभाव, ग्राहकांची गैरसोय

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**दे.राजा दि.७**




पेट्रोल पंपांवर ग्राहकांना काही सुविधा मोफत असतात. या सुविधांचा लाभ घेण्याचा ग्राहकांना हक्क असतो. पण, या सुविधांबद्दल कुठलीही जनजागृती नाही. यात ग्राहक अनभिज्ञ आहेत. ग्राहकही आपल्या हक्कांबद्दल कुठलीच विचारणा करत नसल्याने पेट्रोल पंपांचे मालक ग्राहकांच्या सुविधांकडे कानाडोळा करत आहेत. शहर व परिसरात पंपचालकांची अशीच मनमानी दिसून येत आहे. यामुळे पंपांवर पेट्रोल भरण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांची गैरसोय होत आहे.

देऊळगांव राजा शहर हे दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पेट्रोल पंपांची संख्या सुध्दा वाढत असल्याने नियमानुसार प्रत्येक पंपावर हवा दाब यंत्राणा हवी परंतु काही पंपावर हवा दाब यंत्र कायम बंद असते. किंवा काही ठिकाणी नाहीच. तसेच काही पेट्रोल पंपावर हवा भरण्याची मशीन पेट्रोल पंप चालू झाले. तेव्हापासून नावालाच उभी आहे. मात्र, ही सेवा २४ तास बंद अवस्थेत वर्षानुवर्षांपासून दिसत आहे. शहरात काही नामांकित पेट्रोल पंपचालकांना हवा दाब मापी यंत्रणा चालू ठेवण्याची ॲलर्जी असल्याचे चित्र आहे. पेट्रोल पंपावर अशा काही सुविधा असतात. तुम्ही पेट्रोल पंपावर पेट्रोल भरले नाही, तरी तुम्ही या सुविधांचा लाभ घेऊ शकता. हवा भरण्यासाठी सुविधांचा अभाव पेट्रोल पंपावर दिसत आहे. त्यामुळे ग्राहकांच्या माहिती नसण्याचा गैरफायदा पेट्रोल पंपचालक घेत आहेत. शेकडो-हजारो किमी अंतरावरून रोजची येणारी चारचाकी, दुचाकी, तीन चाकी वाहने पेट्रोल भरतात. परंतु जर टायरमध्ये हवा कमी असेल तर बाहेरून ही हवा भरण्यासाठी जवळपास वाहनचालकाला पन्नास ते शंभर रुपये देऊन वाहनांच्या टायरमध्ये हवा भरून घ्यावी लागते. तसेच रात्री च्या वेळी बहेरुन येणाऱ्या चारचाकी वाहनधारकाना नाहक त्रास सोसावा लागत आहे.

या व्यतिरिक्त पिण्याचे स्वच्छ पाणी, प्राथमिक उपचार किट, महिला व पुरुषांसाठी शौचालय या सर्व सुविधांचा अभाव या पेट्रोल पंपावर दिसून येत आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाने ठरवून दिलेल्या निकषांची प्रत्येक तीन महिन्यांनी पडताळणी पेट्रोल पंपावर जाऊन केली जाते. मात्र, शासनाच्या नियमानुसार कोणतेही पालन पेट्रोल पंप मालक करत नाहीत. याकडे केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाने लक्ष देणे गरजेचे आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अ.भा.म.महासंघ क्रीडा विभागातर्फे शिवराज्याभिषेक दिन साजरा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**खामगाव दि.७**

''एक झाड लाऊया छत्रपती शिवरायांना मानवंदना देऊया'' राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्रजी कोंढरे, यांच्या संकल्पने अंतर्गत रोप वाटप व वृक्ष लागवड कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम शिवाजीनगर खामगाव या ठिकाणी घेण्यात आला. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्या पुतळ्याचे पूजन व हार घालून आभिवादन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. वृक्ष प्रेमींना झाडे वाटून ओंकारेश्वर मंदिर येथे वृक्षरोपण करण्यात आले. तसेच देविदास शर्मा यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार व इंडियन एक्सलन्स अवार्ड २०२५ मिळाल्याबद्दल त्यांचा भगवा दुपट्टा व वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मराठा महासंघ क्रिडा विभाग जिल्हाध्यक्ष विकास चव्हाण, माजी नगराध्यक्ष गणेश माने, जिल्हा संपर्कप्रमुख रमाकांत गलांडे, राष्ट्रीय खेळाडू नरेंद्र मावळे, महिला जिल्हा अध्यक्ष सौ. सुजाताताई शिंदे, सेवा मंडळ अध्यक्ष सुरेशराव घाडगे, दिंगबर गलांडे, सुभाष शेळके, शहराध्यक्ष आकाश खरपाडे, सचिव विशाल भवर, संजय शिंदे, गजानन मुळीक, सुदाम पडोळे, संजय राऊत, नितीन केवारे, राजू जोगदंड, पिंटू थोरात, सागर बेटवाल, नितीन पोकळे, विशाल घोडके, पांडुरंग भोरे, महादेव सुकाळे सौ.मिनाताई मापारी, संदीप गीडे समर्थ शिंदे, यांच्यासह शिव प्रेमी तसेच वृक्ष प्रेमींनी उपस्थित होते.



## स्वाधार योजना; १० जूनपर्यंत अर्जातील त्रुटींची पूर्तता करा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी
**बुलडाणा दि.७**

भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने विभागाच्या संकेतस्थळावर १५ मार्च पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. ज्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचा अर्ज विहित मुदतीत ऑनलाईन प्रणालीवर भरलेले आहेत, त्या सर्व अर्जांची तपासणी कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीमध्ये आहेत त्याांनी दि. १० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने तूटीची पुर्तता करावी, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त भाऊराव रामसिंग चव्हाण यांनी केले आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच भोजन, निवास व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविली जाते. इ. ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्या व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते.ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीमध्ये आहेत त्याांनी दिनांक १० जून २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने त्रुटी पुर्ण करण्याकरीता अंतिम मुदत देण्यात येत आहे.

## थोडक्यात

### बुलडाणा येथे सिनियर कबड्डी जिल्हा निवड चाचणी स्पर्धा

खामगाव : अमरावती येथे दि.२० ते २२ जून २०२५ पर्यन्त होणाऱ्या वरीष्ठ गट पुरुष व महिला विदर्भ राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी बुलढाणा जिल्हाच्या पुरुष व महिला कबड्डी संघाची निवड चाचणी दि. ८ जून रविवार रोजी सकाळी १० वाजता जिजामाता प्रेक्षागार जिजामाता स्टेडियम बुलढाणा बस स्टँड जवळ बुलढाणा येथे आयोजित केली असून इच्छुक खेळाडूंनी निवड चाचणी स्पर्धे साठी वेळेवर उपस्थित रहावे तसेच या स्पर्धेत खेळण्यासाठी सोबत आधारकार्ड आणणे आवश्यक आहे व पुरुषांचे वजन हे ८५ किलो आतील आणि महिला खेळाडूंचे वजन हे ७५ किलो आत असले पाहिजे.संपर्कासाठी गणेश चौकसे कार्याध्यक्ष कबड्डी असो.विदर्भ संघ नागपूर मो.८८८८२०८३३० विजय बोदडे अध्यक्ष बुलढाणा जिल्हा कबड्डी असो. कबडी निवड चाचणी मध्ये खेळाडू ने सहभाग घ्यावा असे आव्हान .गणेशभाऊ चौकसे कार्याध्यक्ष कबड्डी असो.विदर्भ संघ नागपूर. गुणेश तायडे सचिव डिस्ट्रिक्ट कबड्डी असो.बुलढाणा व अध्यक्ष विजय बोदडे यांनी केले आहे.

### राजे विजयसिंह जाधव यांनी उभारली स्वराज्य गुढी

**दे.राजा :** श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त व श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव यांच्या हस्ते शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. शिवशक राजदंड स्वराज्य गुढी पूजनानंतर छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. आर. एच. देवरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला आणि शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व विशद केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील शहाजीराजे, राजमाता जिजाऊ यांचे योगदान डॉ. देवरे यांनी उदाहरणासह पटवून दिले. छत्रपती शिवरायांचा इतिहास किती जाज्वल्य आणि महत्वाचा आहे, हे सुद्धा त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

### युवतीची गळफास घेऊन आत्महत्या

**संग्रामपूर :** तालुक्यातील सोनाळा गावात एका २० वर्षीय युवतीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्याा केल्याची घटना शुक्रवारी दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली आहे. मृत युवतीचे नाव जयश्री अनिल डांग (२०) असे असून, तिने राहत्या घरातील छताच्या अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला, या आत्महत्ये मागचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, जनार्दन गणेश डांगे यांच्या फिर्यादीनंतर सोनाळा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खोने करीत आहेत.

# नाविण्यपूर्ण उपक्रमास प्रोत्साहन द्या- गुलाब खरात

## वार्षिक सर्वसाधारण सभेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले मार्गदर्शन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.७

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष बुलढाणा येथील हिरकणी महिला प्रभागसंघ रायपूरची ''वार्षिक सर्वसाधारण सभा'' ग्रामपंचायत माळवंडी येथे आज दि. ५ जून रोजी घेण्यात आली. या सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी विविध विषयावर मार्गदर्शन करुन नाविण्यपूर्ण उपक्रम तसेच गावात उपलब्ध नसलेल्या व्यवसायांवर भर देण्याचे आवाहन केले.

यावेळी अति. कार्यकरी अधिकारी मोहन, प्रकल्प संचालक राजेश इंगळे, डेप्युटी सीईओ (महिला बाल कल्याण)




एंडोले, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रांत जाधव, जिल्हा व्यवस्थापक तऱ्हेकर, माळवंडी सरपंच संगीता चव्हाण, उपसरपंच अशोक चव्हाण आदी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिलांचा विकास कशाप्रकारे साधला जाऊ शकतो, बचतीचे महत्व, उद्योजक महिलांचे भविष्यातील नियोजन, उत्पादनाचे पॅकेजिंग, ब्रँडिंग, गुणवत्ता कशी असायला पाहिजे अशा विविध विषयावर सभेमध्ये सविस्तररित्या मार्गदर्शन केले. त्यानंतर मिशन उपक्रमा बद्दल माहिती दिली. यामध्ये गरीबातील गरीब कुटुंबातील ज्यांचे १ लाखांपेक्षा उत्पन्न कमी आहे. अशा १० वी परीक्षेत चांगल्या गुणवत्तेने पास झालेल्या मुला मुलींसाठी मिशन + उपक्रमाअंतर्गत त्यांच्यासाठी , इत्यादी क्लासेसच्या फी भरणे गरीब कुटुंबांना शक्य होत नाही. तर त्या विद्यार्थ्यांना मोफत क्लासेस ची व्यवस्था या उपक्रमांतर्गत होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी हिरकणी प्रभागसंघाचा लेखाजोखा, त्यातील आर्थिक उलाढाल तसेच वार्षिक सभेचे केलेले नियोजन या संदर्भात प्रशंसा करत त्यांनी पुढील वाटचालीस कर्मचारी व पदाधिकारी यांना शुभेच्छा दिल्या.

**वार्षिक सर्वसाधारण सभा विषय** मागील वर्षात प्रभागसंघाने केलेल्या कामाचा आढावा आणि पुढील वर्षाचे नियोजन यासंबंधी चर्चा करणे, प्रभागसंघाचे धोरणात्मक निर्णय घेणे, उपसमित्ताने केलेल्या कामाचा आढावा घेणे, वार्षिक सभासदत्व आणि भाग भांडवल याबाबत निर्णय घेणे, प्रभागसंघाचे काम सुरळीत चालवण्यासाठी नियम, नियमावली तयार करणे, प्रभागसंघाच्या कर्मचाऱ्यांचा कामांचा आढावा घेणे, गावातील तालुक्यातील सामाजिक प्रश्नांवर चर्चा आणि त्याा संबंधातील उपाययोजनांसाठी नियोजन करणे, सदस्यांना प्रभाग संघाने केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देणे, आणि महत्वाचे म्हणजे वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे तरतुदी सुचवणे. वार्षिक सर्वसाधारण सभा हिरकणी महिला प्रभागसंघ अध्यक्ष सविता तरमळे, सचिव ज्योती सुरुशे, तालुका अभियान व्यवस्थापक श्रीपाल सोनटक्के, तालुका व्यवस्थापक सिंगतकर, प्रभाग समन्वयक (रायपूर प्रभाग) निलेश इंगळे, गिरीधर हिवाळे, दत्तात्रय तळेकर, रायपूर प्रभागातील सर्व समुदाय संसाधन व्यक्ति, लेखापाल विद्या पाटोळे, तसेच रायपूर प्रभागातील ग्रामसंघ पदाधिकारी तसेच सर्व साधारण सभेतील पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली.

## समर्थ कृषी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.राजा दि.७

डॉ.पं.दे.कृ.वि.अंतर्गत येणाऱ्या सस्थानिक समर्थ कृषी महाविद्यालयात भारतीय जैन संघटना व समर्थ कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव सतीश कायंदे यांनी केले.प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे, संमती जैन, पियुष खडकपूरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वसुंधरेच्या संरक्षणाचा ध्यास धरा,प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा. तसेच २०२५ मध्ये प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करणे या थीम बद्दल प्रा.सचिन सोळंकी




यांनी माहिती दिली.

पर्यावरण संरक्षण उपाय याविषयी सन्मती जैन यांनी मार्गदर्शन केले.यामध्ये प्लॅस्टिकने बनलेल्या पिशव्यांचा वापर करू नये, पाणी जपून वापरावे तसेच पाण्याचा दुरुपयोग टाळावा,अोला कचरा व कोरडा कचरा वेगळा ठेवावा, पाण्याचे प्रदूषण टाळावे असे सांगितले.

जलसंधारण करणे व वृक्ष लागवड पेक्षा वृक्ष संगोपन ही काळाची गरज आहे तसेच प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे, कीटकनाशकांचा पर्यावरणावर होणारा परिणाम याविषयी कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश कायंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

संचलन प्रा.सचिन सोळंकी यांनी केले. रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी अश्विनी जाधव, प्रा.स ातपुते,प्रा. सानप,प्रा.जायभाये, प्रा.चगदळे, प्रा.म्हस्के,प्रा.कवर,प्रा.वानखेडे, संजय लाड, गबाजी लाड तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.देवानंद नागरे यांनी केले.

## शा.औ.प्र.संस्था येथे शिवराज्याभिषेक दिन संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेगाव दि.७

संत गजानन महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था शेगांव येथे, मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास व उद्योजकता आणि नाविन्यता मंत्रालय महाराष्ट्र यांच्या संकल्पनेतून तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या नियोजनातून आदरणीय प्राचार्य एस. डी. गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली दैनंदिन प्राचार्य दिगंबर साहेब यांच्या नेतृत्वात संस्थेच्या वतीने शिवराज्यभिषेक सोहळा आयोजित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे या सुवर्ण सोहळ्याचे उद्घाटन करून मार्गदर्शन केले. त्याानंतर कौशल्य विकास



उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी विभागाच्या वतीने कौशल्य गीत सादर केले. शासकीय विभागाच्या निर्देशानुसार कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, नागरी कर्तव्य व शिष्टाचार , स्वदेशी विचार व संकल्पना सामाजिक समरसता. या पाच संकल्पनेवर आधारित पंच परिवर्तन व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिगंबर सर यांच्या वतीने गटनिदेशक बोदडे सर यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकारी निदेशक कुलकर्णी सर, गावसकर सर, मेटे सर ससाणे सर, हरणे सर, तायडे सर, मुळे सर, देशपांडे सर, देऊळकार मॅडम, निमकर्डे मॅडम, वडे मॅडम , गुंडले मॅडम, गावंडे मॅडम, नारखेडे मॅडम, बाठे मॅडम, पाटील मॅडम, हिवाळे मॅडम कार्यालयीन कर्मचारी नांदे , कवडे, राऊत , राठोड मॅडम सफाईगार नावकार, धामेरीया तथा मेस्को सुरक्षा रक्षक या सर्व कर्मचाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

## कृतिशील सरपंच महिलेचा सन्मान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
चिखली दि.७

जिल्हास्तरीय सरपंच ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित तेल्हारा गावाच्या कृतिशील सरपंच सौ. किरण गाडेकर यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे त्याांनी गावाच्या पुनर्वसनाच्या कठीण प्रसंगात अतिशय संयम व धीराचा परिचय देत आपल्या गावाला एक आदर्श गाव बनवण्यासाठी केलेल्या प्रयताची पावतीच असल्याचे गौरवउदगार आ. सौ. श्वेताताई महाले यांनी काढले.

वेगवेगळ्या क्षेत्रात असामान्य कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार बुलढाणा येथे पार पडला. यामध्ये संपूर्ण जिल्ह्यातून ''सरपंच ऑफ द इयर ''हा पुरस्कार चिखली तालुक्यातील तेल्हारा गावच्या सरपंच सौ किरण ताई संजय गाडेकर यांना प्राप्त झाला. जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्ती सोबतच राज्यस्तरीय पुरस्कारासाठी देखील त्याांचे नामांकन झाले आहे.

सौ किरण गाडेकर यांना जिल्हास्तरीय सरपंच



ऑफ द इयर हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आणि राज्यस्तरीय सरपंच ऑफ द इयर या पुरस्कारासाठी त्याांचे नामांकन झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्याांना शुभेच्छा देण्यासाठी चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आ. सौ. श्वेताताई महाले यांच्यामार्फत सौ. किरण गाडेकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी बोलताना कृतिशील सरपंच असलेल्या सक्षम महिलेचा हा सन्मान असल्याची भावना आमदार सौ. महाले यांनी व्यक्त केली. या सत्काराच्या प्रसंगी चिखली शहरातील पंकज कोठारी, योगेश सावजी, निलेश अंजनकर, नितीन चोपडा, विनोद नागवानी, शाम राऊत, अजय अग्रवाल, राहुल महाजन,आशिष अपराजीत आणि इतर जण उपस्थित होते.

## उपकेंद्रामध्ये महावितरणचा वर्धापन दिवस साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
किनगाव राजा दि.७

किनगांव राजा महावितरण उपकेंद्र कार्यालयामध्ये महावितरण वर्धापन दिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला आहे. महावितरण वर्धापन दिनानिमित्त 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन ता. १ ते ६ जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे.महावितरण उपकेंद्र कार्यालयामध्ये कार्यालयाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ठाणेदार विनोद नरवाडे यांची प्रमुख उपस्थिती होते.

यावेळी बोलताना ठाणेदार विनोद नरवाडे म्हणाले की,महावितरणचे अधिकारी कर्मचारी सामाजिक बांधीलकी जोपासून व ग्राहकांना दर्जेदार विजसेवा पुरविण्यांचे उद्दिष्ट साधुन ऊन,वारा,पाऊस यासह विपरीत परिस्थितीत वीज सेवा पुरवण्याचे व्रत पार पाडत प्रकाश पोहोचवण्यासाठी प्रयत करत असल्याचे यावेळी त्याांनी सांगितले.विविध मान्यवरांनी महावितरण




च्या वर्धापन दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले. विद्युत सुरक्षा प्रतिज्ञा घेण्यात आली आहे.

यावेळी उपकेंद्र महावितरणचे कनिष्ठ अभियंता रामेश्वर माघाडे, सामाजिक कार्यकर्ते अशोक काकडे,विष्णु गायके,पोलीस कर्मचारी पंढरीनाथ डोईफोडे,महावितरण कर्मचारी अमोल साळवे, सानप, वैभव जाधव, संतोष झोरे,अनंता गोरे प्रशांत देशमुख, गजानन मुंढे,संतोष पाटील, राहुल राठोड यांच्यासह आदीजण उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वधुवरांच्या हस्ते वृक्षारोपण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
जानेफळ दि.७

ग्रामीण भागातील दाखल्यांच्जानेफळ येथील पत्रकार मनीष मांडवगडे यांची कन्या ऐश्वर्या हिचा शुभ विवाह वर ऋषीकेश बाभुळकर यांच्यासोबत ५ जुन रोजी जागतिक पर्यावरण दिनी संपन्न झाला.

यावेळी वऱ्हाडी मंडळी आणि प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत वधुवरांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आले.यावेळी मेहकर शिवसेना माजी आमदार संजय रायमुलकर, मेहकर तालुका संघचालक डॉ धनराज राठी, शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश वाळुकर, नितिन राऊत शिवसेना विभाग प्रमुख अशोक बोरकर जेष्ठ पत्राकार सैय्यद महेबुब, अमर राऊत, गणेश सवडदकर, कृष्णा हावरे, हिम्मतराव आवले, मोहन पाटील धोटे, कु. माधुरी देवानंद पवार, वधूमाता पिता मनीष मांडवगडे, सौ किरण मांडवगडे, वरपिता संजय बाभुळकर सौ अरुणा बाभुळकर, दीपक बाभुळकर, उमेश सदावर्ते, संजय सुरजुसे, खामगाव येथील पत्रकार विजय कुळकर्णी,बुलढाणा येथील पत्रकार नितिन सिरसाट, रविंद्र गणेशे, मेहकर पत्रकार जुगराज पठ्ठे यांच्यासह वऱ्हाडी मंडळी उपस्थित होती.या पर्यावरण पुरक विवाह सोहळ्यास समाजातील सर्व स्तरातील मान्यवर उपस्थित होते.

## विद्युत वितरण कंपनीमध्ये कार्यरत स्थानिक कर्मचारी यांची इतरत्र बदली करावी : नागरिकांची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.७

येथील विदयूत वितरण कंपनीमध्ये कार्यरत असणारे डोणगाव येथील मुळ रहिवासी असणारे तीन विदयूत कर्मचारी यांची डोणगाव येथून त्वरित बदली करून त्याांना इतरत्रा देण्यात यावे अशी मागणी डोणगाव येथील जवळपास १०० नागरीकांनी उपकार्यकारी अभियंता मेहकर यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

त्यांनी आपल्या तक्रारीत , स्थानिक विद्युत कर्मचारी अख्तरखान गफ्फारखान व शेख सादीक शेख मदार हे दोघे डोणगांव येथील रहीवासी असुन ते डोणगांव येथील विद्युत कार्यालयात नियमीत कर्मचारी आहेत. तसेच नावेद शाह उस्मान शाह हा आऊटसोसींग म्हणुन काम करीत आहे. सदरील तीनही कर्मचारी स्थानिक रहीवासी असल्याने ते ग्राहकाशी अरेरावीची भाषा वापरतात, साधा वायर जरी जोडला तर अव्वाच्या सव्वा पैसे मागतात. तसेच बिल भरण्यास विलंब झाल्यास कुठल्याही प्रकारची पुर्वसुचना न देता लाईन कट करतात. व ग्राहकांना धमक्या देतात की, तुमच्याकडुन जे होईल ते करुन घ्या, सर्व अधिकारी आमच्या खिशात आहेत. त्यामुळे डोणगांव येथील विद्युत ग्राहक त्रस्त झालेले आहेत. तसेच वरील कर्मचारी हे एकाच समाजाचे असल्याने ते दुसऱ्या समाजाच्या ग्राहकांना जाणीवपुर्वक त्रास देतात. जसे की मीटर अर्ज केला असता मिटर येवुन कार्यालयात पडलेले असते, परंतु ते लावण्यासाठी ज्यादा रक्कम मागणे, साधा वायर जरी तुटलेला असल्यास त्यास विलंब करणे,

डोणगाव येथील अनेक कर्मचारी कागदोपत्री कामावर हजर आहे प्रत्यक्ष खाजगी कर्मचारी गावात विदयूत चे काम करताना दिसत आहेत यांची ही चौकशी होणे गरजेचे आहे.

अरेरावीची भाषा वापरणे, असे एक ना अनेक उदाहरणे देता येतील. या कर्मचाऱ्यांमुळे इतर समाजातील ग्राहक त्रस्त झालेले आहेत., वरील तीनही कर्मचाऱ्यांची डोणगांव महावितरण कार्यालयामधुन तात्काळ बदली करावी असे न झाल्यास आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असे नमुद असुन सदर निवेदनावर सज्जन आखाडे वैभव आखाडे गणेश ठाकुर प्रविण वानखेडे जावेद खान मोहमद इर्शोद मो. खालीक सुरेंद्र चव्हाण राजू वाघमारे महावीर मोरे अर्जुन भुजबळ सह जवळपास १०० नागरीकाच्या सह्या आहे.

## आ.खरात यांच्या इशाऱ्यानंतर पालखी मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरु

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मेहकर दि.७

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिलेल्या ठाम इशाऱ्यानंतर अखेर पालखी मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. रस्ते विकास महामंडळाने तात्काळ दखल घेत कामास सुरुवात केली असून, भेगा बुजवण्याचे व सुधारणा करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

शेगाव येथून दरवर्षी निघणारी संत गजानन महाराजांची पालखी पंढरपूरहून परतताना सिंदखेडराजा, किनगाव जट्टू, लोणार, सुलतानपूर, मेहकर, जानेफळ मार्गे जाते. मात्र या ६४ किलोमीटरच्या पालखी मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली



होती. रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे वारकरी व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. या मार्गाचे मूळ काम रस्ते विकास महामंडळाच्या अंतर्गत २०१७ साली श्रीहरी कन्स्ट्रक्शन या कंपनीला देण्यात आले होते. मात्र कंपनीने काम अर्धवट सोडले. नंतर दुसऱ्या ठेकेदाराकडे काम सोपवले गेले, पण त्यांनीही अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले. परिणामी रस्ता काहीच वर्षांत खराब झाला.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिनांक १५ मे रोजी मार्गाची पाहणी केली. रस्त्यावरील भेगा पाहून त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत रस्ते विकास महामंडळाला २ जूनपर्यंत काम सुरू न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला. या इशाऱ्याची तात्काळ दखल घेण्यात आली आणि रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. तरीही, ज्या कंत्राटदाराने हे काम निकृष्ट प्रकारे पूर्ण केले, त्याच्याविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे विशेष लक्षवेधी ठरत आहे. स्थानिक नागरिकांची मागणी आहे की, दोषी कंत्राटदारावर कठोर कारवाई होऊन भविष्यातील अशा हलगर्जीपणाला आळा घातला जावा.

## थोडक्यात

### पिंजर शहरात बकरी ईद उत्साहात साजरी



**पिंजर :** एकात्मता, सौहार्दता आणि त्यागाचे प्रतीक असलेला बकरी ईदचा सण पिंजर शहरात उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने मुस्लिम बांधवांनी साजरा केला. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, सकाळी शहरातील प्रमुख मशिदींसह सर्व मशिदींमध्ये ईदनिमित्त सामूहिक नमाज पठण करण्यात आली. हिंदू, मुस्लिम बांधवांनी परस्परांना बकरी ईद निमित्ताने एकमेकांना शुभेच्छा दिल्या. पिंजर शहरात मुस्लिम बांधवांचा ईद उल अजहा अर्थात बकरी ईद सण उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यासाठी मुस्लिम बांधवांनी तयारी केली होती. पिंजर येथील इदगाह मैदानावर ईदचे नमाज पठण करण्यात आले, तसेच सर्व धर्मीयांसाठी प्रार्थना करण्यात आली. आज मोठ्या उत्साहात ईद साजरी करण्यात आली. यावेळी हाफिज जमील, मुक्ती कासिम साहब, हाफिज कय्यूम, मोबीन भाई, सागर सौदागर, शेख मेहबूब मुंशीजी, सरपंच पांडुरंग ठक, रहमत खान, मन्नान कुरेशी, हाजी मोहम्मद साबिर, पं. स. सदस्य जावेद खान, रफिकोद्दीन सामना, अब्दुल शहीद मेंबर, मुजम्मिल खान, नसीमभाई, वसीम ठेकेदार, ग्यासुभाई सरपंच, प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

### कुरुममध्ये ईद-उल-अजहा उत्साहात साजरी



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील कुरुम गावात ईद-उल-अजहा (बकरी ईद) हा पवित्र सण मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात साजरा करण्यात आला. कुरुम येथील मुस्लिम बांधवांनी पारंपरिक पद्धतीने सकाळी ८.३० वाजता ईदगाहवर सामूहिक नमाज अदा केली. लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत संपूर्ण मुस्लिम समाज एकत्र येऊन नमाज पठाण करून ईश्वराचे आभार व्यक्त करण्यात आले. नमाजनंतर कुरुम येथील जामा मस्जिदचे इमाम मौलाना अंसारुल हक साहेब यांनी जमलेल्या उपस्थितांसमोर ईद-उल-अजहा या सणाचे महत्त्व स्पष्ट केले आणि कुर्बानी म्हणजे त्यागाचे प्रतीक असल्याचे सांगत, हजरत इब्राहीम (अ.स.) यांची कथा सांगितली आणि त्याग, विश्वास आणि आज्ञापालन याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी नमाज पठण केल्यानंतर संपूर्ण देशासाठी, समाजासाठी आणि प्रत्येक कुटुंबासाठी दुवा मागितली. ''देशात अमन-शांती राहो, सर्वांचे आरोग्य चांगले राहो, शेतकरी, व्यापारी आणि सामान्य जनतेला भरभराट लाभो, तसेच देश शत्रूंपासून सुरक्षित राहो'', विशेष अशी प्रार्थना करण्यात आली. नमाज आणि प्रार्थनानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ''ईद मुबारक''च्या शुभेच्छा दिल्या. गावात आनंदाचे आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले होते. लहान मुले नव्या कपड्यांमध्ये आनंदाने खेळताना दिसत होती, तर घराघरांत पारंपरिक खाद्यपदार्थांची रेलचेल होती. सणाच्या पार्श्वभूमीवर माना पोलीस स्टेशन व कुरुम पोलीस चौकी यांच्यातर्फे गावात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शांतता व सुव्यवस्थेसाठी विशेष गस्तीचे आयोजन करण्यात आले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासन सतर्क होते. या सणाचे औचित्य साधून गावात सर्वधर्मीय नागरिकांनी एकोप्याचा आणि शांततेचा संदेश दिला. ईद-उल-अजहा हा सण केवळ धार्मिक श्रद्धेचा नव्हे, तर सामाजिक सलोख्याचा आणि बांधीलकीचा संदेश देणारा असल्याचे कुरुम गावातील वातावरणाने पुन्हा एकदा अधोरेखित केले.

### मोहाळाच्या ईदगाह येथे बकरी ईदची नमाज अदा



**अकोट :** अकोट तालुक्यातील ग्राम मोहाळा येथे बकरी ईदचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मोहाळा येथील मुस्लिम समाजातील सदस्यांनी ईदगाहमध्ये नमाज अदा केली आणि एकमेकांना शुभेच्छा दिल्या. मोहाळा येथील ईदगाहमध्ये नमाज अदा केली आणि उपस्थित लोकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी ग्रामीण पोलीस ठाणेदार किशोर जुनघरे यांच्यासह या प्रसंगी सर्व धर्माचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि त्यांनी त्यांच्या मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# अवैध डिझेल वाहतूक करणाऱ्या व्हॅन व दुचाकीचा अपघात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर, दि. ७ :** अवैध डिझेल वाहतूक करणाऱ्या व्हॅन व दुचाकीचा अपघात झाल्याची घटना घडली असून, दुचाकीवरील दोन व्यक्ती जखमी झाले असल्याचे निदर्शनास आले; मात्र अवैधरित्या डिझेल वाहतूक करीत असलेल्या व्हॅनमधील प्रवासी जखमी आहेत किंवा त्यांचे काय झाले? हा प्रश्न नेमका उलगडलाच नाही!

६ जूनच्या रात्री सुमारे साडेदहा ते अकरा वाजताच्या दरम्यान पातूर शहरातील अकोला-वाशिम या मार्गावरील नवीन बायपास रोडवर स्थित असलेल्या पोल्ट्री फार्मसमोर वाशिमकडून अकोल्याकडे जात असलेली दुचाकी क्रमांक एम.एच २८ बी.एस ८१३३ व समोरून रॉन्ग साइडने येत असलेल्या मारुती व्हॅन क्रमांक एम.एच २८ व्ही २४३८ या दोन वाहनांमध्ये धडक होऊन मारुती व्हॅन पुलाच्या कठड्यावर धडकली.

यामध्ये दुचाकीस्वार दोघांना १०८ रुग्णवाहिकेच्या सहाय्याने अकोला येथे पाठविण्यात आले; मात्र व्हॅन पुलाच्या कठड्याला धडकून गाडीचा समोरील भाग चकनाचूर झाला असूनही त्याचा चालक, सहप्रवासी यांचे काय झाले ? व गाडीत असलेल्या डिझेलच्या कॅनदेखील गायब झाल्या असून, फक्त गाडीच्या भोवती रस्त्यावर सांडलेले डिझेल तेवढे बाकी होते. याबाबत पातूर पोलिसांना माहिती दिली असता, दोन तास उलटूनही घटनास्थळी पोलीस पोहोचले नसल्याने गाडीतील जखमी गायब कसे झाले व डिझेल कुठे मुरले? नेमके प्रकरण काय आहे, याचा उलगडा होणे आवश्यक आहे.

## उभ्या असलेल्या ट्रक ट्रॉलीला आग लागल्याप्रकरणी पातूर पोलिसात तक्रार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातूर, दि. ७ :** पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गोंधळवाडी परिसरामध्ये असलेल्या स्टोन क्रेशर परिसरामध्ये उभ्या असलेल्या ट्रक आणि ट्रॉली यांना अचानक आग लागल्यामुळे सदर प्रकरणी पातूर पोलिसात तक्रार करण्यात आली आहे.

यातील फिर्यादी सय्यद अझहर सय्यद मोहसिन यांच्या मालकी हक्काचा अशोक लेलँड १६ १८ जी व्ही डब्ल्यू टिप्पर ट्रक क्रमांक एम एच ३० २१ ८८ तसेच नवीन ट्रॉली हे दोन्ही वाहने गोंधळवाडी स्टोन क्रेशरच्या परिसरात सुरक्षित उभी होती. गोंधळवाडी हे फिर्यादीच्या घरापासून १५ कि. मी. अंतरावर आहे तर ७/६/२०२५ ला सकाळी ईद-उल-अजहाची नमाज अदा केल्यानंतर सकाळी ८.५० वाजता धर्मा लक्ष्मण देवकर यांचा फिर्यादीला फोन आला आणि देवकर हे फिर्यादीच्या शेजारीच शेती करतात. अचानक टायर फुटण्याचा आवाज आला आणि त्यानंतर आग लागली आणि वाहने जळालेली दिसली. घटनास्थळी धाव घेतली तेथे ट्रक आणि ट्रॉली जळत असल्याचे दिसून आले. आग पातूर नगर परिषदच्या अग्निशमन दलाचे अश्फाक, वानखडे आदींच्या मदतीने आटोक्यात आणली. सदर आग नेमकी कशामुळे लागली, याची चौकशी होणे गरजेचे असून, याप्रकरणी सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी फिर्यादी सय्यद अझहर सय्यद मोहसिन यांनी दिलेल्या तक्रारीत केली आहे. पुढील तपास पातूर पोलीस करीत आहेत.

## मुख्यमंत्री दौऱ्यासंदर्भात अकोट तालुका भाजपची नियोजन बैठक संपन्न



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ७ :** राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस ११ जून रोजी अकोल्यात येत आहेत. त्यानिमित्त अकोला क्रिकेट क्लब मैदानावर जाहीर सभा पार पडणार आहे. त्यासंदर्भात नियोजन करण्याकरिता आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली.

या बैठकीला भाजपा शहर अध्यक्ष हरीश टावरी, माजी अध्यक्ष राजेश रावणकरसह तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, आघाडी-मोर्चा पदाधिकारी, प्रकोष्ठ व सेल संयोजक, शक्ती केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख उपस्थित होते. या बैठकीला मार्गदर्शक म्हणून आमदार प्रकाश पाटील भारसाकळे, प्रभाकरराव मानकर यांनी मार्गदर्शन केले, तर प्रास्ताविक उमेश पवार यांनी केले. संचालन गजानन अकोटकर तर आभार भाजपा तालुका अध्यक्ष गोपाल मोहोड यांनी मानले.

## शेतरस्त्याचे काम अडवून गुन्हा दाखल करण्याची धमकी!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बाळापूर, दि. ७ :** तालुक्यातील वाडेगाव शेतशिवारातील शेतरस्त्याचे काम अडवून अ‍ॅट्रॉसिटी व तत्सम गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिली असल्याबाबतीत तहसीलदार यांना शेतकऱ्यांनी निवेदन सादर केले आहे.

वाडेगाव शेतशिवार भाग नंबर तीन, शेंबा शिवारात शेतकऱ्यांना शेतीची मशागत तसेच शेतीच्या इतर कामे करताना सुखकर होईल, या उद्देशाने शासनाकडून मात्रोश्री पांधन शेतरस्ते अंतर्गत शेतरस्त्याची नवीन निर्मिती करण्यात येते; परंतु वाडेगाव शेतशिवारातील भाग तीनमध्ये हरिचंद्र नामदेव मसने यांचे शेतापासून रामचंद्र जागोजी धनोकार यांचे शेतापर्यंत अंदाजे किलोमीटर शेतरस्त्याचे काम सुरू आहे.

नकाशी येथील जगदेव तायडे यांच्या शेतापर्यंत काम पूर्ण झाले असता, जगदेव तायडे यांचे नातू रोहन दीपक तायडे रोजगार सेवक नकाशी याने शेतरस्त्याचे काम थांबविले. सदर शेतीचा सातबारा जगदेव तायडे नकाशी यांच्या नावे आहे. त्यांनी काम करण्यास होकार दिला; परंतु त्यांचा नातू कामामध्ये अडथळा निर्माण करीत आहे. तो नकाशी येथील रोजगार सेवक असून, तो म्हणतो माझ्या आजोबाला काही कळत नाही, हा रस्ता होऊ देणार नाही, जर रस्ता करण्याचा प्रयत्न केल्यास अ‍ॅट्रॉसिटी व तत्सम गुन्ह्यात आपल्या सर्वांना अडकविले जाईल, अशी धमकी देत आहे, त्यामुळे संबंधित ठेकेदारांनी काम थांबविले आहे, तर खरीप हंगामातील पेरणीचा कालावधी येवून ठेपला आहे. जर उर्वरित शेतरस्त्याचे काम पूर्ण झाले नाही तर संबंधित शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, त्यामुळे रस्त्याचे काम अडविलेल्या रोहन दीपक तायडे रोजगार सेवक नकाशी यांचा बंदोबस्त करण्याची मागणी तहसीलदार वैभव फरतारे यांना शेतकऱ्यांनी सादर करण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देताना अरुण पळसकार, दीपक मसने, दत्ता मानकर, चेतन कारंजकर, खेडकर यादी शेतकऱ्यांनी निवेदन दिले.

## ग्रामीण भागातील महिला, मुलींसाठी व्यवसाय प्रशिक्षण नि:शुल्क

### आरोळी सामाजिक संस्थेचा स्तुत्य उपक्रम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वणी रंभापूर, दि. ७ :** 'एक तरी अंगी असू दे कला, नाही तरी काय फुका जन्मला', या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भजनातील ही ओवी मानवाला जीवन जगण्यासाठी प्रेरित करते. याचा धागा धरत आरोळी सामाजिक संस्था वणी रंभापूर यांच्यावतीने ग्रामीण भागातील एकल महिलांसाठी, मागासवर्गीय व कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींसाठी व्यवसाय प्रशिक्षण नि:शुल्क देण्यात येत आहे. यात फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण, ब्युटी पार्लर, हॅण्डलूम असे बेशिक व्यवसाय प्रशिक्षण तीस दिवसाचे आहे. तेव्हा आरोळी सामाजिक संस्थेच्या ग्रामीण उपजीविका सेंटर वणी येथे हा उपक्रम राबविण्यात येत असून, यासाठी महिला, मुलींचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. ग्रामीण भागात सहजपणे महिला व मुलींसाठी रोजगार निर्मिती होऊ शकेल, या आशेने सदरचा उपक्रम आयोजित करण्यात आला असून, अकोला येथील सामाजिक दायित्व जोपासणारे दानशूर दिलीप पवार यांच्या आर्थिक सहकार्याने आरोळी सामाजिक संस्था ही व्यवसाय प्रशिक्षण देत आहे.

## पुलावरील खड्डा देत आहे अपघातास आमंत्रण



**तेल्हारा : शहरातील वर्दळीचा रस्ता असल्यामुळे येथून रोज शालेय विद्यार्थी तसेच नागरिक रोज येथून कामानिमित्त येणे-जाणे करतात. या पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे एखादी मोठी दुर्घटना घडू शकण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत.**

## नंदीबैलाची पारंपरिक लोककला पावतेय लोप!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**हिरपूर, दि. ७ :** नंदीबैल ही महाराष्ट्रातील एक पारंपरिक लोककला आहे. जी सध्या लोप पावत चालली आहे. ही परंपरा मुख्यतः ग्रामीण भागात विशेषतः आढळते. या परंपरेत, नंदीबैलाला रंगीबेरंगी कापडांनी सजवले जाते, त्याच्या गळ्यात घुंगरमाळा असते आणि त्याच्या मालकाच्या गळ्यात ढोलक वाजवून सनईच्या सुरात नंदीबैलाचा खेळ सादर केला जातो. या कलाकारांना महिलांकडून हळदी-कुंकू लावून पूजा केली जाते आणि सुपात धान्य व ओवाळणी दिली जाते. नंदीबैलाच्या खेळात, तो शिंग हलवून हो किंवा नाही, असे उत्तर देतो, ज्यामुळे लोकांचे मनोरंजन होते.

सध्या ही परंपरा लोप पावत चालली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक अडचणी, शिक्षणाचा अभाव आणि नव्या पिढीचा या परंपरेत रस न उरलेला. या कलाकारांना त्यांच्या कलेतून पुरेसा उदरनिर्वाह होत नाही, त्यामुळे ते इतर व्यवसायांकडे वळत आहेत. या परंपरेचे जतन करण्यासाठी, समाजाने या कलाकारांना आर्थिक मदत, प्रशिक्षण आणि त्यांच्या कलेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि सांस्कृतिक संस्था यांनी या परंपरेचा प्रचार-प्रसार करून, नव्या पिढीत तिच्याविषयी जागरूकता निर्माण करावी. नंदीबैलाची परंपरा ही आपल्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याचे जतन करणे आपले कर्तव्य आहे.

> आमच्या आतापर्यंतच्या पिढीने हा व्यवसाय केलेला असून नवीन पिढीला या व्यवसायात कोणताही रस नाही.
>
> **धुळे,** नंदीबैल मालक.

# छत्रपती शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**तेल्हारा, दि. ७ :** कौशल्य रोजगार व उद्योजक, नाविन्यता विभागाचे मंत्री अ‍ॅड. मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन विष्णूदास महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तेल्हारा येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्ताने संस्थेच्या परिसरात पंचपरिवर्तन व आधारित वैचारिक शिवदिंडीसुद्धा काढण्यात आली. या दिंडीमध्ये विविध झाँकीया, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मावळ्यांसह देखावा, मासाहेब जिजाऊ, वारकरी, टाळकरी, लेझीम पथक, शिव पालखी, ढोल, मृदंग, टाळ अश्या स्वरूपाची पालखी यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या सोहळ्यात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्ही. एम. डांगरा, प्राचार्य उईके, बी. एस. मंत्री, सुधीर देशमुख, विठ्ठल चव्हाण, शेगोकार, माधुरी चितोडे, उत्तम नळकांडे, प्रा.सचिन थाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पंच परिवर्तन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात सामाजिक समरसता, स्वदेशी विचार , नागरि कर्तव्ये व शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण यांचा समावेश होता. या कार्यक्रमाच्या व्याख्यानमालेचे प्रमुख वक्ते उत्तम नळकांडे व प्रा.सचिन थाटे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. संस्थेच्या प्रशिक्षणार्थी यांनी स्वागत गीत सादर केले व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संस्थेच्या माजी प्रशिक्षणार्थी शासकीय सेवेत रुजू झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य उईके यांनी केले. पर्यावरण संरक्षण या विषयावर नळकांडे यांनी मार्गदर्शन केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन चरित्र या विषयावर बोलताना प्रा.सचिन थाटे यांनी कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य , स्वदेशी विचार व छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक क्षण अश्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. सोबत या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवकालीन साहित्य प्रदर्शनाचेसुद्धा आयोजन करण्यात आले. यांमध्ये शिवकालीन शस्त्र, साहित्य, नाणे यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. सुधीर देशमुख यांनी ऐतिहासिक साहित्याची माहिती उपस्थिताना दिली. यामध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. शिवगर्जना करण्यात आली. शिवरायांवर आधारित प्रशिक्षणार्थी यांनी नृत्य सादर केले. यामध्ये वीजतंत्री, तारतंत्री ट्रेडच्या प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेऊन उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. प्रशिक्षणार्थीनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला, यावेळी संस्थेतील राऊत सर यांच्यासह प्रशिक्षणार्थी यांनी शिवगीत सादर केले. यावेळी संस्थेत आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अश्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरणसुद्धा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. शिवराज्याभिषेक सोहळा निमित्ताने सामाजिक एकोपा वाढावा, या उद्देशाने शिवस्नेह भोजनाचेसुद्धा आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने आजी -माजी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात वेशभूषा करणारे महाराज यांची निखिल सूर्यवंशी, राजमाता जिजाऊ यांची पूजा मंजुळकर, मावळा म्हणून बजरंग गिऱ्हे, प्रशिक दामोदर, विणकरी राधेश्याम सावरकर, मृदंग वादक हर्षद जाधव यांनी भूमिका निभावली. या कार्यक्रमात ऋतुजा व सुरक्षा रक्षक डेंडूळे, जाधव,माकोडे, अबाडकर, पिवाल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशांती दामले, वृशाली वानखडे यांनी तर आभार वसतकार यांनी मानले.

# अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

रविवार, दि. ८ जून २०२५


## थोडक्यात

### शेतीच्या वादातून सुनेला मारहाण

**नांदगाव खंडेश्वर :** शेती वहाण्याच्या कारणावरून सासऱ्यासह एका नातेवाईकाने विवाहितेला मारहाण करीत शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. याबाबत विविहितेने नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी जयराज गंजीपतराव पवार (५५) व जितेश पवार (३५) यांच्यावर ११८(१), ११५(२),३५१ (२), ३५२, ३२४ (२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला. ही घटना ओंकारखेडा येथील पारडी बेड्यावर घडली.

### जनुना येथे क्षुल्लक वादातून युवकाला मारहाण

**लोणी :** जनुना येथे क्षुल्लक वादातून गावातीलच युवकाने दुसऱ्याला मारहाण करीत जखमी केले. अर्जुन भाऊराव केवदे (३०) असे जखमीचे नाव आहे. त्याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी मारहाण करणाऱ्या युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दुचाकीस्वाराने लांबवली महिलेची सोनसाखळी

**मोर्शी :** लग्नावरून घरी परत येत असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या युवकाने लंपास केली. २५ ग्रॅम वजनाच्या सोनसाखळीची अंदाजे किंमत १ लाख २५ हजार रुपये होती. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ३०९ (४) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### मुलाला मारला दगड; दाम्पत्याला शिवीगाळ

**आसेगाव :** बाहेर खेळत असलेल्या मुलाला दगड मारला, तर त्याच्या आईवडिलांना शिविगाळ करीत मारण्याची धमकी दिली. ही घटना कृष्णापूर येथे घडली. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून 19 वर्षीय युवकाविरुद्ध १२५, ३५२, ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल केला.

### भरधाव वाहनाच्या धडकेत एक जखमी

**चांदूर रेल्वे :** भरधाव वाहनाच्या धडकेत किशोर नारायण केणे (51, रा. चांदुरवाडी) हे जखमी झाले. ही घटना कुन्हा मार्गावर घडली. जखमीने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी भारधाव वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शिवीगाळ करण्यास हटकल्याने मारला दगड

**धारणी :** घरासमोर येवून शिवीगाळ करणाऱ्या युवकाला महिलेने हटकले. त्यामुळे त्योन तिच्या अंगावर दगड भिरकावला. त्यात तिला दुखापत झाली. ही घटना सिनबंद, ता. चिखलदरा येथे घडली. या प्रकरणी दिलेल्या परस्परविरोधी तक्रारीवरून धारणी पोलिसांनी हिरोनलाल गुजरातीलाल चव्हाण (30) व अन्य एक अशा दोघांविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल केला.

### आठवडी बाजारातून मोबाईलसह रोकड लंपास

**चांदूर रेल्वे :** येथील आठवडी बाजारामध्ये आलेल्या नागरिकाच्या पिशवीतून अज्ञाताने रोख 4 हजारांसह 500 रुपयांचा मोबाईल, असा एकूण साडे चार हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध 303 (2) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### येसुर्णा येथे चोरून नेला वखर

**आसेगाव :** पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या येसुर्णा येथे अज्ञाताने बैलाचा वखर चोरून नेला. याबाबत अलपेक्ष सुधाकर गायकवाड (52) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# 'स्कॉफ' साठी शाळांना ३० जूनची डेडलाईन!

## सायंकाळी पाच वाजता लिंक बंद होणार ● जुलैमध्ये बाह्य मूल्यमापनाची प्रक्रिया

अजिंक्य भारत |सुधीर केने

**अमरावती, दि. ७ :** शालेय गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची माहिती भरण्यासाठी शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना ३० जून ची डेडलाईन दिली आहे. यापुढे मुदतवाढ दिले जाणार नाही असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

शालेय शिक्षण धोरणानुसार राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व शाळांचे मूल्यांकन केले जाणार आहे .त्यासाठी शालेय गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार करण्यात आला आहे. सर्वांचेच प्रशिक्षण घेण्यात आले आहे .प्रशिक्षणाअंती ही माहिती कशी भरावी याचीही माहिती देण्यात आली आहे ,तरीही अद्याप बहुतांशी शाळांनी ही माहिती भरलेली नाही.

शालेय गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्यासाठी काही मानके दिलेली आहे. शाळांचा स्तर वाढावा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी ही माहिती अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शाळांमध्ये राबविले जाणारे उपक्रम विद्यार्थ्यांच्या हितासाठी व त्यांच्या



गुणवत्ता विकासासाठी शाळांनी काय काय केले त्याची माहिती यामध्ये भरणे अनिवार्य आहे. यासाठीची लिंक ओपन करून देण्यात आली होती, परंतु दिलेल्या निर्धारित वेळेत शाळांनी माहिती न भरल्याने पुन्हा लिंक ओपन करून देण्यात आली आहे. आता ३० जून पर्यंत शाळांना माहिती भरावयाची आहे.

बऱ्याच शाळांनी माहिती भरली असली तरी अद्यापही शेकडो शाळांनी नोंदणीही केलेली नाही. तसेच अनेक शाळांची माहिती अपूर्ण आहे. आता ३० जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे ज्या शाळाची ही माहिती अपूर्ण आहे त्यांनी तात्काळ माहित भरणे आवश्यक आहे. ३० जून रोजी सायंकाळी पाच वाजता लिंक बंद करण्यात येणार असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

त्यामुळे विहित कालावधी सर्व शाळांनी आपली माहिती भरणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व शिक्षण अधिकारी, गटशिक्षण अधिकारी तसेच संबंधित सर्व अधिकारी यांना निर्देशित करण्यात आले आहे. आपापल्या अखत्यारीतील सर्व शाळांची माहिती भरून घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. 30 जून नंतर कोणतीही मुदत वाढ देण्यात येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.

३० जून नंतर बाह्य मूल्यमापन व त्रयस्त मूल्यमापन याची प्रक्रिया सुरू होणार आहे .त्यामुळे तत्पूर्वी प्रत्येक शाळेची माहिती परिपूर्ण असणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व अल्पसंख्यांक दिव्यांग तसेच इतर शाळांना निर्देश देण्यात आले आहे

# ऑटो-क्रूझरमध्ये निंभारी फाट्यावर अपघात

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. ७ :** अंजनगाव-दर्यापूर महामार्गावरील निंभारी फाट्या समोर शुक्रवारी (दि. ६) दुपारी सुमारे १२ वाजता भीषण अपघात झाला. लग्न वऱ्हाड घेऊन जाणारी क्रुझर आणि प्रवासी ऑटोमध्ये झालेल्या या धडकेत १४ जण गंभीर व १२ जण किरकोळ जखमी झाले.

क्रुझर (क्र. एमएच २२ वाययू ३१५४) ही दर्यापूरहून अंजनगावकडे लग्न कार्यासाठी येत असताना, समोरून येणाऱ्या प्रवासी ऑटो (क्र. एमएच २७ एएफ ३०७६) ला वाचवण्याच्या प्रयत्नात दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. धडकेनंतर क्रुझर रस्त्याच्या कडेला जाऊन तीन पलटी घेत उलटली. त्यामुळे क्रुझरमधील १२ जण तर ऑटोतील चालक व प्रवासी असे एकूण १४ जण जखमी झाले. जखमींमध्ये नयना शिरसाट, आकांक्षा शिरसाट, गौतम सदांशिव (राजुरा), संतोष वानखडे (वरखेड), दादाराव वानखडे (कावसा), रंजना शिरसाट, श्रुती भोजने, पद्मा वानखडे, समीक्षा इंगळे, रिया राक्षसकर, अशोक शिरसाट, कैलास खडे (सर्व रा. दर्यापूर) यांचा समावेश आहे. तर ऑटोमधील प्रकाश परातमोल (एकलारा) व संजय वानखडे (निंभारी) हे गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने अंजनगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर स्वरूपाच्या जखमांमुळे काहींना अचलपूर व अमरावती येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच रहीमापूर पोलिस स्टेशनचे कर्मचारी, ग्रामस्थ व रुग्णसेवकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. पुढील तपास एएसआय गजानन वर्मा, पो.कॉ. संजय गायकवाड व भारती भुस्कट करीत आहेत.

# प्रियकराची हत्या,पत्नी गंभीर जखमी

## लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साखरा येथील घटना

अजिंक्य भारत प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** अनैतिक संबंधाच्या कारणावरून पतीने पत्नीवर व तिथ्या कथित प्रियकरावर धारदार शस्यांनी वार केल्याची थरकाप उडवणारी घटना लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साखरा गावात 6 जून रोजी दुपारी 5 ते 5.30 वाजताच्या सुमारास घडली. या रक्तरंजित हल्ल्यात प्रियकराचा मृत्यू झाला असून पत्नीधी प्रकृती चिंताजनक आहे. याप्रकरुगात लोणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. मृतकाचे नाव दिनेश मुंडाले (35, रा. नाकेगाव, पो.स्टे. चवटा बाजार) असे असून, गंभीर जखमी कोमल संतोष घाटे (26, रा. बत्तीगाजी, जि. बुलढाणा, सध्या मुकाम नाकेगाव) हिच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विशेष बाब मृतक दिनेश मंडाले म्हणजे, कोमल गर्भवती आहे, तसेच तिच्या सात वर्षाच्या मुलीचाही उल्लेख समोर आला आहे. जखमी कोमल घाटे प्राथमिक तपासानुसार, कोमलचे पती संतोष घाटे यांना पत्नीचे दिनेश मुंडालेशी संबंध



असल्याची माहिती मिळाल्यावर, तो अनेक दिवस संतप्त राहत होती, याच दस्यान तिचा आणि दिनेशचा प्रेमसंबंध वाढीस लागला. काही महिन्यांपूर्वी कोमलने दिनेशसोबतच राहायला सुरुवात केली. दिनेशचा साखरा गावात नातीच्या घरी मुक्कम सुरू असताना, संतोष घाटे याने. त्या ठिकाणाचा शोध घेत थेट त्यांच्या राहत्या जागी धडक दिली. एका बगेत लपवलेले धारदार शस्त्र कातून त्याने दिनेशवर बार केले. कोमलने त्यात मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला असता पती तिच्यावरही प्राणघातक हल्ला करण्यात आला.

### आरोपीला तत्काळ अटक

मानेष घाटे फरार झाला होता, मात्र लोगी पोलिसांनी त्याचा ताबा शोध घेत अटक केली असून त्याच्यावर हत्या व हत्या करयाचा प्रदान अता गभीर कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मात्र, यास अधिकृत दुधात आलेला नाही. मृतक दिनेश मुंडाले याचे ला इरालेले नव्हते. तो अविवाहित होता, व कोमलशी संबंधामुळेच गावात त्याच्याविषयी चचांचे वातावरण होते. कोमलच्या प्रकृतीवर उपचार सुरू असून तिचा जबाब महत्वाचा ठरणार आहे. दरम्यान, या हल्ल्याने संपूर्ण भागात एकाच खजब उडाली आहे.

### प्रेमसंबंधांची पार्श्वभूमी

त्यावेळी डॉक्टरांनी केलेल्या तपासणीदरम्यान दिनेशला मृत कोमल व दिनेश हे असून गेल्या सहा महिन्यांपासून दीचे एकत्र राहत होते. कोमलचे ला आठ वर्षापूर्वी संतोष घाटे याच्याशी झाले होते. तिला सातवीची मुली आहे वैवाहिक मतभेदांमुळे ती आई-वडिलांकडे राहत होती. दरम्यान, दिनेशसोबत तिचे प्रेमसंबंध निर्माण झाले होते. साखरा गावात दिनेशच्या नातीच्या घरी कोमल आणि दिनेश काही दिवसांपासून मुक्कामाला होते. घोषित करण्यात आले. तर कोमल आयसीयुमध्ये उपवार घेत असून, तिची प्रकृती अत्यवस्थ आहे.

### हलगर्जीपणाचा कळस, मृतदेह दोन तास ओपीडीमध्ये

दिनेशचा मृतदेह रात्री 8 ते 10.30 वाजेपर्यंत ओपीडीमधी ठेवण्यात आग होता, कारण लोणी पोलीस स्टेशनकडून कोणताही प्रतिनिधी सर्व नौदाण्यासाठी घटनास्थळी उपस्थित नव्हता. तर जखमी कोमलसुद्धा आयसीयूमध्ये एकटीच असल्याचे समजते. तिच्याजवळ ना महिला पोलीस कर्मचारी, ना नातेवाईक होते. त्यामुळे पुन्हा एकदा जिल्हा सामान्य रुन्चालय प्रशासनाच्या या हलगर्जीपणाकडे लक्ष वेधले आहे. मात्र प्रवृती गंभीर असल्याने रात्री 8 वाजताच्या सुमारास जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.

# पत्रकारावरील हल्ला, जीवे मारण्याच्या धमकीचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने केला जाहीर निषेध

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात न्यूज 18 लोकमतचे प्रतिनिधी सचिन तोडकर यांच्या वाहनावर अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला आहे. हा हल्ला बांधकाम कामगार नोंदणीतील भ्रष्टाचाराची बातमी समोर आणल्यामुळे करण्यात आला आहे.दैनिक जनप्रवासचे संपादक सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेल्या धमकीचाही निषेध महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुबई विदर्भ प्रदेशाध्यक्ष नयन मोंढे यांच्या नेतृत्वात बुधवार (ता. चार) रोजी शासकीय विश्राम गृह येथे संघटनेची बैठक घेऊन जाहीर निषेध करण्यात आला.

पत्रकार सचिन तोडकर यांनी जुन्नर तालुक्यातील



बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणी प्रक्रियेमध्ये सुरू असलेल्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करणारी विशेष बातमी न्यूज 18 लोकमत वर दाखवली होती. या बातमीत खाजगी एजंटांकडून कामगारांची आर्थिक लूट, मोफत मिळणाऱ्या वस्तूंसाठी पैसे वसूल करणे आणि शिष्यवृत्तीतील भ्रष्टाचाराचे गंभीर प्रकार उघड झाले होते.

या बातमीनंतर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आणि प्रतिनिधीच्या वाहनावर दगडफेक करण्यात आली. वाहनाच्या काचेला नुकसान झाले असून, ही घटना पत्रकारांवरील खुले हल्ल्याचा गंभीर प्रकार मानली जात आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने संबंधित हल्लेखोर आणि धमकी देणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार, शहराध्यक्ष विक्रम ढोके, ज्येष्ठ पत्रकार पी.एन. देशमुख , सागर डोंगरे, सागर तायडे, उज्वल भालेकर, स्वप्निल सवाळे, विनोद इंगळे, संजय जीरापुरे, मनिष गुलधे, नकुल नाईक, उपस्थित होते.

### 10 जमादार झाले एपीआय

**अमरावती :** अमरावती शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत कार्यरत जमादारांना त्यांच्या सेवेला अनुसरून व पात्रतेनुसार पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे. 5 जून रोजी पोलीस आयुक्तालयाच्या आदेशानुसार 10 जमादारांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. यामध्ये योगेश श्रीवास, प्रेमचंद रावत, ज्ञानेश्वर आवारे, दीपक राजस, किशोर गोल, रमेश निंभोरकर, जावेद अहमद, अशोक वाटाणे, रविद्र हरणे व महेंद्र गावडे यांचा समावेश आहे. या सर्व अधिकाऱ्यांना अमरावती पोलीस आयुक्तालयातच सेवा देण्यास आदेश देण्यात आले आहेत.

# आकांक्षा बोबडे मृत्यू प्रकरणात हत्या उघड; आत्महत्त्येचा पेच उलगडला

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** गाडगे नगरमधील एका विद्यार्थिनीच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण परिसरात खळबळ उडवली होती. सुरुवातीला आत्महत्या समजली गेलेली ही घटना आता हत्या असल्याचे उघड झाले आहे. गाडगेनगर पोलिसांनी याप्रकरणी एका युवकाला अटक केली आहे. मृत युवतीचे नाव आकांक्षा प्रवीण बोबडे (वय २०) असून ती मूळची नेरपिंगळाई येथील रहिवासी होती.

शिक्षणासाठी अमरावतीत आलेली आकांक्षा गाडगे नगरमधील अभिषेक देशमुख यांच्या भाड्याच्या घरात राहात होती. ४ जून रोजी सायंकाळच्या सुमारास ती आपल्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. ही माहिती घरमालकाने गाडगेनगर पोलिसांना दिल्यानंतर, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला होता. सुरुवातीला पोलिसांनी या प्रकरणात मर्ग दाखल

करून नैसर्गिक मृत्यू समजून तपास सुरू केला. मात्र, शवविच्छेदन अहवालात आकांक्षाच्या डोक्याला गंभीर माराचे निशाण असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे संशय अधिक बळावला. त्यामुळे पोलिसांनी अधिक तपास करून, प्रतीक शरदराव हिवसे (२४) या युवकास ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याचे जबाब संशयास्पद आढळले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला.

**हत्येचे कारण गुलदस्त्यात ?**

**प्रतीक हिवसे व आकांक्षा यांच्यात**

मागील काही महिन्यांपासून ओळख होती. त्यांच्यात मतभेद सुरू असल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. या पार्श्वभूमीवरच हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. परंतू नेमक्या कोणत्या कारणावरून ही हत्या करण्यात आली, ही बाब अद्याप पुढे आली नाही. त्या दिशेने पोलिस आरोपीची चौकशी करीत आहेत.

# वीज ही विकासाची शक्ती-सीईओ महापात्र

## महावितरणचा 20 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.७** - वीज ही सेवा नसून विकासाचा पाया आहे. तिच्याशिवाय शेती, उद्योग, शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन जीवन अपूर्ण आहे, असे स्पष्ट मत जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह, अमरावती येथे महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या




वेळी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे, मुख्य अभियंता अशोक साळुंके, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, प्रविण दरोली, विद्युत निरीक्षक प्रदीप चामट, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, कार्यकारी अभियंता प्रदीप पुनसे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रांगोळी स्पर्धा आणि सामूहिक सुरक्षा शपथ याने कार्यक्रमाची सुरूवात झाली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संदेश व्हिडीओ क्लिपद्वारे दाखवण्यात आला. पथनाट्य, विशेष प्राविण्यप्राप्त कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. चिदानंद फाळके यांचे 'हसत खेळत तणावमुक्त जीवन' या व्याख्यानाद्वारे कर्मचाऱ्यांना नवचैतन्य देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुसूदन मराठे यांनी केले, सूत्रसंचालन आद्यश्री कांबे व विकास बांबल यांनी पाहिले, तर आभार प्रदर्शन प्रदीप अंधारे यांनी केले. या कार्यक्रमाला महावितरणचे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### महावितरणची 20 वर्षांची वाटचाल उल्लेखनीय - कलंत्रे

महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी महावितरणच्या वाटचालीचे कौतुक करताना सांगितले की, वीज कायदा 2003 नुसार ग्राहककेंद्री कार्यपद्धती स्वीकारून कंपनीने व्यवस्थापनात केलेले बदल उल्लेखनीय आहेत. त्यांनी कर्मचारी सुरक्षेचे महत्व अधोरेखित करत शुभेच्छा दिल्या.

### शिस्त, पारदर्शकता, आणि 'झिरो' मिशन - साळुंके

महावितरणचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी कर्मचार्यांना 'शिस्त, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता' या मूल्यांवर ठाम राहून कार्य करण्याचे आवाहन केले. त्यांनी झिरो इंटरप्शन, झिरो तक्रारी, झिरो अपघात, झिरो वितरण हानी, झिरो प्रलंबित कामे व झिरो थकबाकी या सहा कलमी उपक्रमांची अमंलबजावणी करण्याचे निर्देश दिले.




अजिंक्य भारत

आपलं अमरावती

रविवार, दि. ८ जून २०२५



## थोडक्यात

### दोन अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई

**अमरावती :** अवैधरित्या दारूची विक्री करणाऱ्या दोघांवर नांदगाव पेठ पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्या ताब्यातून एकूण दीड हजारांची दारू जप्त केली. सुरज राजेंद्र गजभिये (२५) व रवि भीमराव घोरे (४७) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

### राजापेठ परिसरातून दुचाकीची चोरी

**अमरावती :** राजपेठ परिसरातील राणा कॉम्प्लेक्स येथून अज्ञात चोरट्याने दुचाकी (एमएच २७-एएम १९९६) चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ३० हजार रुपये आहे. याबाबत संदीप लक्ष्मणराव देशमुख (५०, रा. विमल नगर, फरशी स्टॉप) यांनी राजापेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ३०३ (२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### अज्ञाताने चोरून नेले एसीचे साहित्य

**अमरावती :** अज्ञात चोरट्याने जयस्तंभा चौकात असलेल्या रसिक बिल्डींगमध्ये असलेल्या कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या बंद असलेल्या सहा एसीचे तांब्याचे पाईप चोरून नेले, त्यांची अंदाजे किंमत 85 हजार रुपये आहे. याबाबत विजय भिकाजी जोहरे (४३, रा. रुख्मिणी नगर) यांनी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंद केला.

### हातात शस्त्र घेवून फिरणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अमरावती :** हातात कोयत्यासारखे शस्त्र घेवून फिरणाऱ्या युवकावर कारवाई करीत नागपुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्याच्या ताब्यातून शस्त्रासह एकूण १ हजारांचे साहित्य जप्त केले, तर अहेमद खान हसन खान (४४) याच्यावर गुन्हा दाखल केला. ही घटना बिसमिल्ला नगर येथे घडली. सदर घटनेचा पुढील तपास नागपुरी गेट पोलीस करीत आहे.

### तंबाखुजन्य पदार्थांची विक्री करताना एकावर कारवाई

**अमरावती :** तंबाखुजन्य पदार्थांची विक्री करताना भातकुली पोलिसांनी एकावर कारवाई के करीत गुन्हा दाखल केला. त्याच्या ताब्यातून ७५० रुपयांचे साहित्य जप्त केले. राजेंद्र जनार्दन काळबांडे (४६) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी भातकुली पोलिसांनी ६(ब), २४(१) अन्वये गुन्हा दाखल केला. सदर घटनेचा पुढील तपास भातकुली पोलीस करीत आहे.

### क्षुल्लक कारणावरून बापलेकीला मारहाण

**पथ्रोट :** पार्डी येथे क्षुल्लक कारणावरून दोन युवकांसह एका महिलेने मुलीसह तिच्या वडिलांना काठीने मारहाण करीत जखमी केले. विवाहित मुलीने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अजय हेमराज आठवले (२८), पवन हेमराज आठवले (२४) व एक महिला यांच्याविरुद्ध ११८ (१), ११५(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला.

### जागेच्या वादातून महिलेला मारहाण

**अचलपूर :** जागेच्या वादातून महिलेला मारहाण करीत जखमी केले. शिविगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना नायगाव येथे घडली. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून सरमसपुरा पोलिसांनी माणिक देवराव गुळदे (५८), आकाश अशोक डोंगरदिवे (३५), गौरव माणिक गुळदे (२३) व अन्य एक महिला अशा चौघांवर, तर माणिक देवरावजी गुळदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून प्रभाकर पांडुरंग गुळदे (५८), मधुकर पांडुरंग गुळदे (५८) व दोन महिला अशा चौघांवर परस्परविरोधी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

# जनुना-सावनेर मार्गावरील 'डांबर' गायब!

## कंत्राटदारांच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशांचा जीव टांगणीला | रस्त्यावरील खड्डे देतात अपघाताला निमंत्रण

अजिंक्य भारत | साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी दि. ७ -** नांदगाव खंडेश्वर तालुका अंतर्गत येणाऱ्या जनुना सावनेर रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून मार्गक्रमण करणाऱ्या प्रवाशांना अपघाताला आमंत्रण देणाऱ्या बातम्या मागील काही वर्षांत प्रकाशित झाल्या होत्या. याचीच दखल घेऊन धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापदादा अडसड यांनी आपल्या प्रयत्नाने अर्थसंकल्पीय अंतर्गत सन २०२३ मध्ये लोणी मोरगाव- जनुना - टिमटाळा सावनेर रस्त्याचे मजबूतीकरण आणि रुंदीकरण करणेसाठी अंदाजित दोनशे पन्नास लक्ष रूपयांचा निधी शासनाकडून खेचून आणून लगेच भूमिपूजन ही केले. काही दिवसांतच कामाला सुरुवात झाली, अंतिम टप्प्यात बारीक चुरा टाके पर्यंत काम सुरूच होते मात्र शेवटी रस्त्यावर एक दोन दिवसात डांबर पडणारच तोच कंत्राटदाराच्या हलगर्जीपणा मुळे काम असे रखडले की जवळपास एक दोन वर्षे होऊनही ते काम पुर्णत्वास आले नाही. रस्ता पुर्णतः उखडून गेला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या सर्व गोष्टींचा त्रास सामान्य नागरिकांना होत असून जनुना, टिमटाळा, खिरसाना, निरसाना, सावनेर येथील स्वयंघोषित गाव नेतेही मुग गिळून बसले आहे, तर कंत्राटदारानेसुद्धा जाणीवपूर्वक



पाठ फिरवल्याचे निदर्शनास आले आहे. एवढा मोठा निधी शासनाकडून उपलब्ध करून सुद्धा कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे.




ऐन पावसाळ्याच्या तोंडावर रस्ता डांबरीकरण होत नसतांना अपघाताचे प्रमाण टाळावे यासाठी रस्ता डांबरीकरण त्वरित करण्याचे



आदेश संबंधित कंत्राटदारांना देण्यात यावे याकरिता पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते श्रीपाल सहारे यांनी जनप्रतिनिधींना प्रसिध्दी माध्यमाद्वारे साकडे घातले आहे.

# ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभाराविरोधात आठवले गटाकडून जिल्हा शल्यचिकित्सकांना निवेदन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. ७ :** धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय सेवा पूर्णतः ढासळलेल्या स्थितीत असून, रुग्णांच्या जीवाशी खेळ खेळला जात असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) तर्फे करण्यात आला आहे. यासंदर्भात आज जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती यांना पक्षाच्या शिष्टमंडळाने निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक आणि इतर चार एमबीबीएस डॉक्टर असूनही ते आपले खासगी दवाखाने चालविण्यात अधिक रस घेत आहेत. त्यामुळे रुग्णालयात डॉक्टरांची अनुपस्थिती वारंवार जाणवत असून, गंभीर रुग्णांवर



उपचार होऊ शकत नाहीत.

रुग्णालयात मोठा जनरेटर असतानाही, वीज नसल्यास महिला रुग्णांची प्रसुती टॉर्चच्या उजेडात करावी लागत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. याशिवाय काही डॉक्टर पी.एच.सी. व इतर आरोग्य तपासणी करणाऱ्यांची नेमणूक करून आपली जबाबदारी टाळत असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार न मिळाल्याने रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. तसेच, गेल्या अनेक महिन्यांपासून रुग्णालयात आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध नसल्याने शुगर, बीपी यांसारख्या गंभीर आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या भोंगळ कारभाराविरोधात त्वरित कारवाई न झाल्यास, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जनआंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या शिष्टमंडळात प्रकाशराव बन्सोड (जिल्हा समन्वयक), महेंद्रभाऊ भालेकर (जिल्हा समन्वयक), ओमप्रकाश बन्सोड (जिल्हाध्यक्ष), सुनिलभाऊ रामटेके (युवा जिल्हाध्यक्ष), प्रशांत मुन (जिल्हा संपर्क प्रमुख)राजू दवणे जिल्हा कोषाध्यक्ष, मनोहर गोडस्वार (अमरावती शहर अध्यक्ष), रवी ऊर्फ दादू मेश्राम (ता. संघटक), प्रेम मोटघरे (ता. महासचिव) व अशांतभाऊ रंगारी (महासचिव) मनिष शेलारे विनायक ढाणके डॉ अश्विनीताई गोंडाणे यांचा समावेश होता.

# डीबीटीमुळे हजारो लाभार्थ्यांना थेट अनुदान

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** अमरावती जिल्ह्याने शासनाच्या थेट लाभ हस्तांतरण ( डीबीटी) योजनेच्या अंमलबजावणीत जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे.

डिसेंबर २०२४ पासून सुरू झालेल्या या प्रक्रियेअंतर्गत, संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या हजारो लाभार्थ्यांना थेट त्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यांमध्ये अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे. मे २०२५ पर्यंतचे अनुदान वितरीत झाले असून, अमरावती जिल्हा डीबीटी पोर्टलवर सर्वाधिक लाभार्थी नोंदणी आणि अनुदान वितरणात राज्यात आघाडीवर आहे.

शासन निर्णयानुसार, जानेवारी २०२५ पासून केवळ आधार प्रमाणित लाभार्थ्यांनाच डीबीटी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य दिले जात आहे. सद्यस्थितीत २ जून २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, संजय गांधी निराधार योजनेचे ८७ हजार ०७३ लाभार्थी डीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत असून, त्यापैकी 75 हजार 977 आधार प्रमाणित आहेत आणि ६२ हजार ४०० लाभार्थ्यांना मे महिन्याचे अनुदान प्राप्त झाले आहे.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत १ लाख ६१ हजार ६५१ लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून, 1 लाख 35 हजार 162 आधार प्रमाणित आहेत आणि १ लाख १३ हजार ०६९ लाभार्थ्यांना अनुदान मिळाले आहे.

जिल्ह्यातील एकूण २ लाख ४८ हजार ७२४ लाभार्थ्यांपैकी २ लाख ११ हजार १३९ जणांचे आधार प्रमाणीकरण झाले असून, १ लाख ७५ हजार ४६९ लाभार्थ्यांना अनुदान मिळाले आहे. अनेक लाभार्थ्यांना एकापेक्षा जास्त बँक खाती असल्याने, अनुदान आधार लिंक केलेल्या खात्यात जमा होत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी आपले योजनेचे बँक खाते आधारशी लिंक करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ज्या लाभार्थ्यांचे पेमेंट फेल झाले आहे, त्यांनी त्वरित आपल्या बँकेच्या शाखेत आधारकार्डची प्रत जमा करून खाते आधारशी संलग्न करून घ्यावे. तसेच, ज्या लाभार्थ्यांची अद्याप डीबीटी पोर्टलवर नोंदणी झाली नाही किंवा आधार प्रमाणित नाही, त्यांनी अद्ययावत आधार कार्ड आणि बँक पासबुकची प्रत तहसील कार्यालयातील संजय गांधी योजना विभागात सादर करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



# आज भगवान बुद्धाच्या मूर्तिचे अनावरण

**बिहाली (मेळघाट) -** निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या मेळघाट मधील अचलभूमी धम्म प्रशिक्षण केंद्र बिहाली येथील विहारात नागपूर येथील दाणी पुरुष म्हणून परिचित असलेले रत्नाकर वामनराव वाहने यांनी आपले पिता वामनराव वाहने यांच्या स्मृती प्रित्यर्थ तथागत भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती भेट देण्यात आली त्या मूर्तिचे अनावरण दि. ८ जून २०२५ ला सकाळी ११ वाजता अजिंक्य भारतचे आवृत्ती संपादक तथा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष संजय देशमुख, राजमाता जिजाऊ बहुउद्धेशीय संस्था पूर्णानगरचे अध्यक्ष तसेच लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ अमरावती जिल्ह्याचे उपाध्यक्ष संजय सरवटकर यांच्या हस्ते तर सामाजिक कार्यकर्ते भाऊ सरकटे, संपादक वाय. एम. रामटेके, पंचशील वासतिगृह परतवाडा संचालक शिरीष गवई यांच्या प्रमुख उपस्तितीत संपन्न होत असून त्यानिमित्ताने दिवसभर विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सागर वाहने तसेच आयोजकांनी केले आहे.

# राष्ट्रीय किसान मोर्चाचे मंगळवारी आमदारांच्या घराला घेराव आंदोलन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. ७ :** उमेश वानखडे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विधानसभेतील आमदारांच्या आमदारांच्या कामगिरीची माहिती द्या राष्ट्रीय किसान मोर्चाचा घेराव आंदोलनाचा इशारा... शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विधानसभेत आमदारांनी काय भूमिका मांडली याची लिखित माहिती जिल्हाधिकारी तहसीलदार यांच्या अचलपूर



यांच्यामार्फत अन्यथा दिनांक दहा सहा २०२५ रोजी मतदार संघातील आमदारांच्या घराला कार्यालयाला घेराव घालण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना एका निवेदनाद्वारे देण्यात आला दिलेल्या निवेदनावर राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने की न्याय हक्कासाठी किती प्रश्न मांडले आहेत तर त्याचे कारण काय आहे करावा शेतकऱ्यांच्या शेतमाल चर्चा करून हक्क मूल्य प्रकारची रक्कम व भावांतर मूल्य फरकाची रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या नावे तात्काळ जमा करण्याची यासह विविध मागण्या निवेदनात नमूद केले या निवेदनावर राज्य कोषाध्यक्ष महाराष्ट्र राज्य बाबा मोहोळ बुद्धिस्ट इंटरनॅशनल राज्य सदस्य तालुकाध्यक्ष राज्य आदिवासी एकता परिषद परसराम खांडबाळे काशीराम मधुकर सावलकर हजर होते

## क्षुल्लक कारणावरून मारहाण

**चांदूरबाजार :** घरासमोर तुझी बकरी का आली. या क्षुल्लक कारणावरून वाद घालून एकाला थापड बुक्यांनी मारहाण करण्यात आली. कोंडवर्धा येथे ही घटना घडली. शिवचरण शेलूकर यांच्या तक्रारीवरून चांदूरबाजार पोलीस ठाण्यात नंदू रामसू उईके याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'एक पेड माँ के नाम' उपक्रमा अंतर्गत वृक्षारोपण

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. ७ :** ५ जून 'जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी व गावातील नागरीकांना झाडे देऊन 'एक पेड माँ के नाम' उपक्रमात अंतर्गत कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी विलास राठोड, गजानन वानखडे, विजय गाले, अभिजित ठाकरे, सोपान मुळे, निलेश खडसे, दिपाली मलवार, रोशन गभणे, राहुल वगारे, प्रेम निचत, प्राथमिक आरोग्य केंद्राची वैद्यकीय



अधिकारी डॉ. रिकुंजय केचे, डॉ विजय सोनपरोते व सर्व अधिकारी वृंद व तसेच अंजनगाव बारी मधील नागरीक तसेच युवा वर्ग मोठया प्रमाणात उपस्थित होता.

'एक पेड माँ के नाम' उपक्रमात जिल्हा प्रशासनासह स्थानिक स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, सर्व शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग घ्यावा. पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' हे अभियान पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राबविण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या होत्या.

# बडनेरा शहरात बोगस पॅथॉलॉजीचा तपासणीच्या नावाखाली जीवाशी खेळ

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बडनेरा, दि. ७ :** रुग्णाच्या शरीरातील आजाराचे नेमके निदान होण्यासाठी विविध प्रकारच्या तपासण्या पॅथॉलॉजी कडून तपासणी केल्या जातात. मात्र आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या लॅब सध्या वादाच्या भरात सापडले आहेत. ज्याच्याकडे लॅब टेक्निशियन कुठलीही सुविधा नाही असे लोकही दुचाकी वर रक्त संकलन करून रुग्णाला रिपोर्ट देत असल्याची चर्चा आहे. शहरात सर्वत्र राजरोस सुरू असलेल्या या प्रकरणामुळे रुग्णाची आर्थिक लूट होऊन त्याची मृत्यूची गाठ होऊ शकते. याला आळा



घालण्यासाठी तत्पर उपायोजनाची गरज आहे.

सध्या स्वतःचे आरोग्य सांभाळणे फार आवश्यक झाले आहे. कारण दवाखान्यात खर्च आका बाहेर गेला आहे. सध्या ताप आला तरी तर रक्त तपासणी डॉक्टर पी खर्च जवळपास १ ते २ हजार रुपये होतो. गंभीर आजाराच्या तपासण्या केल्या जाणाऱ्या याचा खर्च विचारूच नका. यामुळे आजारी पडण्याची भीती सर्वसामान्य लोकांना विचारूच नका अशी झाली आहे. आणखी एक गंमत म्हणजे संबंधित डॉक्टर रेफर करतात. त्यास लॅबवर तपासणी करण्यास सल्ला डॉक्टर पेशंटला देतात. वास्तविक कुठेही तपासणी करण्याचा पेशंटला हक्क परंतु आहे. मात्र इतर क्षेत्रापेक्षा वैद्यकीय क्षेत्रात कमिशन खोरी जोरात सुरू दिसून येते . कारण मेडिकल वाल्यापासून ते डॉक्टर लॅब तसेच ॲम्बुलन्स यांच्या प्रयत्न आर्थिक साखळी आहे. या साखळीत सर्वसाधारण नागरिक याची पिळवणूक होत आहे. विविध प्रकारच्या नावाखाली रुग्णाची आर्थिक लूट केल्या जात आहे. डॉक्टरचे कमिशन द्यायला लागत आहे असे लॅब वाले सांगत आहे त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना लोकांना या गोष्टीचा आर्थिक व पिळवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे. पैसे कमावत्या व तपासणी नावाखाली अनेक लॅब टेक्निशियन रुग्णाच्या जीवाशी खेळण्याची स्पर्धा लागली आहे. तरी शासनाने आरोग्य विभागाने यावर कारवाई करणे गरजेचे आहे. अशी नागरिकाची मागणी केली जात आहे.

# निवासी शाळांमध्ये धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची मुदत 20 जूनपर्यंत

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** इतर मागास बहुजन कल्याण विभाग विशेष मागास प्रवर्गातील 'गोवारी' समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी इंग्रजी माध्यम निवासी शाळा चालविणाऱ्या व इच्छुक असलेल्या नामांकित संस्था, शाळांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने शाळा निवडीचे निकष, पात्रता, अटी व शर्ती या विभागाच्या १४ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सविस्तर माहितीसह www.maharashtra.gov.in या संकेतस्तळावर उपलब्ध आहेत. इच्छुक शैक्षणिक संस्था, शाळांनी दि. २० जनू २०२५ रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत माहितीसह सहायक संचालक, इतर



मागास बहुजन कल्याण, अमरावती या कार्यालयात शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरुन परिपुर्ण अर्ज सादर करावा. असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक गजेंद्र मालठणे यांनी केले आहे.

# घटना-घडामोडी



## जिल्हा न्यायालय परिसरात पर्यावरण दिनी वृक्षारोपण

**यवतमाळ :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त (५ जून), जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नागेश न्हावकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, वकील संघ व सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने हा महत्वपूर्ण, स्तुत्य, पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वी झाला. जिल्हा न्यायाधीश-१ आर.एस.साळगावकर, मुख्य न्यायदंडाधिकारी ए.एम.शहा, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे प्रभारी सचिव अमितसिंह मोहने यांनी वृक्षारोपण करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात केली. यावेळी न्या. साळगावकर यांनी वाढते तापमान व वायू प्रदूषण रोखण्यासाठी वृक्षतोड थांबवण्याचे कळकळीचे आवाहन केले. 'पिंपळ, कडुलिंब, वड यांसारखी झाडे वायू प्रदूषणापासून बचाव करण्यासाठी अत्यंत महत्वाची आहेत, असे ते म्हणाले. त्यांनी भारतीय संस्कृतीतील सणांच्या निमित्ताने झाडांचे महत्व जपण्याच्या परंपरेवरही भर दिला. कार्यक्रमात सर्व न्यायिक अधिकारी, लोक अभिरक्षक व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त, सक्रिय सहभाग घेत विविध प्रजातींची झाडे लावली आणि त्यांच्या संरक्षणाचा व संवर्धनाचा संकल्प केला.




## उमरखेड आयटीआयमध्ये विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू

**उमरखेड :** येथील हुतात्मा मधुकर चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. संस्थेत इलेक्ट्रिशियन, फिटर, डिझेल मेकॅनिक, वेल्डर, कॉम्प्युटर ऑपरेटर आदींसह एकूण २८४ जागांवर प्रवेश दिला जाणार आहे. ड्रेस मेकिंग व कॉस्मेटॉलॉजी हे व्यवसाय मुलींसाठी राखीव असून, इतर व्यवसायांतही ३० टक्के जागा राखीव आहेत. प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ५०० रुपये विद्यावेतन, शिष्यवृत्ती, एसटी पास सवलत अशा अनेक सुविधा उपलब्ध आहेत. कमी खर्चात हमखास रोजगार व स्वयंरोजगाराची संधी देणाऱ्या या अभ्यासक्रमांना होतकरू व गरजू विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य डी. पी. पवार यांनी केले आहे.

## सामाजिक स्वास्थ्यासाठी शहरात 'मंथन'ची स्थापना

**यवतमाळ :** यवतमाळ शहरातील सामाजिक स्वास्थ्य निकोप राखण्याकरिता व समाजविघातक कृत्यांना रोखण्यासाठी शहरातील समाजशास्त्रज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, समाजसेवक, पोलीस अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येत 'मंथन' या सायकॉलॉजिकल असोसिएशनची स्थापना केली आहे. ही शहरातील अशा प्रकारची पहिलीच संघटना आहे. या चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन समन्वयक प्रा. घनश्याम दरणे आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले. 'समाजाच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ पोलीस-प्रशासनाची नसून, सुजाण नागरिक म्हणून आपलीही आहे,' या भावनेतून हा पुढाकार घेतला आहे. यातून व्यसनाधीनता, वाढती गुन्हेगारी, घटस्फोट, कौटुंबिक छळावर अंकुश बसविण्यासाठी तज्ज्ञांची मते विचारात घेतली जातील. सजग पालकत्व, अल्पवयीनांच्या भावनिक समस्या, करिअर व जोडीदार निवडीमागील मानसशास्त्रीय पैलूंवरही चर्चासत्रांतून उलगडा होईल. 'भावनिक साक्षरता' ही नवी संकल्पना समाजात रुजविण्यावर भर दिला जाईल. वाढत्या रक्तरंजित घटनांच्या पार्श्वभूमीवर 'आक्रमक वर्तनामागची मनोबैठक' या विषयावर लवकरच पहिले महत्त्वपूर्ण चर्चासत्र होईल, असे प्रा. दरणे यांनी कळवले.

# आर्णीला अतिक्रमणांचा विळखा

## रस्त्यावरील ठेल्यांवर चालतात मटका: रहिवाशांसह व्यापाऱ्यांचे मुख्याधिकारी, तहसीलदार, ठाणेदारांना निवेदन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ७ :** शहरातील एका रस्त्यावर अतिक्रमित ठेल्यांवर मटका, जुगार असे अवैध धंदे सुरू असल्याने नागरिक त्रस्त आहेत. हे अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करण्यासाठी, रहिवाशांनी मुख्याधिकारी, तहसीलदार व ठाणेदार यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.

आर्णी शहरातील मुख्य रस्त्याच्या मागे असलेल्या माहेर मंगल कार्यालय ते आसरा रोडला जोडणाऱ्या ३० फुटी रस्त्यावर काही लोकांनी टिनपत्राचे ठेले टाकून अतिक्रमण केले आहे. हेच ठेले आता अवैध धंद्यांचे केंद्र बनल्याने, परिसरातील रहिवासी आणि व्यापारी कमालीचे त्रस्त झाले आहेत. हे अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करून देण्यात यावा, या मागणीसाठी लगतच्या रहिवाशांनी ४ जून रोजी मुख्याधिकारी, तहसीलदार आणि ठाणेदार यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, या अतिक्रमित ठेल्यांमध्ये आणि परिसरात दररोज मटका, जुगार आणि अवैध दारू पिणाऱ्यांचा अड्डा जमतो. शहर आणि ग्रामीण भागातील अनेक शौकीन येथे जमत असल्याने, परिसरातील सामाजिक शांतता धोक्यात आली असून, रहिवाशांना, विशेषतः महिलांना, मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या अतिक्रमणामुळे ३० फुटी रस्ता अत्यंत अरुंद झाला असून, नागरिकांना साधे ये-जा करणेही कठीण झाले आहे.



रहिवाशांनी आपल्या निवेदनासोबत या अतिक्रमणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे छायाचित्र (फोटो) पुरावा म्हणून जोडले आहेत. ङ्गआम्ही याच ले-आऊटमध्ये वास्तव्यास असून, या अवैध धंदेवाल्यांच्या त्रासामुळे आमचे येथे राहणे कठीण झाले आहे,ङ्ख असे त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. प्रशासनाने या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून, हे सर्व अतिक्रमण काढून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करावा, अशी आग्रही विनंती गजानन चौधरी, दिलीप वानखडे, संतोष श्रीवास, डॉ. विक्रम ठवकर, संजय केशववार, दिलीप चिंतावर आणि राजू भोयर या रहिवाशांनी निवेदनाद्वारे केली आहे. प्रशासनाने यावर तातडीने कारवाई न केल्यास आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### अतिक्रमणांनी गिळला रहदारीचा रस्ता

**आर्णीतील माहेर मंगल कार्यालय ते आसरा रोडला जोडणाऱ्या ३० फुटी रस्त्यावर टिनपत्राच्या ठेल्यांचे अतिक्रमण झाले आहे. यामुळे हा वर्दळीचा रस्ता अत्यंत अरुंद होऊन नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. ये-जा करण्यासाठी जागाच उरली नसल्याने, स्थानिक रहिवासी आणि व्यापारी यांनी हे अतिक्रमण काढण्याची मागणी केली आहे.**

### अवैध धंद्यांचे अड्डे, नागरिक हैराण

**अतिक्रमित केलेले हे ठेले केवळ रस्ता अडवत नाहीत, तर ते मटका, जुगार आणि दारू पिणाऱ्यांचे अड्डे बनले आहेत. दररोज जमणाऱ्या या शौकिनांच्या गर्दीमुळे आणि गोंधळामुळे परिसरातील शांतता भंग पावली असून, रहिवाशांना, विशेषतः महिला आणि मुलांना, मोठा त्रास सहन करावा लागत आहे.**

## CAPTION अभिवादन...



**यवतमाळ :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यभिषेकदिनानिमित्त शुक्रवारी सकाळी ९ वाजता येथील शिवतीर्थावर भिमगर्जना, ढोल-ताशा व ध्वजपथक यांच्यावतीने मानवंदना देण्यात आली. यावेळी शिवतीर्थ परिसर 'जय जिजाऊ, जय शिवराय' या घोषणांनी दुमदुमला होता. या पथकाचे नेतृत्व डॉ. नीरज वाघमारे यांनी केले.

# 'माझी वसुंधरा' अभियानाला सुरुवात

## २५ हजार वृक्षलागवडीचे उद्दिष्ट, शहराला हरित करणार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. ७ :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त (५ जून) 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत घाटंजी शहरात वृक्षारोपण कार्यक्रमास उत्साहात प्रारंभ झाला. निसर्गाचा समतोल राखणे व प्रदूषण नियंत्रणासाठी यावर्षी २५ हजार झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या उपक्रमाची सुरुवात गुरुवार (दि. ५) जून २०२५ रोजी प्रशासक तथा मुख्याधिकारी राजू महादेवराव घोडके यांच्या हस्ते शिव मंदिर, खापरी नाका येथे वृक्षारोपण करून करण्यात आली. पहिल्याच दिवशी १०० पेक्षा जास्त वृक्षांची लागवड करण्यात आली. लावलेल्या वृक्षांच्या संवर्धनासाठी सुरक्षा कठडे, नियमित पाणी आणि खुरपणीचे नियोजनही करण्यात आले आहे. प्रदूषण नियंत्रण, जैवविविधतेचे संरक्षण आणि पाणी साठवण यांसारखे अनेक फायदे वृक्ष लागवडीमुळे होतात, असे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी पाणीपुरवठा अभियंता ज्ञानेश्वर घरडे, नगर अभियंता राजर नारणकर, कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी गणेश जाधव, बांधकाम अभियंता विवेक ससाणे, सागर वावरे, गंगाधर इंगोले, रोशन तायडे, समीर शेख व सर्व नगरपरिषद कर्मचारी, तसेच विजय रामटेके, धनु पेटेवार, गोलू फुसे, मनीष बोरकर आदींची उपस्थिती होती. शहर स्वच्छ, सुंदर व हरित करण्यासाठी सर्वांनी श्रमदानातून सहभागी व्हावे, असे आवाहन घोडके यांनी केले.



# घाटंजीत विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा

## २० व्या वर्धापन दिनानिमित्त महावितरणची जनजागृती रॅली



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. ७ :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) २० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून, घाटंजी शहरात रविवार, १ जून रोजी 'विद्युत सुरक्षा सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शहराच्या मुख्य रस्त्यांवरून जनजागृती रॅली काढण्यात आली, ज्यात अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

विजेशी संबंधित अपघात शून्यावर आणणे व नागरिकांमध्ये वीज सुरक्षेबाबत जागरूकता वाढवणे हे सप्ताहाचे उद्दिष्ट आहे. यानिमित्त 'रन फॉर सेफ्टी' रॅली महावितरण उपविभाग कार्यालयातून निघाली. रॅलीत सहभागी अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, सुरक्षा रक्षक व नागरिकांनी सुरक्षा संदेशांचे फलक, बॅनर्स झळकावत आणि जोरदार घोषवाक्य देत जनजागृती केली. संपूर्ण कार्यक्रमाचे नेतृत्व उपकार्यकारी अभियंता श्यामसुंदर कुर्रा यांनी केले. यावेळी सर्व अभियंते गौरव कनाके, नाईक, नैताम, देसाई, भांगे व उपविभागातील सर्व संबंधित कर्मचारी उपस्थित होते. सप्ताहात सुरक्षित वागणूक, योग्य उपकरणांचा वापर आणि आपत्कालीन स्थितीत काय करावे यावर प्रामुख्याने भर दिला जाईल.

## 'स्वाधार' योजनेतील त्रुटींसाठी मुदतवाढ

**यवतमाळ, दि. ७ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत ऑनलाइन अर्ज केलेल्या; परंतु अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्यासाठी १० जून २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतीत त्रुटींची पूर्तता न केल्यास अर्ज बाद ठरतील, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त मंगला मून यांनी केले आहे. योजनेंतर्गत ऑनलाइन सेंड बॅक केलेल्या अर्जांपैकी अद्यापही १८० विद्यार्थ्यांनी त्रुटींची पूर्तता केलेली नाही. ११ जूनपासून २०२५-२६ ची वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू होत असल्याने, त्यापूर्वीच अर्ज फेरसादर करणे आवश्यक आहे. विद्यार्थी योजनेपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील, असेही कळविण्यात आले आहे.

# भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हा अधिवेशन आज

## विविध सामाजिक प्रश्नांवर होणार चिंतन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** व्यवस्था परिवर्तनाचा लढा देणाऱ्या भारत मुक्ती मोर्चाचे यवतमाळ जिल्हा अधिवेशन रविवार, ८ जून रोजी येथील नागभूमी, वडगाव (दत्त हॉस्पिटलमागे, जांब रोड) येथे आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या पुनर्निर्मितीसाठी तसेच समता, स्वतंत्रता, बंधुता व न्यायावर आधारित समाज निर्मितीसाठी या अधिवेशनात चिंतन होणार आहे.

या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय समीक्षा प्रभारी दीपक वासनिक भूषवतील. यावेळी राष्ट्रीय बिछडा वर्ग ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष गजानन उल्हे, बामसेफ जिल्हाध्यक्ष विजय सोनुले, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे जिल्हा प्रभारी अविनाश शेंडे आणि गुरु रविदास क्रांती मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विजयराज शेगेकर यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. देशातील शिक्षण, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे हमीभाव यांसारख्या बहुजनविरोधी समस्यांवर व त्यातून सुटका कशी होईल, यावर गंभीर मनन होईल. सर्व बहुजन बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुनील गवई यांनी केले. जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

# २१ जून ठरणार वर्षातील सर्वांत मोठा दिवस

## आपल्या भागात दिवस असणार १३ तास १४ मिनिटांचा, 'स्काय वॉच ग्रुपची माहिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** येत्या २१ जून रोजी वर्षातील सर्वात मोठा दिवस अनुभवता येणार आहे. आपल्या भागात दिवस १३ तास १४ मिनिटांचा असेल. सूर्याच्या उत्तरायणामुळे होणाऱ्या या खगोलीय घटनेमागे विज्ञान समजून घेण्याचे आवाहन 'स्काय वॉच ग्रुप'ने केले आहे.

येत्या शनिवारी, २१ जून २०२५ रोजी, उत्तर गोलार्धात वर्षातील सर्वात मोठा दिवस आणि सर्वात लहान रात्र अनुभवता येणार आहे. दिवस आणि रात्रीचा कालावधी कमी-जास्त होणे, ही एक नैसर्गिक खगोलीय घटना असून, यामागे पृथ्वीच्या आसाचा कल आणि तिचे सूर्याभोवतीचे परिभ्रमण हे वैज्ञानिक कारण आहे, अशी माहिती खगोल अभ्यासकांनी दिली आहे. पृथ्वीचा अक्ष तिच्या कक्षेशी २३.५ अंशाने कललेला आहे. या कललेल्या स्थितीतच पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार मार्गाने फिरते. यामुळे, वर्षभरात सूर्याचे आकाशातील स्थान बदलत असल्याचे भासते. २२ डिसेंबरपासून सूर्याचा उत्तरेकडे प्रवास सुरू होतो, ज्याला 'उत्तरायण' म्हणतात. उत्तरायणात दिवस हळूहळू मोठा होत जातो आणि रात्र लहान होते. सूर्याचा हा उत्तरेकडील प्रवास २१ जून रोजी संपतो. या दिवशी सूर्य विषुववृत्ताच्या जास्तीत जास्त उत्तरेकडे असतो आणि पृथ्वीचा उत्तर ध्रुव सूर्याच्या सर्वाधिक जवळ झुकलेला असतो. म्हणूनच, या दिवशी उत्तर गोलार्धात सूर्यप्रकाशाचा कालावधी सर्वाधिक असतो आणि हा वर्षातील सर्वात मोठा दिवस ठरतो. यानंतर, २२ जूनपासून सूर्याचा दक्षिणेकडे प्रवास (दक्षिणायन) सुरू होतो आणि दिवसाचा कालावधी पुन्हा कमी होऊ लागतो. आपल्या यवतमाळ परिसरात २१ जून रोजी सूर्योदय सकाळी ६ वाजून ०३ मिनिटांनी होईल आणि सूर्यास्त सायंकाळी ७ वाजून १७ मिनिटांनी होईल. म्हणजेच, या दिवशी दिवसाचा एकूण कालावधी १३ तास १४ मिनिटांचा असेल. 'स्काय वॉच ग्रुप, यवतमाळ'चे अध्यक्ष रवींद्र खराबे, प्रमोद जिरापुरे, उमेश शेंबाडे, भूषण ब्राह्मणे, जयंत कर्णिक, पूजा रेकलवार, मानसी फेंदर आणि शुभांगी झिल्पे यांनी आवाहन केले आहे की, नागरिकांनी या खगोलीय घटनेमागील विज्ञान समजून घ्यावे. दिवसाची लांबी कमी-जास्त होण्याचा कोणत्याही राशीवर कोणताही परिणाम होत नाही, त्यामुळे नागरिकांनी कोणताही गैरसमज बाळगू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### मध्यरात्रीचा सूर्य आणि ऋतुबदल

**२१ जून रोजी उत्तर धुरवाजवळच्या नॉर्वे, फिनलँड, ग्रीनलँड, अलास्का या प्रदेशांमध्ये मध्यरात्रीही सूर्य दिसतो, तर काही आर्क्टिक भागांत तो मावळतच नाही. अनेक देशांमध्ये हा दिवस 'ऋतुबदलाचा दिवस' मानला जातो. मराठी पंचांगातही या दिवशी 'वर्षा ऋतू' प्रारंभ झाल्याची नोंद असते.**

# राळेगाव पोलिस ठाण्यात वृक्षारोपण

## नवनियुक्त ठाणेदार शीतल मालते यांच्याहस्ते शुभारंभ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**राळेगाव, दि.७:** जागतिक पर्यावरण दिनाचे (दि. ५ जून) औचित्य साधून, पर्यावरण संवर्धन विकास समिती, राळेगावच्या वतीने येथील पोलिस ठाण्याच्या आवारात गुरुवारी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. पोलिस ठाण्याच्या नवनियुक्त महिला ठाणेदार शीतल मालते यांच्या हस्ते या स्तुत्य उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी समितीचे जिल्हाध्यक्ष विनोद दौंदल यांनी 'वृक्ष हेच जीवन'हर संकल्पना स्पष्ट करत, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. झाडे शुद्ध हवा, पाणी आणि जमिनीच्या संवर्धनासाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नवनियुक्त ठाणेदार शीतल मालते यांनीही पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी एकत्र येऊन आपापल्या परिसरात किमान एक झाड लावण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास पोलिस उपनिरीक्षक दीपक राणे, पोलिस अंमलदार गोपाल वास्तार, सूरज चिव्हाणे, तसेच पर्यावरण समितीचे सदस्य दीपक जुमनाके, दैनिक 'अजिंक्य भारत'चे तालुका प्रतिनिधी कैलास कोडापे, जितेंद्र खोडे, कविता धुर्वे यांच्यासह पोलिस स्टेशनमधील अन्य पोलिस कर्मचारी व पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या हस्ते पोलिस ठाण्याच्या सुंदर, मोकळ्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

## थोडक्यात

### सासरच्या मंडळींकडून विवाहितेचा छळ

**रिसोड :** रिसोड तालुक्यातील मोहजाबंदी येथील नूतन अशोक नागरे हिचा विवाहानंतर अवघ्या दोन वर्षातच हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला, असा आरोप नूतनने पोलिसांत दिलेल्या तक्रारीतून केला आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी पतीसह ११ जणांविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.
लग्नानंतर सुरुवातीचे काही दिवस चांगले गेले; मात्र नंतर पती, सासू-सासरे, नणंद, दीर, चुलत सासू-सासरे आदी मंडळींकडून मानसिक व शारीरिक त्रास सुरू झाला. अखेर छळाला कंटाळून नूतनने रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी पती अभिलेश घुगे, सासू-सासरे, नणंद, दीर आदी एकूण ११ आरोपींवर गुन्हा दाखल केला.

### कारंजा येथे बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी



**कारंजा :** कारंजा शहरात बकरी ईद (ईद-उल-अजहा) मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरी करण्यात आली. आज सकाळपासूनच मुस्लिम बांधवांनी ईदगाह मैदान व मशिदींमध्ये सामूहिक नमाज अदा करून देशात सुख-समृद्धी आणि शांततेसाठी प्रार्थना केली. नमाजनंतर एकमेकांना ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्या. विविध ठिकाणी मदतीसाठी सामाजिक संस्थांनीदेखील सहभाग घेतला. त्याग, सेवा आणि समता. ईदगाह परिसरात राजकीय नेते युसूफ पुंजानी व त्यांच्या सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. शहरात सर्वत्र शांततेचे आणि सौहार्दाचे वातावरण होते. यावेळी उपविभागीय पो. अधिकारी प्रदीप पाडवी यांचा मार्गदर्शनात पो. नी. दिनेशचंद्र शुक्ला यांनी योग्य बंदोबस्त ठेवत कायदा व सुव्यवस्था राखली.

### डॉ.राधाकृष्ण विखे आज जिल्हा दौऱ्यावर

**वाशिम :** राज्याचे जलसंपदामंत्री (गोदावरी



व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील ८ जून रोजी जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ८ जून रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह वाशिम येथे आगमन व राखीव, दुपारी १.१५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून अनसिंगकडे प्रयाण, दुपारी १.३० वाजता अनसिंग येथे आगमन व मोदी सरकारच्या ११ वर्षपूर्तीचे जनसंपर्क अभियान व सत्कार समारंभास उपस्थिती, दुपारी ३.४५ वाजता अनसिंग येथून वाशिम मालेगाव मार्गे अकोलाकडे प्रयाण करतील.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मोक्षधाममध्ये वृक्षारोपण



**वाशिम :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अनसिंग येथील मोक्षधाम परिसरात येथील ठाकरे परिवाराकडून वृक्षारोपण करण्यात आले. अनसिंग येथील मोक्षधाम परिसर सुमारे बारा एकरावर विकसित झाला आहे. ग्राम पंचायत, ठाकरे परिवार व ग्रामस्थांच्या पुढाकाराने याठिकाणी काही शासकीय निधी तर काही लोकवर्गणीमधून या मोक्षधाम परिसरात विकास कामे झाली आहेत. त्यामुळे आजही मोक्षधाम परिसरात सुमारे पाचशेच्यावर झाडे चांगल्या स्थितीत असून, या परिसराचे सौंदर्य वाढवीत आहे. वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी नुकतीच अनसिंग येथील मोक्षधाम परिसरास भेट देऊन समाधान व्यक्त केले. दरम्यान, पर्यावरण दिनाचे औचित्य साधून अनसिंग येथील जिजामाता शिक्षण संस्थेचे सचिव ओम ठाकरे, दीपाली ठाकरे, कन्या गायत्री व गीतीका यांनी या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल राखण्याचे मोलाचे कार्य केले.

# शेतकऱ्यांचे लक्ष पेरणीच्या मुहूर्ताकडे

## कोणते नक्षत्र देईल शेतकऱ्यांना वरदान

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ७ : अवकाळी पावसाच्या लपंडावात जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे आटोपली, तर काहींची अंतिम टप्प्यात आहेत. असे असले तरी पेरणीसाठी मान्सूनच्या पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. शेती व्यवसाय हा निसर्गाच्या भरवशावर अवलंबून असल्याने पेरणीसाठी शेतकऱ्यांच्या मदतीला कोणते नक्षत्र धावून येईल, याची काही शाश्वती नाही. यासाठी प्रतीक्षा केल्याशिवाय पर्याय नाही.**



यावर्षी जोरदार बरसलेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे जमीन ओलीचिंब झाली असली तरी, पेरणी कधी करावी आणि शेतीची कोणती कामे कोणत्या नक्षत्रात करावीत, यासाठी जिल्ह्यातील बरेच शेतकरी आजही नक्षत्रांवरच अधिक विश्वास ठेवून आहेत. ते परंपरा जपत पेरणीचा मुहूर्त साधतात. 'मृगाची पेरणी, धनधान्य देई', ही परंपरा याही वर्षी कायम राहील, असे बोलले जात आहे. शेती भारताच्या समाजजीवनाचा एक अविभाज्य अंग आहे. किंबहुना भारतीय समाज, अर्थव्यवस्था शेतव्यवस्थेवर अवलंबून आहे. हा संपूर्ण व्यवसाय मान्सूनकेंद्रित आहे. त्यामुळे मान्सूनचा पाऊस वेळेत आणि चांगला झाला तरच शेतीचे उत्पादन समाधानकारक येते आणि समाजजीवन सुरळीत राहते.

विदर्भात मान्सून सक्रिय झाला असला तरी पावसात काही दिवस खंड पडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. जमिनीत किमान सात इंच ओलावा आणि १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी. येत्या १० जूननंतर पावसाकरिता पोषक वातावरण तयार होईल. त्यानंतर टोबणी व पेरणी करावी, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनीही कृषी विभागाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आपले नुकसान टाळण्याची गरज आहे. अन्यथा पावसाअभावी मोठा फटका बसेल.



> आमच्या आजोबा-पणजोबांपासून नक्षत्रांवरच शेतीची कामे करत आले आहेत. हवामान बदलले असले तरी, आजही नक्षत्रांचा अंदाज बराचसा खरा ठरतो. नक्षत्रांचे गणित ठरलेले असते. त्यामुळे मी मृग नक्षत्रात चांगला पाऊस झाल्यावरच पेरणी करणार आहे. कमी पाऊस आला आणि नंतर दडी मारली तर नुकसान आमचेच होणार आहे.
>
> **- पवन पोरवाल**
> शेतकरी, काटा, ता., जि. वाशिम.



> हवामान विभागाचे अंदाज आणि मोबाइल ॲपवरील माहितीनुसारच मी पेरणीचे नियोजन करतो. नक्षत्रांवर अवलंबून राहिलो, तर आधुनिक शेतीत आपण मागे पडू. वेळेवर पेरणी झाली नाही, तर नुकसान होते. मी ॲपमधील माहिती व कृषी विभागाच्या सूचनेनुसारच पेरणी करेल.
>
> **- शरद देशमुख**
> शेतकरी, कार्ली, जिल्हा वाशिम.

## युवकाचा झोपेतच मृत्यू

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर,जैन, दि. ७ :** शिरपूर येथून जवळच असलेल्या खंडाळा शिंदे या गावी ५ जून सकाळी घडलेल्या एका दु:खद घटनेने खळबळ उडाली आहे. भागवत पांडुरंग शिंदे (रा.खंडाळा शिंदे ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे भाऊ श्रीकृष्ण पांडुरंग शिंदे (वय ३५) यांचा झोपेतच मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची (मर्ग) नोंद करण्यात आली आहे.
फिर्यादी भागवत शिंदे झोपलेले असताना, त्यांची भावजय शारदा श्रीकृष्ण शिंदे (वय २८) यांनी त्यांना उठवून सांगितले की, ''तुमचे भाऊ झोपेतून उठत नाहीत, लवकर चला.'' तेव्हा भागवत शिंदे तत्काळ त्यांच्या भावाच्या घरी गेले असता, श्रीकृष्ण शिंदे हे पलंगावर झोपलेल्या अवस्थेत आढळले. त्यांनी त्यांना हलवून आवाज दिला, पण कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. फिर्यादीने त्यांच्या अंगावर व गळ्यावर काही जखमा आहेत का, याची पाहणी केली; मात्र कुठलीही जखम आढळली नाही. दरम्यान, श्रीकृष्ण शिंदे हे ४ जून रोजी रात्री ११ वाजता झोपले होते व त्यानंतर ५ जून रोजी सकाळी उठवले असता ते मृत अवस्थेत आढळले. या तोंडी माहितीवरून पोलीस निरीक्षक केशव वाघ यांच्या आदेशानुसार सदर प्रकरणात मर्ग दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इमरान खान पठाण मपोहेकाँ रुख्साना शेख यांच्या मार्फत सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

## दुचाकी चोरीप्रकरणी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. ७ :** तालुक्यातील चिखली झोलेबाबा येथून अज्ञात चोरट्यांनी दुचाकी लंपास केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी ६ जून रोजी गुन्हा दाखल केला. ज्ञानेश्वर डोंगरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३ जून रोजी दुपारी त्यांनी दुचाकी (क्रमांक एमएच ३७ एजे ६५६०) चिखली झोलेबाबा येथील मुख्य रस्त्यावर उभी केली होती. तेथून जवळच असलेल्या नातेवाइकांच्या घरी गेलो असता, अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केली. ही बाब लक्षात येताच डोंगरे यांनी पोलिसात तक्रार दिली. त्यावरून मंगरूळपीर पोलिसांनी चोरट्यावर गुन्हा दाखल केला असून, शोध सुरू आहे.

## प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने शेतीला तारकुंपण द्यावे

### फकीर बाबाची प्रशासनाकडे मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ७ :** मानोरा तालुका हा सर्व बाबतीत अनुशेषग्रस्त असून, या तालुक्यातील जीवन जगण्याचे मुख्य साधन खरीप व रब्बी पिके आहेत. या पिकांना वन्य प्राण्यांचा दरवर्षी मोठा उपद्रव असल्याने शेतकऱ्यांची शेती सुरक्षित रहावी, यासाठी शासनाने तार कुंपण करून द्यावे, अशी मागणी रमेश तुकाराम महाराज ऊर्फ फकीर बाबा यांनी तालुका प्रशासनाला केली आहे.

तालुक्यातील शेतकरी अनेक समस्यांनी, संकटांनी वेढलेला आहे. शासन व प्रशासनाने अनंत अडचणींचा सामना करीत असलेल्या शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष द्यावे. शक्य असतील तेवढ्या समस्या सोडवाव्यात.

राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना दिलेले सरसकट माफीचे आश्वासन पाळण्याचीसुद्धा मागणी निवेदनात केली आहे. पोहरादेवी ते धावंडा व पोहरादेवी ते काकड चिखली हा प्रलंबित रस्ता पूर्ण करून देण्यात येण्याची मागणीसुद्धा फकीर बाबांनी केली आहे.

उपरोक्त मागण्यांसह इतरही अनुषंगिक मागण्या निवेदनाद्वारा फकीरबाबांनी केल्या आहेत. सदरील मागण्यांचा सकारात्मक विचार न झाल्यास ११ जूनपासून आंदोलन उभारल्या जाईल, असा इशारा फकीर बाबांनी शासनाला दिला आहे.

## प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून गाळमुक्त धरण योजनेला ठेंगा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ७ :** राज्य शासनाचे मृद व जलसंधारण विभाग त्यांच्या अखत्यारीत असलेल्या जलप्रकल्पातील गाळ बाहेर काढून पाणी साठा वाढावा, यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिल्या जाते. दुसरीकडे मात्र तालुक्यातील कुपटा परिसरात असलेल्या जलप्रकल्पात खोदलेल्या विहिरीतील शेकडो ब्रास मुरूम व माती धरणाच्या बुडीत क्षेत्रात दाबून शासनाच्या गाळमुक्त धरण योजनेला हरताळ फासल्या गेली आहे.



सदरील धरणाच्या बुडीत क्षेत्रातील खड्ड्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे कुपटा पाणीपुरवठा योजनेसाठी खोदलेल्या विहिरीतील शेकडो ब्रास गाळ दाबल्याची तक्रार कुपटा येथील शेतकरी एस.एस.चव्हाण तथा बाळा पुरणसिंह चव्हाण यांनी सन २०२३ यावर्षी केली होती. तक्रार झाल्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व लघुपट बंधारे विभागाच्या प्रशासकीय अधिकारी यांनी संयुक्त स्थळ पाहणी करण्यात आले असता ज्या ठिकाणी मुरूम व माती दाबण्यात आली ते ठिकाण चौकशी दरम्यान संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना तक्रारकर्त्याच्यावतीने निरीक्षणास आणून देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

धरण परिसरामध्ये साचलेल्या गाळाने जलसाठा कमी होऊन त्याचा फटका शेतकरी व इतर जीव-जंतूंना भोगावा लागत असल्यामुळे जलसाठा वाढण्यासाठी शासनाकडून अनेक उपाययोजना राबविल्या जात असताना लघुपाटबंधारे विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊनही कुपटा येथील धरणाच्या बुडीत क्षेत्रात पुरलेल्या शेकडो ब्रास माती व मुरुमामुळे या धरणाच्या जलसाठ्यावर परिणाम होणार असल्याचे मागील तीन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही उपरोक्त गंभीर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न दोन्ही विभागांकडून केला जात असल्याचा आरोप केला जात आहे.

बुडीत क्षेत्रात संबंधित विभागाकडून दाबण्यात आलेला राडारोडा याची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन संबंधितांवर उचित कायदेशीर कारवाई करण्यात यावी व मुरूम, माती पावसाळा सुरू होण्याआधी उचलण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये करण्यात आली असून, असे न करण्यात आल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येण्याचा इशारासुद्धा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## रिसोडच्या तहसील परिसरात आपले सरकार सेवा उपलब्ध



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ७ :** येथील नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणामार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून, तो२८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांनी उद्घाटन प्रसंगी म्हणाल्या की आपल्याकडे येणाऱ्या नागरिकांचे समाधान होणे अत्यंत महत्त्वाचे असून, त्यावर तुम्ही कार्य करत राहा, आमच्या शुभेच्छा तुमच्या सोबत आहेत, असे यावेळी उपविभागीय अधिकारी देवकर म्हणाल्या.

जिल्हा प्रकल्प प्रमुख सौरभ लुणावत जैन यांनी म्हटले की, शासकीय धोरणांशी सुसंगत अशा डिजिटल व पारदर्शक आदर्श आपले सरकार सेवा केंद्राच्या संकल्पनेला चालना दिली. हे केंद्र नागरिकांसाठी सरकारी सेवा व खासगी सेवा तसेच विभिन्न सेवा अधिक सुलभ व जलद करण्याच्या दृष्टीने क्रांतिकारक ठरेल. तसेच केंद्र उभारणीसाठी लागणाऱ्या सर्व साधनसंपत्तींचे नियोजन, कार्यप्रणाली आणि लोकसहभाग या सर्व बाबींमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले.
आदर्श आपले सरकार केंद्र, हे वाशिम जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण सुविधा ठरणार आहे, ज्यामुळे शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी त्यांना आता अधिक सुलभता मिळणार आहे. प्रसंगी नायब तहसीलदार गजानन जवादे, कुलमुथे, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# मानवतेला 'सॅल्युट': दिव्यांग निधी सामाजिक कार्याला अर्पण!

## गरीब मुलीच्या विवाहासाठी दिव्यांगांनी दिला आर्थिक आधार

। संजय अलदर ।

**मानोरा, दि. ७ :** शासनाकडून दिव्यांग बांधवांना योजने अंतर्गत दिव्यांग निधी मिळत असतो. भुली येथील दिव्यांग एकत्र आले. त्यांनी आपल्याला मिळत असलेला शासकीय योजनेतील निधी गरीब मुलीच्या विवाहासाठी अर्पण केला. दिव्यांगाचे समाजकार्य बघून प्रत्येकाने यामधून धडा घ्यावा, असा संदेश यानिमित्ताने सर्व समाजाला मिळाला.



मानोरा तालुक्यातील मुली येथील एका गरीब कुटुंबामध्ये जन्म घेतलेल्या माधुरी हिचा विवाह नुकताच पार पडला. माधुरी रतन राठोड हिच्या घरची परिस्थिती बेताचीच असल्याने विवाह कार्य कसे पार पाडायचे, या आर्थिक विवंचनेत तिचे कुटुंब होते. नेमकी हीच बाब गावातीलच दिव्यांग बांधवांच्या लक्षात आली. लगेच या दिव्यांग बांधवांनी एक मीटिंग घेतली. आपल्याला शासकीय योजनेमार्फत मिळत असलेला निधी माधुरी हिच्या कुटुंबाला दिल्यास विवाह सोहळ्यासाठी मदत मिळेल, अशी चर्चा झाली. लगेचच या चर्चेला सर्व दिव्यांग बांधवांनी सकारात्मकतेचे रूप दिले आणि आपल्याला मिळत असलेला शासकीय निधी माधुरीला तिच्या संसारासाठी मदत म्हणून देण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या माघारलेल्या घटकांच्या सुख-दु:खात आपण उपयोगी पडावे, असा उच्च विचार करणारे लोक अजूनही समाजात आहेत. हा संदेश या निमित्ताने समाजाला मिळाला, हे उल्लेखनीय. भुली येथील दिव्यांग प्रा.जय चव्हाण यांनी पुढाकार घेऊन दिव्यांग निधी एकत्रित केला. एकत्र केलेले साडेचार हजार रुपयांचा धनादेश सर्व बांधवांच्या उपस्थितीत माधुरी हिला सुपूर्द केला. यावेळी माधुरीच्या डोळ्यातील आनंदाश्रुला कुणीच थांबवू शकले नाही. तिची देहबोलीच ही सांगत होती की, ज्या दिव्यांगांना स्वत:साठीच आर्थिक आधाराची गरज आहे, अशा दिव्यांग बांधवांनी समोर येऊन गरिबाला आधार दिला. खऱ्या आधाराची ज्यांना गरज आहे, अशा बांधवांनी मला आधार दिल्यामुळे त्याचे महत्त्व जगावेगळे असल्याची प्रतिक्रिया माधुरीने व्यक्त केली. यावेळी सुनील चव्हाण, विनोद दयाराम चव्हाण, दिलीप मोतीराम राठोड, मनोज चव्हाण, लताबाई राठोड, गोपाल चव्हाण, सुभाष चव्हाण व दिव्यांग बांधव उपस्थित होते.

> भुली ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या दिव्यांग बांधवांनी गरजू नववधुला दिलेली दिव्यांग निधीची मदत त्यांच्यामध्ये असलेल्या सामाजिक जाणिवेची जाण करून देतो. दिव्यांग बंधुंनी समाजामध्ये हा एक चांगला पायंडा पाडला आहे.
>
> **- मेघा राजेंद्र चव्हाण**
> सरपंच, भुली ग्रामपंचायत.

## थोडक्यात

### गाडीच्या हप्त्यावरून मारहाण

**दारव्हा :** गाडीच्या हप्त्यावरून मारहाण केल्याची घटना घडली. यापकरणी इनसाईट बँकमध्ये बिजनेस एक्झीकेटीव्ह म्हणून काम करीत असलेल्या आरोपीने बोलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच. २९ बि.ई. ७५७२ ही गाडी फायनान्स वर घेतली असता गाडीचे हप्ते न भरल्याने फिर्यादी हे गाडी जप्त करण्याकरीता आले असता दगडाने डोक्यावर मारून जखमी केले तसेच शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. सुरज हनुमान सोरते यांच्या तक्रारीवरून संतोष लोभा चव्हाण विरूध्द गुन्हा नोंद केला.

### पाण्याची टाकी न भरल्याने वाद

**दारव्हा :** पाण्याची टाकी न भरल्याने वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी फिर्यादीने पाण्याची टाकी भरली नाही या कारणावरून संगणमत करून फिर्यादीसोबत वाद करून शिविगाळ केली व हात धुरन डोक्याच्या उजव्या बाजुला नखाने ओरबडुन जखमी केले तसेच केस धरून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी सौ. जया मारोती सपकाळ यांच्या तक्रारीवरून लक्ष्मी नंदु मते, जिजाबाई सपकाळ, गणेश सपकाळ विरूध्द गुन्हा नोंद केला.

### अपघातात इसम जखमी

**पुसद :** अपघातात इसम जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी जनावराचे चमडे आणण्याकरीता जळताळी येथे पुलाच्या अलीकडे गेले असता आरोपी वाहन क्र. एम.एच. २९ बिटी ५८६१ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन धडक दिल्याने इसम हा गंभिर जखमी झाला. याप्रकरणीा अविनाश गणेश कुरील यांच्या तक्रारीवरून ाहन क्र. एम.एच. २९ बिटी ५८६१ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

## निधन

### डॉ. स्वानंद उमरेडकर



**यवतमाळ :** येथील ख्यातनाम होमिओपॅथ डॉ. स्वानंद गुणवंत उमरेडकर यांचे शनिवार (दि. ७) जून रोजी संध्याकाळी ६.४५ वाजता नागपूर येथे किडनी विकाराने निधन झाले. ते ५९ ववर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी वल्लरी, मुलगा डॉ. श्रीवास, मुलगी डॉ. राधा आणि मोठा परिवार आहे. कै. डॉ. स्वानंद उमरेडकर यांच्यावर रविवार, ८ जून रोजी सकाळी यवतमाळात अंत्यसंस्कार करण्यात येतील.

साइड मागितल्याचा राग अनावर! | प्रवाशांनी केले व्हिडिओ चित्रीकरण | यवतमाळ-अमरावती मार्गावरील घटना

# चार गुंडांचा एसटी चालकावर हल्ला

## यवतमाळातील वाढत्या गुंडगिरीचा पुन्हा प्रत्यय, नेर पोलिसांत गुन्हा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ/नेर, दि. ७: यवतमाळ-अमरावती मार्गावर साइड मागितल्याच्या रागातून, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या चार गुंडांनी एसटी चालकावर प्राणघातक हल्ला केला. प्रवाशांनी चित्रीकरण केले असून, नेर पोलिसांनी जग्गू मेश्राम याच्यासह चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने गुंडगिरीचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.**




### भररस्त्यात एसटी कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला

**वाटफळी गावाजवळ, केवळ साइड मागितल्याने चिडलेल्या टाटा मॅजिकमधील युवकांनी एसटी बस अडवून चालक-वाहकाला बेदम मारहाण केली. बसमधील महिला प्रवाशांदेखत शिवीगाळ आणि मारहाणीचा हा थरार सुरू होता. प्रवाशांनी या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण केले असून, ते पोलिसांना सादर करण्यात आले आहे.**

### अवैध वाहतुकीचा प्रश्न गंभीर, प्रशासन सुस्त?

**यवतमाळ जिल्ह्यात अवैध प्रवासी वाहतुकीचे जाळे पसरले असून, हेचालक अनेकदा नशेत किंवा वेगाने वाहने चालवून अपघातांना निमंत्रण देत आहेत. वाहतूक पोलिस या वाहनांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आहे. या मुजोर चालकांना वेळीच आवर न घातल्यास मोठ्या दुर्घटना घडण्याची भीती आहे.**

यवतमाळ जिल्ह्यातील वाढत्या गुंडगिरीचा आणि अवैध प्रवासी वाहतुकीच्या दहशतीचा एक गंभीर प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. एका अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या टाटा मॅजिकमधील गुंड प्रवृत्तीच्या युवकांनी, केवळ हॉर्न वाजवून साइड मागितल्याच्या क्षुल्लक कारणावरून, एसटी बस थांबवून चालक आणि वाहकाला बेदम मारहाण केली. हा संपूर्ण थरार बसमधील प्रवाशांनी आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात चित्रित केला असून, या घटनेमुळे प्रवाशांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये, प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. ही घटना यवतमाळवरून अमरावतीकडे जाणाऱ्या एसटी बसमध्ये वटफळी गावाजवळ घडली. बस चालकाने समोरील टाटा मॅजिक वाहनाला हॉर्न वाजवून पुढे जाण्यासाठी रस्ता मागितला. याचा राग आल्याने, टाटा मॅजिकमधील चार ते पाच युवकांनी आपली गाडी बससमोर आडवी लावून बस थांबवली. त्यानंतर त्यांनी थेट बसमध्ये घुसून, चालक आणि वाहकाला अश्लील शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. बसमध्ये अनेक महिला प्रवासी असतानाही, हा गुंडगिरीचा प्रकार सुरूच राहिल्याने प्रवासी भयभीत झाले होते. याप्रकरणी, तक्रार दाखल झाल्यानंतर नेर पोलिसांनी आरोपी जग्गू मेश्राम, तेजस राठोड, हर्षल बनकर आणि शुभम जगताप यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे आणि दरोडा टाकणे यांसारख्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यवतमाळ जिल्ह्यात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांनी मोठी डोकेदुखी निर्माण केली आहे. शहरात बसस्थानकासमोरच ही वाहने अवैधपणे प्रवासी भरतात, तरीही वाहतूक पोलिस त्यांच्यावर कारवाई करत नसल्याचा आरोप नागरिक करतात. दररोज यवतमाळ-अमरावती रस्त्यावर परवाने तपासणी होत असली, तरी या अवैध वाहनांकडे सोईस्करपणे दुर्लक्ष केले जाते, ज्यामुळे त्यांची मुजोरी वाढली आहे. यवतमाळातील वाढती गुन्हेगारी आता तालुक्यांमध्येही पसरत असून, यावर अंकुश लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

# सरसंघचालकांना उपरती, पण सरकार ‘वनवासी’शब्द कधी वगळणार?

## माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांचा सवाल; ‘वनवासी’गुलामगिरीचे प्रतीक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.७:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी प्रथमच ‘आदिवासी’ असा उल्लेख केल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असताना, आदिवासी नेते व माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी, 'सरसंघचालकांना उपरती झाली, पण केंद्र व राज्य सरकार त्यांच्या संस्था व योजनांमधून ‘वनवासी’ हा शब्द वगळून ‘आदिवासी’ असा उल्लेख कधी करणार?’ असा थेट प्रश्न उपस्थित केला आहे.

याबाबत दैनिक 'अजिंक्य भारत'शी बोलताना मोघे म्हणाले की, 'भाजप व त्यांच्या विचारांशी बांधिलकी असणारे घटक आदिवासींचा उल्लेख कायम ‘वनवासी’ असा करतात. आम्ही आदिवासी आहोत. ‘वनवासी’हा उल्लेख आमच्यासाठी गुलामगिरीचे प्रतीक आहे,’ म्हणून देशातील कोट्यवधी आदिवासी या शब्दाला विरोध करत आहेत. मात्र,



भाजप सरकारने सतत हाच शब्द वापरून आदिवासींना डिवचण्याचे काम केले आहे. ‘वनवासी’ऐवजी ‘आदिवासी’हाच शब्द वापरला जावा, यासाठी अनेक आंदोलने झाली. काँग्रेस पक्षाने व नेते राहुल गांधी यांनी नेहमीच ‘आदिवासी’ या अस्मितेचे समर्थन केले आहे. राहुल गांधी यांनी १५ नोव्हेंबर २०२२ रोजी वाशीम येथे बिरसा मुंडा जयंती कार्यक्रमात, आदिवासींचा उल्लेख ‘वनवासी’ करण्यावरून भाजपवर जोरदार टीका केली होती, याचीही आठवण मोघे यांनी करून दिली. ते पुढे म्हणाले की, भाजप सरकारला आदिवासींबद्दल खरंच प्रेम असेल, तर त्यांनी केवळ शब्दांचे खेळ करण्याऐवजी आदिवासींच्या आरक्षणात वाढ करावी. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आदिवासींचे आरक्षण पाच टक्क्यांवरून वाढवून साडेसात टक्के केले होते. आता आदिवासींची लोकसंख्या वाढली असून, त्या प्रमाणात आरक्षणही वाढले पाहिजे, अशी आमची ठाम मागणी असल्याचे मोघे यांनी स्पष्ट केले.

### पाच लाखांचा ऑनलाईन गंडा

**पांढरकवडा, दि. ७ :** व्हॉट्सअॅपवर आलेल्या एका बनावट एपीके फाईलद्वारे एका व्यक्तीच्या बँक खात्यातून तब्बल ५ लाख ३१ हजार रुपये परस्पर काढून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार येथे घडला आहे. याप्रकरणी पांढरकवडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी चेतन विश्वनाथ कनो यांच्या ९७६६५५१२३० या व्हॉट्सअॅप क्रमांकावर अज्ञात आरोपीने एक एपीके फाईल पाठवली होती. यानंतर त्यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेच्या खात्यातून आयएमपीएसद्वारे ५ लाख ३१ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने परस्पर काढून घेण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कनो यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून सायबर गुन्हे शाखेच्या मदतीने अधिक तपास सुरू केला आहे.

CAPTION ईद उल अजहा...



यवतमाळ : आज बकरी ईद निमित्त यवतमाळातील जामा मज्जिद येथे नमाज अदा करण्यासाठी मुस्लिम बांधव एकत्रित आले होते. यावेळी जामा मज्जिद येथे शांती व समृद्धीसाठी नमाज अदा करण्यात आली.
(छायाचित्र : सय्यद मतीन)

### क्षुल्लक कारणावरून रॉडने बेदम मारहाण

**वणी, दि. ७ :** ‘तुम्हाला बकरा विकायला शोभत नाही,’ असे म्हटल्याच्या शुल्लक कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीच्या डोक्यात रॉड व दगडाने मारून जखमी केल्याची घटना येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी अजय मधुकर पायघान यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी ज्ञानेश्वर निमकर, भोलानाथ निमकर व ज्ञानेश्वर यांनी त्यांच्यासोबत वाद घातला. वादाचे रूपांतर मारहाणीत होऊन आरोपींनी अजय पायघान यांना हातातील रॉडने व दगडाने डोक्यावर मारून जखमी केले, तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून वणी पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

## 'बंदी' भागात चढ्या दराने बोगस बियाणे विक्री

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**टाकळी, (इजारा), दि.७:** उमरखेड तालुक्यातील दुर्गम 'बंदी'भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात काही कृषी केंद्रे एजंटांमार्फत विनापरवाना, चढ्या दराने बोगस बियाणे विकून शेतकऱ्यांच्या माथी मारत असल्याचा गंभीर आरोप होत आहे. या प्रकाराला कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचा आशीर्वाद असल्याचा संशय व्यक्त करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप पसरला आहे.

या भागातील शेतकऱ्यांच्या चर्चेनुसार, कृषी केंद्रचालक झटपट पैसे कमावण्याच्या हव्यासापोटी बनावट बियाणे, खते व तणनाशके विकून शेतकऱ्यांना आर्थिक गर्तेत ढकलत आहेत. आरआर बिलापेक्षा जास्त दराने विक्री होत असूनही, कृषी विभागाची यंत्रणा 'कुंभकर्णी' झोपेत असल्याचे चित्र आहे. यामुळे देशाचा पोशिंदा मरणासन्न अवस्थेत पोहोचला असून, त्याला आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याची विदारक भावना व्यक्त होत आहे. 'शासकीय यंत्रणा केवळ निवडणुका आणि फोटोसेशनपुरतीच आहे का?' असा उद्विग्न सवाल शेतकरी विचारत आहेत. या गंभीर प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन दोषी कृषी केंद्रचालक व त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# जुन्या वादातून नगरपरिषद स्वच्छता कर्मचाऱ्याचा निर्घृण खून; तिघे अटकेत

## यवतमाळमधील जगतमंदिर परिसरातील घटना, आरोपींना पोलिस कोठडी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.७:** तांब्याची तार जाळण्याच्या जुन्या वादातून नगरपरिषद स्वच्छता कर्मचाऱ्याची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना शहरात घडली. या घटनेने शहरात पुन्हा दहशतीचे वातावरण पसरले असून, अवधूतवाडी पोलिसांनी रात्रीतूनच त्या तीन आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असताना न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे.

ही घटना अवधूतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जगतमंदिर परिसरात शुक्रवार (दि. ६) जून




रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली. मयत सूरज कानबा गाताडे (वय २१)हा त्याचा मित्र ऋषी भारत लामके (२१) याच्यासोबत दुचाकीने जात होता. दोन महिन्यांपूर्वी सूरजचे आरोपी युवराज संतोष माहूरकर (१९) याच्याशी तांब्याची तार जाळण्यावरून भांडण झाले होते. याचाच वचपा काढण्यासाठी दबा धरून बसलेल्या युवराज आणि त्याचे साथीदार गड्डू भोयर (२०) व अन्य एकाने सूरजची दुचाकी (क्र. एमएच २९/ बिडी ३९८३) अडवली. सूरज हा अमितेश राजकुमार चंडाले यांच्या घरी कुत्र्याला जेवण घालण्यासाठी गेला असता, आरोपींनी त्याच्यावर चाकूने हल्ला केला. मित्र ऋषी लामके याने वाचवण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. आरोपी पसार झाल्यानंतर ऋषी याने सूरजला रुग्णालयात नेले, मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींना अटक केली.

# प्रवेशाच्या नावाखाली शैक्षणिक संस्थांकडून पालकांची लूट

## अतिरिक्त शुल्क घेणे बेकायदेशीर; गटशिक्षण अधिकाऱ्यांचे तक्रारी करण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर

**उमरखेड, दि.७:** उमरखेडमध्ये शैक्षणिक संस्था प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून १० हजारांपर्यंत देणगी आकारून पालकांची लूट करत असल्याचा आरोप आहे. शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार वाढला असून, गटशिक्षण अधिकाऱ्यांनी कारवाईसाठी तक्रारींचे आवाहन केले आहे, पण पालक मात्र धास्तावले आहेत.




> **'जर अशा प्रकारे प्रवेशासाठी अतिरिक्त शुल्क आकारले जात असेल, तर ते पूर्णपणे बेकायदेशीर आणि नियमबाह्य आहे. याबाबत पालक किंवा विद्यार्थ्यांनी शिक्षण विभागाकडे तक्रार केल्यास, संबंधित शिक्षण संस्थेवर निश्चितपणे कायदेशीर कार्यवाही केली जाईल,'**
>
> **-सतीश दर्शनवाड, गटशिक्षणाधिकारी, उमरखेड.**

### राजकीय लागेबांधे, पालक हतबल

**शहरासह तालुक्यातील बहुतांश शिक्षण संस्थांचे चालक हे राजकारणाशी थेट निगडित आहेत. त्यामुळे त्यांच्या मनमानी कारभारावर आक्षेप घेण्यास सामान्य नागरिक तर सोडाच, पण लोकप्रतिनिधीही पुढे येत नाहीत. यामुळेच मनमानी शुल्क आकारून पालकांचे आर्थिक शोषण करण्याचा गोरखधंदा सुरू असल्याची संतप्त चर्चा आहे.**

एकीकडे राज्य शासन शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी विविध योजना राबवत असताना, दुसरीकडे उमरखेड तालुक्यातील अनेक नामांकित खासगी शैक्षणिक संस्थांकडून नवीन प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थी आणि पालकांकडून हजारो रुपयांची देणगी (अतिरिक्त शुल्क) आकारून त्यांचे आर्थिक शोषण केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शिक्षण विभागाच्या कथित दुर्लक्षामुळे हा गोरखधंदा फोफावला असून, या कार्यप्रणालीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू होताच, नामांकित शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी उसळली आहे. याच गर्दीचा फायदा घेत, तालुक्यातील काही नामवंत संस्थांमध्ये इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या प्रवेशासाठी प्रतिविद्यार्थी तब्बल दहा हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त शुल्क आकारले जात आहे. हीच परिस्थिती अकरावी आणि बारावीच्या प्रवेशासाठीही असून, तेथेही भरमसाट शुल्क आकारले जात आहे. तालुक्यातील शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थी व पालकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असतानाही, याविरोधात एकही सामाजिक संघटना किंवा राजकीय पक्ष आवाज उठवत नसल्याने, या संस्थांची मनमानी अधिकच वाढली आहे. हजारो रुपये अतिरिक्त शुल्क भरून प्रवेश निश्चित करणारे पालकही, आपल्या पाल्याला संस्थेकडून भविष्यात त्रास होऊ नये या भीतीने, तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. या दुहेरी कोंडीमुळे आर्थिक शोषण करणाऱ्या संस्थांचे फावत असल्याचे चित्र आहे. शिक्षण संस्था चालकांचे राजकीय लागेबांधे असल्याने, त्यांच्या मनमानी कारभारावर कोणीही आक्षेप घेत नसल्याने, पालकांना कोणी वालीच उरला नसल्याची भावना आहे.

## धनज येथील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पोफाळी, दि.७:** पोफाळी पोलिस ठाणे हद्दीतील धनज येथील विजय दिंडाळकर (वय २५) या तरुणाने आडद शिवारातील जंगलात सागाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना शुक्रवारी, ६ जून रोजी सायंकाळी उघडकीस आली.

आडद येथील एक नागरिक जंगलात गुरे चारत असताना, त्याला एक तरुण गळफास घेतलेल्या अवस्थेत झाडाला लटकून असल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ गावातील इतरांना व आडदचे उपसरपंच विठ्ठल ठाकरे यांना माहिती दिली. ठाकरे यांनी पोफाळी पोलिस ठाण्याला कळवताच, बीट जमादार प्रभाकर जाधव व पोलिस अंमलदार निरंजन जाधव घटनास्थळी दाखल



झाले. त्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने मृतदेह खाली उतरवून पंचनामा केला व रात्री ८ च्या सुमारास शवविच्छेदनासाठी उमरखेड शासकीय रुग्णालयात पाठवला. शनिवारी, दुपारी ३ वाजता धनज येथे अत्यंत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या २५ वर्षीय तरुणाने आत्महत्या का केली, यामागील नेमके कारण शोधण्याचे मोठे आव्हान पोफाळी पोलिसांपुढे आहे. या प्रकरणाचा अधिक तपास ठाणेदार पंकज दाभाडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार प्रभाकर जाधव करत आहेत.